जळगाव
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ:१९९६
आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६
पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६
जळगाव, मंगळवार, १७ मार्च २०२६। युगाब्द ५१२७ । वर्ष : ३२ । अंक : २१८। मूल्य ४ रुपये। पृष्ठे ८ + ४ = १२। जळगाव, धुळे, नंदुरबार येथे उपलब्ध

इराणविरोधात साथ द्या, अन्यथा परिणाम भोगा !
वाचा पान ३ वर

## विचारपुष्प



आत्मज्ञान ही संजीवनी आहे. मरणासन्न समाजाला त्याच्या भूतकाळातील वैभवाचे स्मरण करून, कर्तृत्व आणि धैर्य इत्यादी सुप्त गुणांना जागृत करून त्याचे पुनरुज्जीवन करता येते. इतिहासाचे अभ्यासक या वस्तुस्थितीपासून अनभिज्ञ नाहीत.

**- बाबासाहेब आपटे**
रा. स्व. संघाचे प्रथम प्रचारक

## महत्त्वाचे

### युद्धनौका तैनातीसाठी अमेरिकेशी चर्चा नाही

**नवी दिल्ली** : होर्मुझ सामुद्रधुनीतून व्यापारी जहाजांच्या सुरक्षित वाहतुकीची खात्री करण्यासाठी नौदलाची जहाजे तैनात करण्याबाबत भारताने अमेरिकेसोबत कोणताही द्विपक्षीय चर्चा केलेली नाही, असे परराष्ट्र मंत्रालयाने सोमवारी स्पष्ट केले. या तणावाच्या पृष्ठभूमीवर हा सामरिक जलमार्ग खुला ठेवण्याच्या विविध देशांनी युद्धनौका पाठवाव्यात, असे आवाहन अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केले होते. चीन, फ्रान्स, जपान, दक्षिण कोरिया, युनायटेड किंगडम आणि इतर देशांनी हा जलमार्ग सुरक्षित आणि खुला ठेवण्यासाठी त्या भागात आपल्या युद्धनौका पाठवाव्यात, अशी अपेक्षा ट्रम्प यांनी व्यक्त केली होती.

# महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक सर्व धर्मांना लागू : मुख्यमंत्री

## बळजबरीचे धर्मांतरण रोखणे हा उद्देश





◆ **मुंबई, १६ मार्च**

**महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक हे कोणत्याही एका धर्माविरोधात नसून राज्यातील सर्व धर्मांना समानपणे लागू राहणार आहे, असे स्पष्ट करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विधेयकाचा मुख्य उद्देश बळजबरीने होणारे धर्मांतरण रोखणे हा असल्याचे सांगितले. त्यामुळे या विधेयकाबाबत सुरू असलेल्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही यावेळी मुख्यमंत्र्यांनी केले.**



विधानसभेत महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक २०२६ सादर केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधेयकातील तरतुदी आणि या विधेयकामागील उद्देश सभागृहात स्पष्ट केले. कायदा कोणालाही धर्मांतर करू नये म्हणून नसून फसवणूक, आमिष, लबाडी किंवा जबरदस्ती करून एका धर्मातून दुसऱ्या धर्मात स्थलांतर होऊ नये यासाठी तयार करण्यात आला आहे. ज्यांना स्वेच्छेने धर्मांतरण करायचे आहे त्यांना कायद्याच्या चौकटीत पूर्ण संरक्षण देण्यात येणार असून त्यासाठी स्पष्ट कार्यप्रणाली विधेयकात नमूद करण्यात आली असल्याचे यावेळी मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

धार्मिक विषयांमुळे काही वेळा कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होतात. अशा परिस्थितीत सुस्पष्ट नियमांची आवश्यकता लक्षात घेऊन या विधेयकात स्पष्ट तरतुदी करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे राज्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी हा कायदा आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद करीत, संविधानाने प्रत्येक नागरिकाला धर्म स्वातंत्र्याचा अधिकार दिलेला असला, तरी इतरांवर जोरजबरदस्ती करून धर्मांतरण करता येत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. याबाबत सर्वोच्च न्यायालयानेही निर्णय दिलेला असून धर्मांतरणासाठी स्पष्ट कार्यप्रणाली असावी, अशी सूचना केंद्र सरकारकडून करण्यात आली होती.

### पोलिस करू शकतील कारवाई

बळजबरीने धर्मांतरण झाल्याची किंवा होत असल्याची शंका असल्यास संबंधित व्यक्तीच्या रक्ताच्या नात्यातील किंवा दत्तक नात्यातील कोणालाही तक्रार करण्याचा अधिकार असेल. अशा घटना पोलिसांच्या निदर्शनास आल्यास ते स्वतःहून (सुमोटो) कारवाई करू शकतील, अशी तरतूद या विधेयकात करण्यात आल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

### उबाठाचा पाठिंबा

फडणवीस यांनी विधानसभेत सादर केलेल्या महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक २०२६ या विधेयकाबाबत सुस्पष्ट निवेदन दिल्यामुळे या विधेयकाच्या बाबतीत संभ्रम दूर होताच उबाठा गटाचे गटनेते भास्कर जाधव यांनी पाठिंबा दिला.

# बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध करणार?

◆ **बारामती, १६ मार्च**

अजित पवार यांचे विमान दुर्घटनेत निधन झाल्याने रिक्त झालेल्या पुणे जिल्ह्यातील बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी महायुतीकडून राज्याच्या नवनिर्वाचित उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे नाव जवळपास निश्चित होत असताना त्यांच्या विरोधात महाआघाडीकडून आम्ही कोणताही उमेदवार देणार नाही, अशी स्पष्ट माहिती राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे युवा नेते युगेंद्र पवार यांनी आज बारामती येथे माध्यमांशी बोलताना दिली.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने बारामती शहर आणि तालुक्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आम्ही सुनेत्रा पवार यांना विनंती करू. राज्य सरकारकडून विकासाची उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करू. बारामती तालुका आणि शहराच्या विकासासाठी दिवंगत नेते अजित पवार यांनी खूप प्रयत्न केले आहेत. त्यांचे योगदान मोठे आहे. तसेच, ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीही बारामतीच्या विकासात मोठ्या प्रमाणात हातभार लावला आहे, असे युगेंद्र पवार यांनी सांगितले.

# राजू बाविस्करांच्या ‘काळ्यानिळ्या रेषा’ला साहित्य अकादमी पुरस्कार

## नवतेज सरना, ममता कालिया यांच्यासह २४ भाषांमधील साहित्यिकांचा सन्मान

◆ **नवी दिल्ली, १६ मार्च**

साहित्य अकादमीने सोमवारी २४ भारतीय भाषांमधील आपले वार्षिक पुरस्कार जाहीर केले आहेत. यामध्ये आत्मचरित्र श्रेणीत राजू बाविस्कर यांच्या ‘काळ्यानिळ्या रेषा’ पुस्तकाची निवड करण्यात आली आहे. यंदा या प्रतिष्ठित सन्मानासाठी आठ काव्यसंग्रह, चार कादंबऱ्या, सहा कथासंग्रह, दोन निबंधात्मक कार्ये, एक साहित्यिक समीक्षा, एक आत्मचरित्र आणि दोन आठवणींच्या पुस्तकांची निवड करण्यात आली आहे.





### अंतर्मुख करणारे एका चित्रकाराचे आत्मचरित्र

**राजू बाविस्कर यांचे काळ्यानिळ्या रेषा आत्मचरित्र हे केवळ एका चित्रकाराचे जगणे शब्दबद्ध करत नाही तर, समाजातील एका वंचित वर्गाच्या प्रवासाचे कथन आहे. चित्रकार राजू बाविस्कर यांनी आपल्या चित्रातून वंचितांचे जगणे मांडले. यानंतर त्यांनी आपल्या वाट्याला आलेल्या वंचित जगण्याला शब्दांमधून वाट करून दिली. व्यक्तीचित्रणाच्या अंगाने जाणारे हे आत्मकथन वाचकांना अंतर्मुख करणारा अनुभव देतो.**

साहित्य अकादमीने आत्मचरित्र श्रेणीत राजू बाविस्कर यांच्या ‘काळ्यानिळ्या रेषा’ (मराठी) आत्मचरित्राची निवड केली आहे. सन्मानचिन्ह (कोरीव ताम्रपट), शाल आणि एक लाख रुपये रोख असे पुरस्काराचे स्वरूप आहे. ३१ मार्च २०२६ रोजी नवी दिल्ली येथे आयोजित एका समारंभात हे पुरस्कार प्रदान केले जातील.

काव्यसंग्रह या श्रेणीमध्ये श्रेष्ठ कविता (बंगाली), ठाकूर सत्सयी (डोगरी), भट्टखडकी (गुजराती), नजदवानैक्य पोत आलव (काश्मिरी), (पान ३ वर...)

# बिहारमध्ये नितीशकुमारांसह रालोआचे सर्व उमेदवार विजयी

### राज्यसभा निवडणूक निकाल

◆ **पाटणा, १६ मार्च**

बिहारमधील राज्यसभेच्या पाच जागांसाठी झालेल्या निवडणुकीत रालोआने दमदार विजय मिळवला. बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांच्यासह रामनाथ ठाकूर, उपेंद्र कुशवाह आणि शिवेश राम हे पाचही उमेदवार विजयी झाले.

निकालानंतर रालोआच्या गोटात जल्लोष होता, तर महाआघाडीच्या निवडणूक व्यूहरचनेवर प्रश्न उपस्थित केले जात आहे. निवडणुकीत नितीशकुमार आणि नितीन नवीन यांना प्रत्येकी ४४ मते मिळाली. केंद्रीय मंत्री रामनाथ ठाकूर यांना ४२ मते मिळाली, तर आरएलएमचे नेते उपेंद्र कुशवाह यांनी ४२ मते मिळाली.

राज्यसभा निवडणुकीत एक जागा जिंकण्यासाठी बिहारमध्ये ४१ मतांची गरज होती. मात्र, महाआघाडीचे चार आमदार मतदान प्रक्रियेत सहभागी झाले नाहीत. यात काँग्रेसचे तीन आणि राजदच्या एका उमेदवाराचा समावेश आहे. त्यांच्या अनुपस्थितीमुळे निवडणुकीचे गणित पूर्णतः बदलले.

# चौफेर खरेदीने सेन्सेक्स वधारला

◆ **मुंबई, १६ मार्च**

सलग तीन दिवसांच्या घसरणीनंतर भारतीय शेअर बाजाराने सोमवारी जोरदार पुनरागमन केले. अत्यंत अस्थिर सत्रत ऑटो, बँकिंग आणि एफएमसीजी क्षेत्रतील समभागांमध्ये झालेल्या खरेदीमुळे निफ्टी ५० ने २३,४०० चा टप्पा यशस्वीरीत्या पार केला.

सोमवारचा व्यवहार संपताना सेन्सेक्स ९३८.९३ अंकांनी, म्हणजेच १.२६ टक्क्यांनी वधारून ७५,५०२.८५ वर स्थिरावला, तर निफ्टी २५७.७० अंकांनी म्हणजेच १.११ टक्क्यांनी वाढून २३,४०८.८० वर बंद झाला.




10 YEAR WARRANTY | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE | 72198 21111 | SHRIRAM Finance | IDFC FIRST Bank ALWAYS YOU FIRST | BAJAJ AUTO CREDIT | L&T Finance | TATA CAPITAL Two Wheeler Loans

*नियम आणि अटी लागू. बचत 31 मार्च 2026 पर्यंत उपलब्ध. दाखवलेली एकूण बचत ही कॅशबॅकची बचत, शून्य प्रोसेसिंग फी आणि 5 मोफत सर्व्हिसेस (3 स्टँडर्ड मोफत सर्व्हिसेस आणि 2 अतिरिक्त मोफत सर्व्हिसेस) यांची बेरिज आहे. मोफत सर्व्हिसेसची बचत शेड्यूल्ड लेबर शुल्कानुसार. लागू ऑफर्स मॉडेल्स/राज्यानुसार बदलू शकतात. शून्य पीएफवरील बचत फायनान्सर आधारावर स्थानांनुसार बदलू शकते. अर्थपुरवठा पूर्णपणे फायनान्सरच्या विवेकानुसार. साहसी दृश्ये एक्सपर्ट्सकडून, प्रोफेशनल सुपरवीजन अंतर्गत, नियंत्रित आणि बंद वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यांपासून दूर जागेत केली आहेत. या साहसी दृश्यांचं अनुकरण करू नये आणि नेहमी वाहतूक व सुरक्षिततेचे नियम पाळावे. पल्सर 125 ऑफर ही निऑन आणि कार्बन फायबर मॉडेल्सवर. पल्सर N160 USD सिंगल सीट व्हेरिएंटवर ई–कॉम ऑफर, संबंधित ई–कॉम भागीदाराच्या अटींवर अवलंबून. ई–कॉम ऑफर भागीदारांनुसार बदलू शकतात.

**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Jalgaon** PAGARIYA BAJAJ 9545221777, 9049240099 • **Bhusawal** PAGARIYA BAJAJ 02582-223205 , 9960548889 • **Chalisgaon HERAMMBA BAJAJ 9423774978 ; 7588477033• Dhule** ROYAL BAJAJ 9552537990 • **Deopur** ROYAL BAJAJ 9552547990 • **Nandurbar** RUSHI BAJAJ 9420322905 • **Shahada** RUSHI BAJAJ 9420171621 • **Satana** Siddhi Bajaj 9823220028



# इराणविरोधात साथ द्या, अन्यथा परिणाम भोगा!

## ट्रम्प यांनी नाटो देशांवर टाकला दबाव

◆ **वॉशिंग्टन, १६ मार्च**

अमेरिका आणि इराण यांच्यातील वाढत्या संघर्षामुळे जागतिक राजकारणात तणाव अधिक तीव्र होत आहे. या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नाटो देशांना स्पष्ट इशारा देत होर्मुझ सामुद्रधुनी पुन्हा जहाज वाहतुकीसाठी खुली करण्यासाठी अमेरिकेला मदत करण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी म्हटले आहे की इराणविरुद्धच्या कारवाईत अमेरिकेसोबत उभे राहिले नाहीत, तर त्याचे परिणाम नाटो देशांना भोगावे लागू शकतात. इराणने अलीकडेच अमेरिका आणि इस्रायलच्या हल्ल्यांना प्रत्युत्तर देताना होर्मुझ सामुद्रधुनीतून होणारी सागरी वाहतूक मोठ्या प्रमाणावर रोखली आहे. त्याचा परिणाम इंधन आणि वायू पुरवठ्यावर झाला आहे.

होमुर्झ मार्गातून जगातील मोठ्या प्रमाणात तेल आणि वायूची निर्यात होत असल्याने या निर्णयाचा परिणाम आंतरराष्ट्रीय ऊर्जा पुरवठ्यावर झाला आहे. त्यामुळे अनेक देशांमध्ये इंधन पुरवठा आणि किमतींबाबत चिंता वाढली आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी ट्रम्प यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर मदतीची मागणी सुरू केली आहे. एका आंतरराष्ट्रीय आर्थिक वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत ट्रम्प यांनी सांगितले की अमेरिकेच्या मित्र राष्ट्रांनी या संकटात सहकार्य केले नाही, तर नाटोचे भविष्य धोक्यात येऊ शकते.

### सुरक्षेची जबाबदारी सर्वांचीच

अमेरिकेच्या अध्यक्षांनी असेही स्पष्ट केले की या सागरी मार्गाचा फायदा घेणाऱ्या सर्व देशांची जबाबदारी आहे की त्यांनी त्याची सुरक्षितता सुनिश्चित करावी. यापूर्वी त्यांनी चीन, फ्रान्स, जपान, दक्षिण कोरिया आणि ब्रिटन या देशांना त्यांच्या युद्धनौका पाठवून या मार्गाची सुरक्षा करण्याचे आवाहन केले होते. ट्रम्प यांनी सातत्याने असा दावा केला आहे की होर्मुझ सामुद्रधुनी कोणत्याही परिस्थितीत इराणच्या नियंत्रणाखाली राहू नये आणि ती पूर्णपणे सुरक्षित ठेवली पाहिजे.

### जहाज वाहतूक विस्कळीत

दरम्यान, इराणमध्ये सुरू असलेल्या संघर्षानंतर या सामुद्रधुनीतून होणारी जहाज वाहतूक जवळजवळ ठप्प झाली आहे. इराण, संयुक्त अरब अमिराती आणि ओमान यांच्या दरम्यान असलेला हा सुमारे चौपन्न किलोमीटर रुंदीचा सागरी मार्ग जागतिक ऊर्जा पुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. त्यामुळे या भागातील तणावामुळे अनेक देशांमध्ये ऊर्जा संकटाची भीती व्यक्त केली जात आहे.

इराणशी संबंधित तणावामुळे त्यांनी या महिन्याच्या अखेरीस चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासोबत होणाऱ्या नियोजित बैठकीबाबतही अनिश्चितता व्यक्त केली आहे. ट्रम्प यांनी चीनवरही या प्रश्नात सहकार्य करण्यासाठी दबाव टाकण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते चीनला लागणाऱ्या तेलापैकी मोठा हिस्सा याच सागरी मार्गातून जातो. त्यामुळे या मार्गाची सुरक्षितता राखणे चीनसाठीही तितकेच महत्त्वाचे आहे. बीजिंगची भूमिका स्पष्ट झाल्यानंतरच पुढील दौऱ्याबाबत निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी संकेत दिले.

# ओडिशाच्या सरकारी रुग्णालयाला आग

**१० जणांचा मृत्यू**


◆ **कटक, १६ मार्च**

ओडिशातील कटकमध्ये सोमवारी पहाटे सरकारी रुग्णालयाला आग लागली. ही आग एससीबी मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलच्या अतिदक्षता विभागाला लागली. या घटनेत दहा रुग्णांचा मृत्यू झाला. ही आग पहाटे २:३० ते ३:०० च्या दरम्यान लागली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

रुग्णालयाच्या ट्रॉमा केअर विभागाच्या अति दक्षता विभागामध्ये आग लागली आणि ती वेगाने वाढत गेली. गंभीर स्थितीत असलेल्या रुग्णांवर तेथे उपचार सुरू होते. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाची पथके तातडीने रुग्णालयात दाखल झाली. अग्निशमन दलाच्या जवानांनी कारवाई सुरू केली आणि आग आटोक्यात आणली, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. रुग्णांना सुरक्षितपणे बाहेर काढण्याच्या प्रयत्नात रुग्णालयातील अकरा कर्मचारीही भाजले. एकूण २३ रुग्णांना तातडीने इतर विभाग आणि वॉर्डमध्ये हलवण्यात आले. रुग्णालयातील कर्मचारी, पोलिस आणि रुग्णांसोबत असलेल्या लोकांनीही या बचाव कार्यात मदत केली.

घटनेची माहिती मिळताच, मुख्यमंत्री मोहन चरण माझी आणि आरोग्यमंत्री मुकेश महालिंग यांनी रुग्णालयात धाव घेतली. त्यांनी परिस्थितीचा आढावा घेतला आणि रुग्णांची भेट घेतली. आगीचे मुख्य कारण शॉर्ट सर्किट असावे. आगीने ट्रॉमा केअर आयसीयू तसेच जवळच्या अनेक वॉर्डांना वेढले.

हस्तांतरण प्रक्रियेदरम्यान सात गंभीर आजारी रुग्णांचा मृत्यू झाला. यानंतर उपचारादरम्यान आणखी तीन रुग्णांचा मृत्यू झाला, असे माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले.



आग लागल्यानंतर अतिदक्षता विभागाची झालेली अवस्था

### मृतांच्या कुटुंबीयांना २५ लाख

**जखमी रुग्णांच्या उपचारांमध्ये कोणतीही कमतरता भासू नये यासाठी मुख्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत. अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांबद्दल त्यांनी शोक व्यक्त केला. सरकारने प्रत्येक मृतांच्या कुटुंबियांना २५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या, रुग्णालयातील परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत आणि सखोल चौकशी सुरू आहे.**

# ‘वन बॅटल आफ्टर अनदर’ला सहा ऑस्कर

◆ **न्यूयार्क, १६ मार्च**

ऑस्कर २०२६चा पुरस्कार सोहळा हॉलिवुड, लॉस एंजेलिसमधील सुप्रसिद्ध डॉल्बी थिएटरमध्ये पार पडला. ९८ व्या अकादमी पुरस्कारांसाठीच्या नामांकनांची घोषणा जानेवारी महिन्यात करण्यात आली होती.

९८व्या अकादमी पुरस्कार जाहीर झाले असून या वर्षी ‘वन बॅटल आफ्टर अनदर’ या चित्रपटाने सहा पुरस्कार मिळवले तर ‘सिनर्स’ला चार पुरस्कार मिळाले. पॉल थॉमस अँडरसनच्या ‘वन बॅटल आफ्टर अनदर’ चित्रपटाला १३ नामांकने मिळाली होती यापैकी चित्रपटाने सहा ऑस्कर जिंकून इतिहास रचला. रयान कूगलरच्या ‘सिनर्स’ ला १६ नामांकन मिळाली होती तर चित्रपटाला चार पुरस्कार मिळाले. माइकल बी. जॉर्डनला ‘सिनर्स’ चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेता, तर जेसी बकलीला ‘हॅमनेट’साठी सर्वेत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला. सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा मान ‘वन बॅटल आफ्टर अनदर’ने मिळवला. जागतिक स्तरावरील लोकप्रिय व्यक्तिमत्त्व प्रियंका चोप्रा हिनेही या सोहळ्यात पुरस्कार प्रदान करण्याची भूमिका बजावली.

२०२६ च्या ऑस्कर दरम्यान, अभिनेता जेवियर बार्डेमने युद्धाला विरोध केला आणि ऑस्करमधून ‘नो वॉर’ या घोषणेला पाठिंबा दिला. त्याने ‘फ्री पॅलेस्टाईन’च्या कारणाचेही समर्थन केले. जेवियर प्रियंका चोप्रासोबत सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्रदान करण्यासाठी स्टेजवर दिसला.





### सोहळ्यात धर्मेंद्र यांना दिली नाही श्रद्धांजली

**दरवर्षी, ऑस्कर पुरस्कारांमध्ये जगातील महान कलाकारांचा सन्मान केला जातो. चाहते हॉलिवूडसह बॉलिवूडचे दिग्गज अभिनेते धर्मेंद्र यांना श्रद्धांजली वाहण्याची आतुरतेने वाट पाहत होते. तथापि, ऑस्करमध्ये तसे झाले नाही. ऑस्कर पुरस्कारांमध्ये त्यांच्या ‘इन मेमोरिअम’ विभागात कोणत्याही बॉलिवूड स्टारचा सन्मान करण्यात आला नाही.**

# बेकायदेशीर कॉल सेंटरवर ईडीचे छापे

◆ **कोलकाता, १६ मार्च**

सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) सोमवारी पश्चिम बंगालमध्ये मोठी कारवाई केली. तपास पथकांनी राज्यातील विविध भागात छापे टाकले. ही कारवाई बेकायदेशीर कॉल सेंटर्स आणि व्यक्तींच्या फसवणुकीशी संबंधित आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, सिलीगुडी, हावडा, विधाननगर आणि दुर्गापूर येथे सुमारे १० ठिकाणी छापे टाकण्यात आले. या प्रकरणात सुरश्री कर, सम्राट घोष आणि सुभाजित चक्रवर्ती हे प्रमुख संशयित म्हणून समोर आले आहेत.

ईडी संबंधित व्यक्ती आणि त्यांच्या सहकाऱ्यांविरोधात महत्वाचे पुरावे शोधत आहे. त्यांच्यावर कॉल सेंटरद्वारे असंख्य निष्पाप लोकांची आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप आहे. तपास संस्था सर्व कोनातून या प्रकरणाची चौकशी करत आहे.

### डिफेंडरची डंपरला धडक, तरुणाचा मृत्यू

**फरिदाबाद** : सूरजकुंड पोलिस स्टेशन परिसरातील पाली रोडवर रविवारी दुपारी झालेल्या एका भयावह अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाला. भरधाव लँड रोव्हर डिफेंडर रस्त्याच्या कडेला उभ्या डंपरला धडकली. ही धडक इतकी जोरदार होती की, महागड्या एसयूव्हीचा चेंदामेंदा झाला आणि आग लागली. यात गंभीर जखमी तरुणाला रुग्णालयात नेण्यात आले असताना डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. मयंक सोनेंद्र भदाना रा. दलेर मोहल्लम, असे मृत तरुणाचे नाव आहे. मयंकचे वडील सानेंद्र प्रॉपर्टी व्यवसायात आहेत. मयंक त्यांचा एकुलता एक मुलगा होता. या घटनेमुळे कुटुंबासह गावात शोककळा पसरली आहे.

# होमिओपॅथी डॉक्टरांच्या ॲलोपॅथी उपचार परवानगीचा प्रश्न न्यायालयात

◆ **मुंबई, १६ मार्च**

ग्रामीण आणि दुर्गम भागात वैद्यकीय सेवा अधिक प्रभावीपणे उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकोलॉजी संदर्भातील प्रकरण सध्या न्यायालयात प्रलंबित आहे. त्यामुळे न्यायालयाचा अंतिम निर्णय येईपर्यंत या कोर्सचे प्रमाणपत्र वितरित करण्यात येणार नसल्याची माहिती वैद्यकीय शिक्षण विभागाच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधानसभेत दिली.

विधानसभा सदस्य डॉ. तुषार राठोड यांनी या विषयावर लक्षवेधी सूचना मांडली होती. त्याला उत्तर देताना राज्यमंत्री मिसाळ यांनी सांगितले की, राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागात डॉक्टरांची कमतरता भासत असल्यामुळे हा कोर्स सुरू करण्यात आला होता.

होमिओपॅथी उपचार करणाऱ्या डॉक्टरांना गरजेच्या परिस्थितीत काही प्रमाणात ॲलोपॅथी औषधोपचार करता यावेत, यासाठी हा अभ्यासक्रम राबवण्यात आला. राज्यात आतापर्यंत सुमारे ८ हजार डॉक्टरांनी हा कोर्स पूर्ण केला असून ३३ प्रशिक्षण संस्थांमार्फत त्याचे शिक्षण दिले जात असल्याची माहितीही त्यांनी सभागृहात दिली. (तभा वृत्तसेवा)

## भाजपाचे १४४ उमेदवार जाहीर

**कोलकाता** : पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाने निवडणूक तयारी तीव्र केली आहे. पक्षाने अनेक प्रमुख मतदारसंघांसाठी १४४ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे.

या यादीत राज्यातील सर्वात जास्त चर्चेत असलेल्या मतदारसंघांपैकी एक भवानीपूर मतदारसंघातून भाजपा नेते सुवेंदू अधिकारी यांचा समावेश आहे. उमेदवारांच्या निवडीत भाजपाने नवीन चेहरे आणि अनुभवी नेत्यांना संधी दिली आहे. यादीत भाजपाने सुवेंदू अधिकारी आणि दिलीप घोष यांना तिकीट दिले आहे.

भाजपने सुवेंदू अधिकारी यांना नंदीग्राम आणि भवानीपूर या दोन मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी गतवेळी भवानीपूर मतदारसंघातून विजयी झाल्या होत्या.

### एअर इंडियाचे विमान आयर्लंडला वळवले

**नवी दिल्ली** : न्यू यॉर्कहून दिल्लला जाणारे एअर इंडियाचे ३५० विमान सोमवारी सकाळी संशयास्पद तांत्रिक बिघाडामुळे खबरदारीचा उपाय म्हणून आयर्लंडच्या शॅनन विमानतळावर वळवण्यात आले. विमानात सुमारे ३०० प्रवासी होते.

एअर इंडियाच्या एका निवेदनानुसार, १५ मार्चला न्यू यॉर्कवरून दिल्लीसाठी निघालेले विमान १०२, संभाव्य तांत्रिक बिघाडामुळे आयर्लंडच्या शॅनन विमानतळावर वळवण्यात आले. स्थानिक वेळेनुसार सोमवारी पहाटे ४.३० वाजता ते शॅनन विमानतळावर सुरक्षितपणे उतरले आणि सर्व प्रवासी आणि कर्मचारी सुरक्षित आहेत.

एअर इंडियाच्या प्रवक्त्यांनी सांगितले की, विमानाची सविस्तर तांत्रिक तपासणी स्थापित सुरक्षा मानकांनुसार केली जात आहे. प्रवाशांची सुरक्षा ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे.



मध्य पूर्वेत पेटलेल्या संघर्षादरम्यान धोकादायक होर्मुझ सामुद्रधुनी ओलांडून गुजरातच्या मुंद्रा बंदरावर सोमवारी ‘शिवालिक’ जहाज दाखल झाले. या जहाजात एलपीजी असल्याने काही प्रमाणात या वायूची समस्या सुटणार आहे. दुसरे जहाज मंगळवारी भारतात दाखल होण्याची शक्यता आहे

### मशिदीत नमाज पठन करणाऱ्यांच्या संख्येवर मर्यादा

**संभल** : उत्तर प्रदेशातील संभलमध्ये मशिदीत नमाज पठन करणाऱ्यांची संख्या २० पर्यंत मर्यादित ठेवण्याचा जिल्हा प्रशासनाचा आदेश अलाहाबाद उच्च न्यायालयाने सोमवारी रद्द केला. न्यायालयाने नमाज पठनाच्या वेळी सुरक्षा सुनिश्चित करण्याचे निर्देशही उत्तर प्रदेश सरकारला दिले. न्यायमूर्ती अतुल श्रीधर आणि सिद्धार्थ रंजन यांच्या न्यायासनाने मुनाझीर खान यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना हा निर्णय दिला.

याचिकेत तक्रार करण्यात आली होती की, संभल येथील प्रशासन नमाज पठन करणाऱ्यांची संख्या फक्त २० पर्यंत मर्यादित ठेवत आहे. सुनावणीदरम्यान, दोन्ही न्यायाधीशांनी जिल्हा प्रशासनाच्या निर्बंधांवर आक्षेप घेत संभल प्रशासनाला फटकारले.

# नागपूर कन्व्हेन्शन सेंटरमध्ये बाबासाहेबांचा भव्य पुतळा

◆ **मुंबई, १६ मार्च**

नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेन्शन सेंटर परिसरात लवकरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य पुतळा पुढील २ महिन्यात उभारण्यात येणार असल्याची घोषणा सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी विधानसभेत केली. याचबरोबर येथील विद्यार्थ्यांसाठी एआय-आधारित डिजिटल संशोधन सुविधा सुरू करण्यासाठी ५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही यावेळी सांगितले. या संदर्भात आमदार नितीन राऊत यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना उपस्थित केली असता , त्यावर उत्तर देताना मंत्री शिरसाट यांनी कन्व्हेन्शन सेंटरमधील विविध सुविधांची माहिती दिली. सुमारे १४० कोटी रुपयांच्या खर्चातून उभारण्यात आलेल्या या संकुलात ऑडिटोरियम, बँक्वेट हॉल, प्रशिक्षण हॉल, डॉरमेटरी, मिनी कॉन्फरन्स हॉल आणि गेस्ट रूम आदी सुविधा उपलब्ध आहेत व त्या सध्या पूर्ण क्षमतेने कार्यरत असल्याचे यावेळी सांगितले. भविष्यातील शिक्षण एआय व डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित असणार असल्याने विद्यार्थ्यांसाठी आधुनिक एआय-आधारित सुविधा उभारण्याचा निर्णय घेतल्याचेही मंत्री शिरसाट यांनी सांगितले.नागपूर शहराच्या प्रतिष्ठेला साजेसा उपयोग या संकुलाचा व्हावा यासाठी लोकप्रतिनिधींच्या सूचनांचा विचार करून आवश्यक निर्णय घेतले जातील, असेही त्यांनी नमूद केले.



### आरोग्य योजनांत गैरप्रकार करणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई

राज्यातील ज्या रुग्णालयात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना लागू आहे. परंतु तरीही रुग्णांकडून अतिरिक्त पैसे वसूल करणाऱ्या रुग्णालयावर शासनाने कठोर कारवाई सुरू केली असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. त्याच बरोबर आतापर्यंत अशा ३३८ प्रकरणांमध्ये सुमारे ६०.४७ लाख रुपयांचा दंड आकारण्यात आल्याचेही यावेळी सांगितले. या संदर्भात आमदार नाना पटोले यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला होता. अकोला जिल्हा येथील एका खासगी रुग्णालयाविरुद्ध तपासण्या व शस्त्रक्रियांसाठी रुग्णांकडून पैसे घेतल्याच्या १२ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. याबाबत राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या चौकशीत एका रुग्णास घेतलेले पैसे परत करण्यात आले असून संबंधित रुग्णालयावर कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. उर्वरित ११ तक्रारींवर नोटिसा बजावून चौकशी सुरू असल्याचेही मंत्री आबिटकर यांनी सांगितले.

### गॅसचा काळा बाजार करणाऱ्यांविरुद्ध कारवाई

◆ **मुंबई, १६ मार्च**

मध्य-पूर्व आशियातील तणावपूर्ण परिस्थितीमुळे इंधन पुरवठ्याबाबत देशभरात चर्चा सुरू असताना महाराष्ट्रात एलपीजी गॅसचा पुरवठा सुरळीत असल्याचे राज्य सरकारने स्पष्ट केले आहे. गॅस सिलिंडरचा काळाबाजार थांबवण्यासाठी प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली असून जिल्हास्तरावर दक्षता पथके सक्रिय करण्यात आली आहेत, अशी माहिती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी विधानसभेत दिली. गॅस सिलिंडरच्या अवैध विक्रीला आळा घालण्यासाठी राज्यभरात मोठ्या प्रमाणावर तपासण्या करण्यात येत आहेत. जानेवारी २०२६ ते १५ मार्च २०२६ या कालावधीत २,१२९ ठिकाणी तपासणी मोहीम राबवण्यात आली. या कारवाईत १,२०८ अवैध सिलिंडर जप्त केल्याचे भूजबळ यांनी सांगितले.



### राजू बाविस्करांच्या ‘काळ्यानिळ्या रेषा’ला साहित्य अकादमी पुरस्कार

(पान १ वरून)

पदापुराण (ओडिया), प्रस्थानचतुष्टये ब्रह्मघोषः (संस्कृत), नंदिनी सिधा रेड्डी यांचा अनिमेषा (तेलगू) आणि सफर जारी है (उर्दू) यांचा समावेश आहे.

कादंबरी क्षेत्रातील पुरस्कारासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांमध्ये कर्हीं खेलर साधू (आसामी), द्वंग्नवी लामा म्वन्से गाथ्वन (बोडो), क्रिम्सन स्प्रिंग (इंग्रजी) आणि मायामानुष्यार (मल्याळम) यांचा समावेश आहे.

कथासंग्रह श्रेणीमध्ये दादा सीरिसू तंदे (कन्नड), कांगलामद्रिबा इफूत (मणिपुरी), सेफ्टी किट (पंजाबी), भरखमा (राजस्थानी), मिड बिरना चेन्ने साओन इनाग सगाई (संताली) आणि वाघू (सिंधी) यांना पुरस्कार जाहीर झाला.

निबंधात कोंकणी काव्यमः रुपाणी आणि रुपाकाम (कोंकणी) आणि नेपाळी पारंपारिक संस्कृती रा सभ्यता को डुकुटीचा (नेपाळी) समावेश आहे. साहित्यिक समीक्षेत तामिळ सिरुकथाईन थाडंगल (तामिळ), आठवणीत जीते जी अलाहाबाद (हिंदी) आणि धात्री पात सन गामचा (मैथिली) समावेश आहे.

# इथेनॉलवर चालणाऱ्या स्टोव्हचे संशोधन

### साखर कारखान्याचा प्रयोग यशस्वी





◆ **अहिल्यानगर, १६ मार्च**

अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यात संजीवनी उद्योग समूह आणि शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याने इथेनॉलवर चालणाऱ्या स्टोव्हचे अनोखे संशोधन केले आहे. या संशोधनामुळे इंधणावरील परावलंबित्व कमी होउ शकते. तसेच एलपीजीला पर्याय ठरू शकतो, असे बोलले जात आहे. कोपरगाव तालुक्यातील शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याने यापूर्वी सीएनजी प्लांट उभारून सीएनजी गॅस निर्मिती सुरू केली आहे. त्यानंतर आता या कारखान्याने संजीवनी उद्योग समूहाच्या सहकार्याने व्यावसायिक गॅसला पर्याय शोधण्याचा प्रयत्न केला आहे. पुण्यातील एका संशोधन संस्थेच्या मदतीने इथेनॉलवर चालणाऱ्या स्टोव्हचे संशोधन करण्यात आले आहे.

**... तर सहकार क्षेत्राला मोठा फायदा**

शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन विवेक कोल्हे यांनी सांगितले की, देशात सध्या इथेनॉल निर्मिती मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्यास परवानगी मिळाल्यानंतरही सुमारे १००० कोटी लिटर अतिरिक्त इथेनॉल उपलब्ध आहे. सरकारने इथेनॉल गॅस किंवा इथेनॉलवर चालणाऱ्या स्टोव्हसारख्या संशोधनांना धोरणात्मक परवानगी दिल्यास सहकार क्षेत्राला मोठा फायदा होऊ शकतो.

**केनियामध्ये १५ लाख घरांमध्ये वापर**

कोल्हे पुढे म्हणाले, जर इथेनॉल स्टोव्ह किंवा इथेनॉल गॅसला सरकारने मान्यता दिली तर इंधनाच्या वाहतुकीवर होणारा मोठा खर्च वाचू शकतो. तसेच इंधन आयातीवरील अवलंबित्वही कमी होईल. केनिया सारख्या देशात जवळपास १५ लाख घरांमध्ये अशा प्रकारच्या स्टोव्हचा वापर होत आहे.

# युद्ध संपून शांतता निर्माण व्हावी : हर्षवर्धन सपकाळ

◆ **मुंबई, १६ मार्च**

अमेरिका -इस्त्रायल -इराण यांच्यातील युद्ध लवकर संपून आशियात शांतता निर्माण व्हावी, अशी सदिच्छा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केली आहे.

सपकाळ यांनी आज इराणच्या कॉन्सुलेटला भेट देऊन मुंबईतील इराणचे जनरल सईद रझा मोसायब मोतलाघ यांची भेट घेऊन चर्चा केली. यावेळी त्यांच्यासोबत प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस धनंजय शिंदे आणि सामाजिक कार्यकर्ते फिरोज मिठीबोरवाला उपस्थित होते.

या भेटीनंतर प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, निमंत्रणाच्या अनुषंगाने झालेल्या या भेटीदरम्यान इराणचे सर्वोच्च नेते दिवंगत अयातुल्ला अली खामेनी यांच्या निधनाबद्दल तसेच हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या सैनिक व नागरिक, विशेषता १६५ शाळकरी मुली आणि १४ शिक्षकांबद्दल आणि दोन्ही बाजूच्या मृत्युमुखी पडलेल्यांप्रती शोक संवेदना व्यक्त केल्या.



तासाभराच्या भेटीत भारत आणि इराण यांच्यातील प्राचीन सभ्यतागत संबंधांबद्दलही उल्लेख केला आणि या संबंधांचा भारतीय समाजावर तसेच मराठी भाषा, साहित्य आणि आपसी देवाणघेवाणीवर व संस्कृतीवर झालेल्या प्रभावाबद्दलही चर्चा झाली. खंडित झालेली इंधन पुरवठा साखळी लवकर सामान्य पातळीवर यावी, अशी अपेक्षा देखील व्यक्त केली. मोतलघ यांनी सध्याच्या युद्धपरिस्थितीबद्दल तसेच त्यामागील घटनाक्रमाबद्दल माहिती दिली. तसेच त्यांनी सध्याच्या परिस्थितीबाबत माहिती देत इराणी जनतेने दाखविलेल्या धैर्य आणि चिकाटीबद्दलही भाष्य केले. भारत बुद्धांची व गांधींची भूमी असल्याने जगात शांतता नांदावी अशी भूमिका मांडल्याचे सपकाळ यांनी सांगितले. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मोतलाघ यांना महात्मा गांधी यांचे आत्मचरित्र भेट दिले.

## अग्रलेख...

# आयुधांचा अनाठायी आधार!

संसदेच्या सभागृहाचा कारभार नियमांनुसार चालतो. सत्ताधारी किंवा विरोधकांतील कोणीही पक्ष किंवा सदस्य कितीही ज्येष्ठ असला, त्याच्या पाठीशी कितीही संख्याबळ असले किंवा त्यास कितीही मोठा जनाधार लाभलेला असला, तरी संसदीय कामकाजाच्या नियमांकडे पाठ फिरवून मनमानीपणे त्यास कामकाजात सहभागी होता येत नाही. तथापि, सध्या संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्राच्या कामकाजात जे काही सुरू आहे, ते पाहता, संसदीय कामकाजाच्या शिस्त, संकेत व नियमांचे भान विरोधी पक्षांस आहे किंवा नाही याची शंका येणे साहजिक आहे. सत्ताधाऱ्यांस अडचणीत आणण्यासाठी किंवा धारेवर धरण्यासाठी संसदीय नियमांच्या चौकटीत राहून आक्रमकपणाने कामकाजात सहभागी होणे हे विरोधकांचे कामच असते. मात्र, कामकाजाच्या नियमांचा आधार घेऊन एखादे वैधानिक आयुध उपसायचे आणि ज्या कारणासाठी त्याचा वापर करण्यास संमती मिळालेली असेल त्यापासून भरकटत जाऊन भलतीकडेच ते आयुध चालवायचे असेच काहीसे विरोधी बाकांवरून सुरू असल्याचा जो आरोप होत आहे, ते पाहता, विरोधकांना देशाच्या आणि जनतेच्या हितासाठी संसदेच्या कामकाजाचा मंच वापरावयाचा आहे की केवळ सत्ताधाऱ्यांच्या प्रतिमाहननाचा जुना एककलमी कार्यक्रम राबविण्यासाठी संसदेचा वापर करावयाचा याबाबत शंका यावी अशी स्थिती दिसते. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सत्ताधारी रालोआ यांचे पूर्ण प्रतिमाहनन करणे आणि जनमानसातील त्यांचे स्थान डळमळीत करणे हा विरोधकांचा, विशेषतः काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांचा एकमेव कार्यक्रम असल्याची बाब आता लपून राहिलेली नाही.

येत्या महिनाभरात देशातील पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका पार पडणार आहेत. त्याआधी प्रतिमाहननाचा हा कार्यक्रम नेटाने राबविण्याच्या मोहिमेचाच एक भाग म्हणून, देशाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात महाभियोगाचा प्रस्ताव विरोधकांकडून दाखल करण्यात येत आहे. येत्या ९ एप्रिलपासून ४ मेपर्यंतच्या काळात देशातील केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, आसाम या चार राज्यांच्या आणि पुड्डुचेरी या केंद्रशासित प्रदेशाच्या विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने जाहीर केल्यानंतर आता मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधातील महाभियोगाच्या विरोधकांच्या कृतीस राजकीय महत्त्व प्राप्त झाले असून कोणत्याही प्रकारे सरकारचे व सरकारी वा स्वायत्त यंत्रणांचे प्रतिमाहनन करण्याच्या सातत्यपूर्ण कार्यक्रमाचाच हा एक भाग ठरेल. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राज्यातील मतदारयाद्यांच्या (एसआयआर) सखोल फेरतपासणी मोहिमेच्या विरोधात मुख्य निवडणूक आयुक्तांविरुद्ध थेट संघर्ष पुकारला असून त्याआडून केंद्र सरकारवर प्रतिमाहननाचे हत्यार चालविण्याचा त्यांचा राजकीय हेतू लपून राहिलेला नाही. मुख्य निवडणूक आयुक्त हे एसआयआरचे निमित्त साधून भाजपाच्या फायद्यासाठी काम करत आहेत, असा त्यांचा आरोप असल्याने, गेल्या १५ वर्षांची सत्ता शाबूत ठेवण्यासाठी ममता बॅनर्जी यांनी प्रतिमाहननाचे हे नवे हत्यार उपसून निवडणुका गाजविण्याचे ठरविलेले दिसते. निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होण्याच्या जेमतेम दोन दिवस अगोदर विरोधकांनी संसदेत मुख्य निवडणूक आयुक्तांविरुद्ध महाभियोग चालविण्याची मागणी करणारा प्रस्ताव सादर केला आहे. देशाच्या इतिहासात बहुधा प्रथमच, मुख्य निवडणूक आयुक्तांच्या विरोधात दाखल होणाऱ्या महाभियोग प्रस्तावावरील चर्चेच्या निमित्ताने पुन्हा एकदा संसदेच्या मंचावर सत्ताधाऱ्यांच्या प्रतिमहननाची मोहीम तीव्र करण्याचा विरोधकांचा हेतू आहे का, हे काळाच्या ओघात पुन्हा स्पष्ट होणारच आहे. पण त्याचा आगामी निवडणुकांमध्ये राजकीय लाभ उठविण्याच्या त्यांचा प्रयत्न असेल हे मात्र आता स्पष्ट झाले आहे.

या चारही राज्यांतील राजकारण हे केवळ विचारधारांवर नाही, तर तेथील खोलवर रुजलेल्या जातीय आणि धार्मिक समीकरणांवरही आधारित आहे. प्रत्येक राज्याची सामाजिक संरचना वेगळी असल्याने त्यांचा निवडणुकीवरील प्रभावही भिन्न असतो. तामिळनाडूचे राजकारण तर देशातील अन्य राज्यांपेक्षा वेगळे आहे. येथे द्रविडी चळवळीतून सत्ताकारणाचा पाया रचला गेला आहे. द्रविडी अस्मिता आणि ओबीसी राजकारण ही या राज्याच्या सत्तेची सूत्रे आहेत. त्यातूनच ब्राह्मण व ब्राह्मणेतर अशा जातीय संघर्षास खतपाणी घातले गेले. लोकसंख्येच्या प्रमाणात जातीय प्रभाव असलेला ओबीसी समुदाय, वन्नियार समुदाय, थेवर, गोंडर आदी समुदायांची ताकद पाठीशी उभी करण्यासाठी या संघर्षाचा वापर केला जातो. दलित समुदायाची मतेही प्रभावी असल्याने, आरक्षण हादेखील येथील कळीचा मुद्दा राहिला आहे. जो पक्ष या समुदायांस गोंजारतो, तो सत्तेच्या जवळ जातो हा या राज्याच्या सत्ताकारणाचा इतिहास राहिला आहे. केरळच्या राजकारणासही जातींच्या राजकारणाचे कंगोरे आहेत. सुमारे ४५ टक्के अल्पसंख्यक समुदायाचे पाठबळ मिळविणे आणि हिंदू समुदायांतील प्रभावी गटांना गोंजारणे ही येथील निवडणुकीची राजनीती असते, तर आसाममध्ये स्थानिक व उपरे यावर प्रादेशिक व वांशिक अस्मिता जोपासली जाते. त्यामुळे धार्मिक, जातीय ध्रुवीकरण हा या राज्यांच्या सत्ताकारणाचा केंद्रबिंदू राहिला आहे. पश्चिम बंगालमध्ये डाव्यांच्या दीर्घ सत्ताकाळात लपून राहिलेली जातीय समीकरणे ममता सरकारच्या सत्ताकारणात फोफावली आणि एसआयआरच्या निमित्ताने आता या समीकरणांची मोडतोड होण्याची भीती निर्माण झाल्याने, महाभियोगाच्या प्रस्तावाचे हत्यार निवडणुकीत वापरले जाईल. कारण या पाच राज्यांपैकी पश्चिम बंगाल, केरळ आणि तामिळनाडू या राज्यांमध्ये विरोधकांची मजबूत सत्ताकेंद्रे प्रस्थापित झालेली आहेत. आसामवर गेल्या १० वर्षांपासून भाजपाचा झेंडा आहे आणि या राज्याची सत्ता कायम राखण्यासाठी भाजपची मजबूत मोर्चेबांधणी सुरू राहणार आहे. बंगालमध्ये ममता बॅनर्जींच्या तृणमूल सरकारला सत्तेवरून खेचण्यासाठी भाजपने सारी ताकद पणाला लावली आहे, तर केरळ आणि तामिळनाडूमध्ये ताकद वाढविण्यावर भाजपाचा भर राहणार आहे. २०१९ मध्ये भाजपची पश्चिम बंगालमधील स्थिती सुधारली होती. मात्र तृणमूल काँग्रेसच्या आक्रमक राजकारणाने भाजपची वाटचाल खडतर राहिली. आता सलग चौथ्यांदा राज्याची सत्ता हस्तगत करण्यासाठी ममता बॅनर्जी यांनी सुरू केलेल्या प्रयत्नांना मुख्य निवडणूक आयुक्तांविरुद्धचा महाभियोग प्रस्ताव आणि मतदारयाद्या अद्ययावतीकरणातून वगळलेल्या नावांचे राजकारण साथ देणार का, हा कळीचा मुद्दा ठरणार आहे. कोलकाता येथे घडलेले आरजी कार इस्पितळ बलात्कार प्रकरण हे ममता सरकारसमोरील आव्हान ठरणार आहे. मात्र, या राज्यातील जवळपास २७ टक्के मुस्लिम समुदायाच्या मनात असुरक्षिततेची भावना पेरण्याच्या राजकारणातून भाजपाविरोधाची हवा तापविण्याचा त्यांचा प्रयत्न राहणार हे स्पष्ट आहे.

मतदारयाद्यांच्या सखोल तपासणी मोहिमेमुळे एकही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहणार नाही आणि एकाही अपात्र व्यक्तीस मतदान करता येणार नाही अशी कठोर भूमिका निवडणूक आयोगाने घेतल्याने पश्चिम बंगालमधील मतदारयाद्यांमधून जवळपास ६३ लाख नावे वगळली गेली आहेत. आणखी सुमारे ६० लाख नावांचे भवितव्य पणाला लागलेले आहे. हा ममता बॅनर्जी यांच्या प्रस्थापित राजकारणास मोठा धक्का मानला जातो. त्यामुळेच, महाभियोग प्रस्ताव आणि एसआयआरद्वारे सुरू झालेली मतदार छाननी या दोन बाबी निवडणूक प्रचारातील भाजपच्या प्रतिमाहननाच्या मोहिमेत केंद्रस्थानी राहाव्यात असा प्रयत्न राहील. याआधीच्या निवडणुकांत मतदान यंत्रांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्हे उमटविण्याचा प्रयत्न झाला होता. मतदारयाद्यांतील घोळाचे भांडवल करून सत्ताधारी भाजपा व निवडणूक आयोगास घेरण्याचा प्रयत्न झाला होता. आता महाभियोगाचे आयुध उगारून नव्या प्रयत्नासाठी सज्ज होण्याचा प्रयत्न विरोधकांच्या तंबूत सुरू झाला आहे. अशा राजकारणात, लोकशाहीचे पवित्र मंदिर असलेल्या संसदेच्या कामकाजास वेठीस धरले जाऊ नये ही सामान्य नागरिकांची अपेक्षा उपेक्षित राहता नये!

## आंतरराष्ट्रीय

# जगावर दीर्घकालीन युद्धाची सावली

प्रा. जयसिंग यादव

इराण आणि अमेरिका यांच्यात वाढत चाललेला संघर्ष केवळ दोन राष्ट्रांमधील लष्करी चकमकींपुरता मर्यादित नाही. या संघर्षात दोन्ही बाजूंनी लढाई दीर्घकाळ सुरू ठेवण्याचा व्यक्त केलेला निर्धार, त्यामागील सामरिक गणित, भूतकाळातील अनुभव आणि जागतिक परिणाम यांचा विचार केल्यास हा प्रश्न केवळ प्रादेशिक राहात नाही, तर संपूर्ण जगाच्या स्थैर्यावर परिणाम करणारा ठरतो. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या देशाकडे प्रचंड शस्त्रसाठा असल्याचा दावा करत युद्ध दीर्घकाळ चालवण्याची क्षमता असल्याचे संकेत दिले आहेत. दुसरीकडे, इराणनेही किमान सहा महिने युद्ध सुरू ठेवण्याचा इशारा दिला आहे. या दोन घोषणांमधून स्पष्ट होते की संघर्ष तात्पुरता किंवा मर्यादित राहील, अशी अपेक्षा करणे अवास्तव ठरू शकते. आधुनिक युद्धात निर्णायक विजय पटकन मिळत नाही; उलट दीर्घकालीन संघर्ष हीच अधिक सामान्य बाब बनली आहे. लष्करी शक्तीच्या दृष्टीने पाहता अमेरिका जगातील सर्वांत सामर्थ्यशाली राष्ट्र मानले जाते. तिच्याकडे अत्याधुनिक हवाई दल, नौदल, क्षेपणास्त्र तंत्रज्ञान आणि जगभर पसरलेले लष्करी तळांचे जाळे आहे. याउलट इराणकडे अमेरिकेसारखी प्रचंड पारंपरिक लष्करी क्षमता नसली, तरी त्याने असीमित युद्धतंत्र विकसित केले आहे. बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे, ड्रोन तंत्रज्ञान, प्रादेशिक मित्रगट आणि समुद्री मार्गांवर प्रभाव टाकण्याची क्षमता या माध्यमातून तो आपल्या तुलनेने कमी साधनसामग्रीतून मोठ्या शक्तीला आव्हान देऊ शकतो.

अमेरिकेच्या लष्करी इतिहासाकडे पाहिले असता एक महत्त्वाची बाब लक्षात येते. प्रचंड शक्ती असूनही तिला काही वेळा तुलनेने लहान किंवा कमी शक्तिशाली राष्ट्रांविरोधात अपेक्षित यश मिळालेले नाही. याचे सर्वांत मोठे उदाहरण म्हणजे व्हिएतनाम युद्ध. तांत्रिक आणि लष्करी वर्चस्व असूनही अमेरिकेला दीर्घकाळ चाललेल्या संघर्षानंतर माघार घ्यावी लागली. त्याचप्रमाणे अफगाणिस्तानमध्ये दोन दशके ठाण मांडूनही शेवटी अमेरिकेवर माघारीची नामुष्की ओढवली. अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष दीर्घकाळ चालल्यास दोन्ही देशांना किंमत चुकवावी लागेल. अमेरिकेसाठी सर्वांत मोठा प्रश्न आर्थिक आणि सामरिक संसाधनांचा असेल. जगभर अनेक लष्करी जबाबदाऱ्या सांभाळताना आणखी एक मोठा संघर्ष टिकवून ठेवणे हे तिच्यासाठी आव्हानात्मक ठरू शकते. इराणसाठीही परिस्थिती सोपी नाही. आंतरराष्ट्रीय निर्बंध, मर्यादित आर्थिक साधने आणि आधीच दबावाखाली असलेली अर्थव्यवस्था यामुळे दीर्घ युद्ध देशांतर्गत संकटे वाढवू शकते. म्हणजेच, या संघर्षात जिंकणारा कोणी असला, तरी तो पूर्णपणे निष्कलंक राहणार नाही. दोन्ही बाजूंना मोठी मानवी, आर्थिक आणि राजकीय किंमत मोजावी लागेल. या संघर्षाचा परिणाम केवळ मध्यपूर्वेपुरता मर्यादित राहणार नाही. विशेषतः ऊर्जा बाजारपेठेवर त्याचा मोठा प्रभाव पडू शकतो.



मध्यपूर्व हा तेलपुरवठा करणारा जगातील सर्वांत महत्त्वाचा प्रदेश आहे. येथे अस्थिरता वाढल्यास जागतिक तेलदर वाढण्याची शक्यता असते. याचा थेट परिणाम जगातील अर्थव्यवस्थांवर होतो. याशिवाय जागतिक राजकारणातही नव्या समीकरणांची निर्मिती होऊ शकते. रशिया आणि चीन यासारखी राष्ट्रे या संघर्षाचा फायदा घेऊन आपले सामरिक हितसंबंध मजबूत करण्याचा प्रयत्न करू शकतात. युक्रेन दीर्घकाळापासून रशियाच्या तुलनेत कमी शस्त्रे आणि कमी सैनिक असूनही कडवी लढत देत आहे. तरीदेखील शस्त्रांचा साठा आणि पुरवठा युद्धात महत्त्वाची भूमिका बजावतात. इस्रायल-अमेरिका आणि इराण यांच्यातील या संघर्षाच्या सुरुवातीलाच हल्ल्यांची गती अत्यंत वेगवान राहिली आहे. दोन्ही बाजू ज्या वेगाने शस्त्रांचा वापर करत आहेत, त्या वेगाने त्यांचे उत्पादन होत नाही. 'इन्स्टिट्यूट फॉर नॅशनल सेक्युरिटी स्टडीज' (आयएनएसएस) च्या अंदाजानुसार, अमेरिका आणि इस्रायल यांनी आतापर्यंत दोन हजारपेक्षा अधिक हल्ले केले आहेत. त्यात विविध प्रकारची शस्त्रे वापरण्यात आली आहेत. 'आयएनएसएस'च्या मते, इराणने आतापर्यंत ५७१ क्षेपणास्त्रे आणि १,३९१ ड्रोन डागले आहेत. त्यापैकी अनेक हवेतच पाडण्यात आले; मात्र या पातळीवरील लढाई दीर्घकाळ चालू ठेवणे दोन्ही बाजूंसाठी कठीण ठरणार आहे. इराणचे शाहीद १३६ ड्रोन कमी उंचीवर उडतात आणि ते रडारवर ओळखणे कठीण असते. हे ड्रोन सुमारे २५०० किलोमीटर अंतरावर लक्ष्य भेदू शकतात.

पाश्चिमात्य देशांच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे, की इराणकडून डागल्या जाणाऱ्या क्षेपणास्त्रांच्या संख्येत आधीच घट दिसू लागली आहे. युद्धाच्या पहिल्या दिवशी शेकडो क्षेपणास्त्रे डागली गेली होती. ती आता कमी झाली आहेत. युद्धापूर्वी असा अंदाज व्यक्त केला जात होता, की इराणकडे दोन हजारांपेक्षा अधिक कमी पल्ल्याच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांचा साठा आहे. कोणताही देश आपल्या शस्त्रसाठ्याची अचूक संख्या सार्वजनिक करत नाही. कारण त्यामुळे शत्रूला माहिती मिळू शकते. अमेरिकेचे वरिष्ठ लष्करी अधिकारी डॅन केन यांनी सांगितले की युद्धाच्या पहिल्या दिवसाच्या तुलनेत इराणकडून होणाऱ्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्र प्रक्षेपणात ८६ टक्के घट झाली आहे. 'युनायटेड स्टेट्स सेंट्रल कमांड' (सेंटकॉम) च्या मते, केवळ मागील २४ तासांमध्येच त्यात २३ टक्क्यांची घट नोंदवली गेली आहे. युद्धापूर्वी असेही मानले जात होते, की इराणने हजारो 'वन-वे अॅटॅक' प्रकारचे ड्रोन तयार करून ठेवले आहेत. त्याने रशियालाही हे तंत्रज्ञान दिले असून ते युक्रेनमध्ये त्याचा वापर करत आहेत. अमेरिकेनेही या डिझाईनची नक्कल केली आहे; मात्र जनरल केन यांच्या मते, संघर्षाच्या पहिल्या दिवसानंतर इराणच्या ड्रोन हल्ल्यांमध्ये ७३ टक्क्यांची घट झाली आहे. यावरून असे दिसते, की इराणला मोठ्या वेगाने हल्ले सुरू ठेवण्यात अडचणी येत आहेत. तथापि असेही शक्य आहे की इराण आपला शस्त्रसाठा वाचवण्यासाठी जाणीवपूर्वक हल्ले कमी करत असावा; पण उत्पादन सुरू ठेवणे आता अधिक कठीण होऊ शकते, कारण अमेरिका आणि इस्रायलची लढाऊ विमाने आता इराणवर हवाई वर्चस्व प्रस्थापित करत आहेत.

इराणची बहुतेक हवाई संरक्षण व्यवस्था नष्ट झाली असून त्याची वायुसेना प्रभावी राहिलेली नाही. 'सेंटकॉम'च्या मते, युद्धाचा पुढील टप्पा आता इराणचे क्षेपणास्त्र आणि ड्रोन लाँचर, शस्त्रसाठे, शस्त्र उत्पादन कारखान्यांना लक्ष्य करण्यावर केंद्रित असेल. यामुळे अमेरिका आणि इस्रायलसाठी इराणची लढण्याची क्षमता कमकुवत करणे सोपे होऊ शकते; मात्र त्याचा संपूर्ण शस्त्रसाठा नष्ट करणे कठीण असेल. इराणचे क्षेत्रफळ फ्रान्सच्या तुलनेत जवळजवळ तीनपट मोठे आहे. त्यामुळे शस्त्रे जमिनीखाली लपवणे शक्य आहे. अलिकडील इतिहासाकडे पाहिले, तर केवळ हवाई हल्ल्यांद्वारे युद्ध पूर्णपणे जिंकणे शक्य होत नाही, असे दिसते. तीन वर्षांहून अधिक काळ चाललेल्या तीव्र बॉम्बहल्ल्यांनंतरही इस्रायलला गाझा पट्टीत 'हमास'ला पूर्णपणे नष्ट करता आलेले नाही. त्याचप्रमाणे येमेनमध्ये हुती बंडखोरही एका वर्षाच्या अमेरिकी बॉम्बहल्ल्यांनंतर टिकून राहिले. अमेरिकेकडे जगातील सर्वांत शक्तिशाली सैन्य आहे. तिच्याकडे इतर कोणत्याही देशापेक्षा पारंपरिक शस्त्रांचा मोठा साठा आहे; मात्र अमेरिकी सैन्य प्रामुख्याने महाग आणि अत्यंत अचूक मार्गदर्शित शस्त्रांवर अवलंबून असते. त्यांचे उत्पादन मर्यादित प्रमाणात होते. ट्रम्प यांनी संरक्षण कंपन्यांची बैठक बोलावली आहे. अमेरिकेच्या संसाधनांवरही काही प्रमाणात दबाव असल्याचे संकेत मिळतात. अमेरिका महागड्या आणि लांब पल्ल्याच्या 'टॉमहॉक क्रूझ मिसाईल' ऐवजी तुलनेने स्वस्त शस्त्रांचा वापर करत आहे. अमेरिकी वायुसेना आता 'जेडीएएम' बॉम्बचा वापर करत आहे. अमेरिका दरवर्षी सुमारे ७०० क्षेपणास्त्रे तयार करते. इराण सतत बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागत राहिला, तर हा मर्यादित साठा वेगाने कमी होऊ शकतो. अमेरिकेकडे सुमारे १६०० पॅट्रियट क्षेपणास्त्रांचा साठा असू शकतो; परंतु अलिकडील काळात तो कमी झाला असावा. ट्रम्प यांनी पॅट्रियट क्षेपणास्त्रांचा साठा कमी करण्याचा धोका स्वीकारल्यास अमेरिका इराणविरुद्धच्या युद्धात अधिक काळ टिकू शकते; मात्र त्यामुळे प्रशांत महासागर क्षेत्रातील संभाव्य संघर्षाचा धोका वाढू शकतो.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

# वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प जलसंजीवनी

नितीन शिरसाट

भारतासारख्या कृषिप्रधान देशात अन्नधान्याची उत्पादकता सिंचन सुविधेवर अवलंबून आहे. तसेच महाराष्ट्र हे औद्योगिकदृष्ट्या अग्रेसर राज्य असून अस्तित्वातील व नव्याने प्रस्तावित उद्योगासाठी पाण्याची मागणीही मोठ्या प्रमाणात आहे. महाराष्ट्रात दरवर्षी लाखो लिटर पाणी वाहून समुद्रात जाते तर दुष्काळामुळे मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्र होरपळून निघतो. पाणीटंचाईमुळे कृषी उत्पादनावर वाईट परिणाम होत असतो. नागरी क्षेत्रांमध्ये पिण्याच्या पाण्याचा तुटवडा जाणवतो. पाण्याच्या अल्प पुरवठ्यामुळे शेतकऱ्यांना व शेतीला मोठ्या प्रमाणावर संकटांचा सामना करावा लागतो. या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी नदीजोड प्रकल्प एक महत्त्वपूर्ण उपाय आहे. या प्रकल्पाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे पाणीटंचाई असलेल्या भागांमध्ये पाणीपुरवठा सुधारणे, त्याद्वारे एक नदी दुसऱ्या नदीला जोडली जाऊन पाण्याचे वितरण अधिक सुलभ होईल. प्रकल्पाच्या माध्यमातून विविध भागांमध्ये सिंचनाची व्यवस्था सुधारणे, विशेषतः जिथे पाण्याची कमतरता आहे. यामुळे शेतकऱ्यांना अधिक पाणी मिळेल आणि शेती व्यवसायाला अधिक चालना मिळेल. नदीजोड प्रकल्पामुळे जलसंचय करण्याची क्षमता वाढवता येईल, ज्यामुळे पाऊस कमी पडला तरी पाणी उपलब्ध राहील. हे कृषी उत्पादनावर सकारात्मक प्रभाव पाडू शकते. दिवसेंदिवस बदलत्या हवामानामुळे पर्जन्याचे प्रमाण विषम स्वरूपाचे झाले असून, काही भागांत अतिवृष्टी, तर काही भागांत दुष्काळी परिस्थिती निर्माण होते. हे चित्र बदलण्यासाठी नदीजोड प्रकल्प महत्त्वाचा आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार, तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने या नदीजोड प्रकल्पाला गती देण्यासाठी, विदर्भातील शेतकऱ्यांसाठी जलसंजीवनी ठरणाऱ्या वैनगंगा-नळगंगा प्रकल्पासाठी ९४ हजार ९६८ कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केली आहे. या प्रकल्पामुळे विदर्भातील शेतकऱ्यांची शेती सिंचनाखाली येणार आहे. राज्य सरकारने या नदीजोड प्रकल्पासाठी अर्थसंकल्पात केलेल्या आर्थिक तरतुदीचे स्वागत केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले आहे. भारत सरकारच्या जलसंधारण नदी विकास व गंगा संरक्षण मंत्रालय यांच्या राष्ट्रीय जलविकास अभिकरणाला जलसंपदा विभागाने वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाला हिरवी झेंडी दिली. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती कार्यालयाकडून आवश्यक त्या परवानगी देत सर्वेक्षण करण्यात आले आहे. जवळपास ३ लाख ७१ हजार २७७ हेक्टरवर हा भव्य नदी जोड प्रकल्प उभारण्यात येणार आहे. देशातील जवळपास १४६ जलाशये ही महत्त्वाची आहेत. देशातील शेतकऱ्यांना पाणीटंचाईच्या समस्येपासून दूर ठेवायचे असल्यास नदीजोड योजना अमलात आणण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने देशात नदीजोड प्रकल्प सर्वेक्षण सुरू आहे. यामध्ये राज्यातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाचा समावेश करण्यात आलेला आहे. या प्रकल्पामुळे विदर्भातील भंडारा, नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला आणि बुलडाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ होणार असून हा प्रकल्प शेतकऱ्यांना नवसंजीवनी देणारा ठरणार आहे. विदर्भाला सुजलाम सुफलाम करणाऱ्या वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाला केंद्र सरकारने मान्यता प्रदान केली असून या प्रकल्पाचे सर्वेक्षणाचे काम झाले आहे. वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पामुळे बहुतांश भाग पाण्याखाली येणार आहे. या प्रकल्पामुळे नद्यांना येणाऱ्या पुरांच्या पाण्याचे नियोजन होऊन त्याचा फायदा शेतकरी, उद्योगधंद्याला होणार आहे. केंद्र सरकारने या नदीजोड प्रकल्पाला मान्यता दिली आहे. ६० टक्के निधी केंद्र सरकारचा, तर ४० टक्के निधी हा राज्य सरकारचा राहणार आहे. वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाला मंत्रिमंडळाने अंर्थसकल्पात मान्यता दिली आहे. बुलढाणा जिल्ह्याच्या वाट्याला तब्बल १४० दलघमी म्हणजेच पाच टीएमसी पाणी येणार आहे. या पाण्यातून नळगंगा धरण भरून घेण्यासोबतच खामगाव तालुक्यातील कोलोरी व सेलोडी येथे प्रकल्प उभारून नदीजोड प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणारा आहे. प्रकल्पाचा गेल्या ४० वर्षांचा अभ्यास केल्यानंतर प्रकल्पाची जवळपास ३७.५८ दलघमी पाण्याची तूट निघत असल्याचे स्पष्ट झाले होते. परिणामी गोदावरी, प्राणहिता आणि वैनगंगा नदी परिसरातील अतिरिक्त ९६ टीएमसी पाण्याचे नियोजन करून ते नळगंगा प्रकल्पात आणण्याचे नियोजन झाले. १९८० च्या राज्यातील अवर्षणप्रवण तालुक्यांच्या यादीत मोताळा तालुक्याचा समावेश आहे. सिंचनाचा टक्का वाढण्यास मदत होणार आहे. वैनगंगा-नळगंगा प्रकल्प जलतज्ज्ञांनी शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करून पत्रकार परिषदेच्या माध्यमातून नदीजोड प्रकल्पाच्या समस्या दूर करून प्रकल्प मंजुरीसाठी प्रयत्न केले आहेत. या निर्णयामुळे विदर्भातील अनेक जिल्ह्यांतील सिंचन क्षमतेमध्ये वाढ होऊन लाखो हेक्टर जमीन ओलिताखाली येऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भरघोस वाढ होऊन शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे.

९८८१७१७८२८

## इतस्ततः

# महिलांनी घडवलेली तेलंगणातील 'वनक्रांती'!

दत्तात्रेय आंबुलकर

तेलंगणा सरकारच्या महिलांना वन विभाग आणि वन-क्षेत्रात अधिकारी पदावर नेमण्याच्या भूमिकेला आज परिणामकारक फळे आलेली दिसतात. याचा मुख्य परिणाम म्हणजे, तेलंगणामधील महिला वन अधिकारी आज अत्यंत मर्यादित संसाधने व साधनसामग्रीसह वन-क्षेत्राशी संबंधित व अत्यंत जिव्हाळ्याच्या अशा वन-अतिक्रमण, अवैध कब्जा, वनसंपत्तीतील महत्त्वाच्या अशा लाकडाची तस्करी, अवैध वाळू व्यवसाय, वाहतूक व वनसंवर्धनाच्या जोडीलाच वन-संरक्षण व वन्यजीवांच्या मानवीय वस्तीतील होणाऱ्या उपद्रवावर नियंत्रण ठेवण्याचे काम प्रकर्षाने करीत आहेत. मुख्य म्हणजे, हे काम या महिला परंपरागत नक्षलप्रभावित भागांमध्ये करीत असल्याने त्यांचे यश अधिक प्रकर्षाने जाणवते.

तेलंगण राज्य वन अकादमीच्या संचालिका एस. जे. आशा यांच्यानुसार, राज्यातील महिला वन कर्मचारी व अधिकाऱ्यांनी मिळविलेले यश हे त्यांचे निर्धारपूर्वक केलेले प्रयत्न आणि त्यांना देण्यात येणारे विशेष प्रशिक्षण यांचा संयुक्त सफल परिणाम म्हणावा लागेल. त्यांच्या मते, वन अकादमीतर्फे राज्यातील महिला प्रशिक्षणार्थींना वन-क्षेत्रातील अत्यंत प्रतिकूल स्थितीत राहणे, त्यादरम्यान आत्मसंरक्षणाशिवाय जंगल क्षेत्रातील रहिवाशांना संरक्षणासाठी सिद्ध करणे, सर्पदंशासारख्या वारंवार होणाऱ्या घटनांवर तातडीने उपाययोजना करणे, पोलिस खात्याशी समन्वय राखणे आदी अनेक बाबींचा समावेश असतो. विशेषतः महिला वनअधिकाऱ्यांच्या या प्रयत्न आणि पुढाकाराला वन-क्षेत्रातील वनवासी महिलांसह सर्वसाधारणपणे सर्वच नागरिकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत असला, तरी त्यासाठी या महिला वन अधिकाऱ्यांना मोठ्या अग्निदिव्यातून जावे लागते, हेदेखील तेवढेच खरे. पुढील प्रमुख घटना व अनुभवातून हीच बाब सिद्ध होते.

वन अधिकारी अप्सरामुनीसा यांच्या मते, त्यांच्या कार्यक्षेत्रातील भूपतपूर परिसरात वन्यप्राण्यांची शिकार करून त्यांची तस्करी करून, त्याद्वारे पैसा मिळविण्याचे प्रकार सर्रासपणे होत असत. यामध्ये शिकारी-तस्करांनी स्थानिक ग्रामीण-वनवासींना पैशाच्या लोभातून सहभागी करून घेतले होते. त्यांनी स्थानिक वनवासींना विश्वासात घेतले. त्यांना वन आणि वनसंपत्तीच्या संरक्षणासाठी वन-वनवासींच्या जोडीलाच वन्यजीवांचे महत्त्व समजून सांगितले. या प्रकरणी तस्कर-मंडळी वनवासींच्या भोळेभाबडेपणाचा फायदा घेऊन अल्प रक्कम देऊन सर्वांचेच शोषण कसे करतात, ते नीट समजावून सांगितले. ही मात्रा लागू पडली व भूपतपूर वन-क्षेत्र परिसरातील अवैध शिकारी व तस्करीला कायमचा आळा बसला. एवढेच नव्हे, तर अप्सरामुनीसा व त्यांच्या सहकारी वनकर्मचाऱ्यांनी केलेल्या प्रयत्नांच्या परिणामी वेगवेगळ्या ठिकाणी पकडून जप्त केलेल्या लाकूड व तत्सम वनसंपत्तीच्या सरकारी लिलावातून शासकीय तिजोरीत सुमारे ४.५ कोटी राशींची भर पडली. तेलंगणा शासनाच्या वनसेवा विभागात महिलांची संख्या लक्षणीय स्वरूपात आहे. वनसंरक्षण विभागाच्या संदर्भातच सांगायचे म्हणजे, या विभागातील कर्मचाऱ्यांच्या एकूण संख्या व टक्केवारीच्या तुलनेत महिलांची संख्या ४३ टक्के आहे. त्यातही प्रत्यक्ष वन-क्षेत्रात आघाडीवर व जोखीम-जबाबदारीसह काम करणाऱ्यांची संख्या ३१ टक्के आहे. वन-क्षेत्रातील महिला कर्मचाऱ्यांचे प्रमाण आणि टक्केवारी यांचे विविध संदर्भात सकारात्मक परिणाम पण दिसू लागले आहेत. तेलंगणाच्या सर्वाधिक वन व हरित क्षेत्रफळासाठी प्रसिद्ध असणाऱ्या मुलुगू या जिल्ह्यात सुमारे ६८ टक्के जमीन ही वन-क्षेत्र वा हरितपट्टा या क्षेत्रामध्ये मोडते. महिला वन अधिकारी व कर्मचारी यांचे प्रयत्न सक्रिय सहभागाद्वारे गेल्यावर्षी अतिवृष्टी व नैसर्गिक प्रकोपामुळे मोठे नुकसान झालेल्या ३०२ हेक्टर परिसरातील वन आणि वनसंपत्तीचे विक्रमी वेळात पुनर्रोपण करण्याचा प्रयोग नुकताच यशस्वी करण्यात आला. वन-क्षेत्र व वन विभागात अकल्पित व अकस्मातपणे मोठी आपत्ती निर्माण होते व गरजेनुरूप त्यावर तोडगा काढावा लागतो. मोठी जोखीम घेऊन जीवाची बाजी लावावी लागते. यामध्ये आपत्कालीन तातडीच्या उपायांपासून सार्वत्रिक संतुलन साधणे, पुढाकार घेऊन परिस्थिती हाताळणे व त्यावर तोडगा काढणे इथपासून प्रसंगी शारीरिक सिद्धतेसह केलेली कारवाई व त्याच्याच जोडीला वेळेत व आवश्यक अशी प्रशासनिक-वैधानिक वा न्यायालयीन कारवाई करावी लागते. ही सारी आवश्यक कौशल्ये तेलंगणामधील महिला वनअधिकाऱ्यांनी पुरेशा व पुरतेपणी आत्मसात केली आहेत, हे विशेष.

राज्यस्तरावरील पृष्ठभूमी नमूद करताना, तेलंगणा राज्याचे वन विभागप्रमुख एस. चंद्रप्पागिरी नमूद करतात की, राज्यात वनसंरक्षण व वन्य व्यवस्थापन हे क्षेत्र परंपरागतरीत्या पुरुषप्रधान व पुरुषांच्याच प्रभावळीतील होते. मात्र, गेल्या दशकात राज्य सरकारने नियोजनपूर्वक पद्धतीने या क्षेत्रात महिलांचा केवळ विचारच केला असे नव्हे, तर त्यांचा प्राधान्याने विचार केला. या संदर्भात विशेष धोरण अंगीकारण्याचा पुढाकार तेलंगणानेच घेतला. परिणामी, वन विभागात महिला कर्मचारी-अधिकाऱ्यांची नेमणूक वाढत्या प्रमाणात होऊ लागली. त्या अग्रक्रमाने व प्रसंगी आव्हानपर कामे यशस्वीपणे करू लागल्याचे आश्वासक चित्र निर्माण झाले, हे विशेष. या महिला वनअधिकाऱ्यांना मोठ्या जोखमीची कामे नेहमीच करावी लागतात. या संदर्भातील वनअधिकारी एम. रेणुका यांच्या अनुभवानुसार वन-क्षेत्रात अवैध तस्करीतून अवैध वनकटाई-तस्करी यांसारख्या अनधिकृत कृत्यांवर नेहमीच कारवाई करावी लागते व त्यासाठी त्यांना प्रसंगी सशस्त्र व शारीरिक विरोधाची पण तयारी करावी लागते. पसरा वन-क्षेत्राच्या अधिकारी माधवी जे. एस. यांच्यानुसार त्यांच्या वन-क्षेत्रात सुमारे २० हजार हेक्टर्सचे घनदाट जंगल असून, त्यांचा लाकडासह विविध उत्पादनांच्या तस्करीचा मुकाबला सर्वशक्तीसह व नेहमीच करावा लागतो. या पृष्ठभूमीवर तेलंगणाचे मुख्य संरक्षक एस. चंद्रप्पागिरी नमूद करतात की, राज्यात शासकीय विभागांतर्गत महिला अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेच्या संदर्भात महिलांनी आघाडी घेतली असून, ही बाब त्यांच्यासह राज्याच्या एकूणच प्रशासन व प्रशासकच नव्हे, तर महिलांसह जनसामान्यांसाठी प्रेरणादायी ठरली आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### आपलं गावच गड्या बरं...

आपला भारत देश हा विविधतेने आणि समृद्धीने नटलेला असा संपन्न देश आहे. सर्व जाती-धर्माचे लोक गुण्यागोविंदाने कितीतरी वर्षांपासून सोबत राहत आलेली आहेत. आजही जगामध्ये भारताकडे एका आदर्शवत नजरेने पाहिले जाते. भारताला या स्थितीपर्यंत आणण्यासाठी आपल्या महापुरुषांनी मोठा त्याग केला आणि त्याचे फलित म्हणून आज भारत हा जगामध्ये आपल्या विविधतेमुळे ओळखला जातो. अशा या आदर्श भारताचा कणा हा आजही गावांमध्येच आहे. समृद्धीच्या वाटा गावातूनच वाहतात. समाधान म्हणजे काय असते हे जर शोधायचे असेल तर गावाकडेच जावे लागते. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी गावाकडे चला असा मूलमंत्र दिला होता. जगाने कोरोनासारखी महामारी अनुभवली. संपूर्ण जग बंद पडलेले असताना, नोकरदार वर्गाला शहराने तर दूर लोटले; मात्र गावांनीच त्यांना आपल्या जवळ केले. आज जगामध्ये आखाती देश युद्धाच्या सावटाखाली आहेत. त्याचा परिणाम इतर देशावर होत असून मोठ्या प्रमाणात इंधन तुटवडा जाणवत आहे. काही दिवसापूर्वी डिझेल आणि पेट्रोलचा भारता जवळचा साठा संपला अशी अफवा पसरली आणि एकच खळबळ देशामध्ये उडाली. मात्र सरकारने या स्थितीला योग्यरीत्या हाताळणी आणि परिस्थिती आटोक्यात आणली.

पेट्रोल डिझेल नंतर आता एलपीजी घरगुती गॅसचा तुटवडा देशात मोठ्या प्रमाणात पडल्याची स्थिती आहे. एलपीजी मिळविण्यासाठी ग्राहकांच्या प्रचंड रांगा एजन्सी पुढे लागत आहेत. यामुळे अवैध साठवणूक करून त्याची जादा दराने विक्री करणाऱ्यांचे चांगभले होत आहे. अनेक ठिकाणी तर खेड्याप्रमाणे चुली व शेगड्या अडगळीत पडलेल्या ठिकाणाहून बाहेर आलेल्या आहेत. आणि त्यांनी गॅसची जागा घेतली. पुन्हा एकदा कोविडप्रमाणे आपले गावच बरे होते इकडे असे म्हणण्याची वेळ नागरिकांवर आलेली आहे. तंत्रज्ञानाने कितीही प्रगती केली तरी शेवटी गावाकडेच सर्व समस्यांची उपाय आहे हे पुन्हा एकदा दिसून आले.

**मोहन कळमकर**

## वाचक पत्रे

### सर्व विषयांना स्पर्श करावा

पुण्यातील महिला शिक्षण, उद्योग आणि सामाजिक कार्यात आघाडीवर आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेणारे विशेष सदर असावे. महिला सुरक्षेचे प्रश्न, आरोग्य आणि कायदेशीर हक्क यावर मार्गदर्शनपर लेख प्रसिद्ध करावेत. सकारात्मक उदाहरणे समाजात आत्मविश्वास निर्माण करतात.

**प्रीती सोमण**

### गुढीपाडवाः विजयाचा सण

हिंदू पंचांगानुसार चैत्र शुद्ध प्रतिपदेला 'गुढीपाडवा' साजरा केला जातो. हा दिवस केवळ नवीन वर्षाची सुरुवात नसून, तो निसर्गातील बदल आणि ऐतिहासिक विजयाचे प्रतीक मानला जातो. साडेतीन मुहूर्तांपैकी एक असल्यामुळे या दिवशी कोणत्याही नवीन कार्याची सुरुवात करणे अत्यंत शुभ मानले जाते. गुढीपाडव्याशी अनेक पौराणिक कथा जोडल्या गेल्या आहेत.१४ वर्षांचा वनवास संपवून आणि रावणाचा वध करून प्रभू श्रीराम जेव्हा अयोध्येत परतले, तेव्हा प्रजेने आनंदोत्सवाचे प्रतीक म्हणून 'गुढ्या' उभारल्या होत्या. याच दिवशी ब्रह्मदेवाने विश्वाची निर्मिती केली; याला ब्रह्मध्वज असेही म्हणतात. गुढीपाडव्याच्या दिवशी घराची स्वच्छता करून दारासमोर रांगोळी काढली जाते. या सणाचे मुख्य आकर्षण 'गुढी'. एका उंच काठीला (बांबूला) रेशमी वस्त्र, कडुलिंबाची डहाळी, गाठी (साखरेची माळ) आणि फुलांचा हार बांधला जातो. त्यावर तांब्याचा किंवा चांदीचा गडवा (कलश) उपडा ठेवून ती गुढी घराच्या दारात किंवा खिडकीत उंच ठिकाणी उभारली जाते. या दिवशी सकाळी कडुलिंबाची पाने, जिरे, हिंग आणि गूळ यांचे मिश्रण प्रसाद म्हणून खाल्ला जातो. हे आरोग्यासाठी अत्यंत गुणकारी असून रोगप्रतिकारक शक्ती वाढविते.

**वर्षा आवदे**

### हुरडा पार्टीचा तरुणाईला विसर

पूर्वीच्या काळी ग्रामीण भागात शेतात होणारी हुरडा पार्टी आता क्वचितच कुठेतरी एखाद्या ठिकाणी होत आहे. शहरी भागात याला व्यावसायिक रूप आले आहे. शेतांत हरभरा जोमदार आला की हुरडा पार्टी सुरू व्हायची. छानशी शेकोटी करून त्यात हरभरे भाजून खाणे म्हणजेच हुरडा पार्टी. ही हुरडा पार्टी अनेकांना आपापसातले मतभेद विसरायला लावते व दोन घटका माणसांमध्ये रमवायला राजी करते. मात्र आता काळ बदलला आहे. काळ बदलला तसे हुरडा पार्टीचे स्वरूप बदलले. हुरडा पार्टीचे अप्रूप जुन्याजाणत्या पिढीपासून आताच्या तरुणांसहित सर्वांनाच वाटते. महागड्या हॉटेल्समध्ये हुरडा पार्टी रंगू लागली आहे. पैसे खर्च करूनही शेतात होणाऱ्या हुरडा पार्टीची जी मजा असते ती येथे मिळत नाही. कालाय तस्मै नमः या उक्तीप्रमाणे ग्रामीण ढंगाची हुरडा पार्टी आता शहरी झाल्याने ग्रामीण भागातील वृद्ध आता या हुरडा पार्टीच्या आठवणीने खंतावत आहे.

**जयदीप सुधीर हिरवे**

## महत्त्वाचे

### ऑर्लिन्स मास्टर्समध्ये आयुष, तन्वीकडून आशा

**ऑर्लिन्स (फ्रान्स) :** वरिष्ठ बॅडमिंटनपटू एच.एस. प्रणॉयने खांद्याच्या दुखापतीमुळे माघार घेतल्यानंतर मंगळवारपासून येथे सुरू होणाऱ्या २५०,००० डॉलर्सच्या ऑर्लिन्स मास्टर्स सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेत भारताचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या युवा खेळाडू आयुष शेट्टी आणि तन्वी शर्मा यांच्याकडून विजेतेपद मिळविण्याची आशा आहे. पहिल्याच फेरीत चीन तैपेईच्या अव्वल मानांकित खेळाडू चोऊ टिएन चेन याचा सामना करणे अपेक्षित असलेल्या प्रणॉयला, गत आठवड्यात बासेल येथे झालेल्या स्विस ओपन स्पर्धेदरम्यान खांद्यात वेदना जाणवू लागल्यामुळे स्पर्धेतून माघार घेणे भाग पडले. स्विस ओपनसाठी प्रवास केल्यानंतर माझ्या खांद्यात वेदना सुरू झाल्या. त्यामुळे मी स्पर्धेतून माघार घेऊन मायदेशी परतण्याचा निर्णय घेतला, असे प्रणॉयने सांगितले. मी लवकरच पूर्णपणे तंदुरुस्त होईन अशी आशा त्याने व्यक्त केली. चीनमधील निंगबो येथे ७ ते १२ एप्रिल दरम्यान होणाऱ्या आशियाई बॅडमिंटन स्पर्धेद्वारे पुन्हा कोर्टवर उतरण्याचे त्याचे ध्येय आहे.

### गुडाकेश मोती लखनौ संघात सहभागी होण्याची शक्यता



**लखनौ :** वेस्ट इंडीजचा डावखुरा फिरकी गोलंदाज गुडाकेश मोती इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) हंगामापूर्वी लखनौ सुपर जायण्ट्स (एलएसजी) संघाकडे वळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मध्य-पूर्वेतील संकटामुळे मायदेशी परतण्यास विलंब झाल्याने आलेल्या थकव्याचे कारण देत गुडाकेशने अलीकडेच पीएसएल मधून माघार घेतली. २० विश्वचषकातून बाहेर पडल्यानंतर वेस्ट इंडीजचे खेळाडू भारतातच जवळपास दोन आठवडे अडकून पडले होते. मोतीने माघार घेतल्यामुळे पीएसएलच्या कलंदर्स संघाने त्वरित हालचाल करत, त्याच्या जागी बदली खेळाडू म्हणून दुनिथ वेलालगेला आपल्या संघात सामील करून घेतले. आता २९ वर्षीय गुडाकेश एलएसजी संघात सहभागी होणार असल्याची किंवा त्या संघाच्या चाचण्यांना उपस्थित राहणार असल्याची विश्वसनीय वृत्ते समोर आली आहेत. एलएसजी कडून अद्याप यावर कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नसली तरी, समाजमाध्यमावर गुडाकेशचे नाव लखनौ संघाशी जोडणाऱ्या चर्चांना उधाण आले आहे. लखनौ संघात दुखापतग्रस्त वानिंदू हसरंगाच्या अनुपस्थितीमुळे निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी संघ व्यवस्थापन पर्यायांचा शोध घेत असल्याचे मानले जात आहे. २०२६ च्या लिलावात गुडाकेश मोतीला कोणत्याही संघाने विकत घेतले नव्हते.

### कॅण्डिडेट्स बुद्धिबळ स्पर्धा सायप्रसमध्येच कायम

**सायप्रस :** संघर्षग्रस्त आखाती प्रदेशापासून फारसे दूर नसलेल्या सायप्रसमध्ये या महिन्यात प्रतिष्ठेची कॅण्डिडेट्स बुद्धिबळ स्पर्धा आयोजित करण्याबाबत काही चिंता व्यक्त केल्या जात आहेत. मात्र, फिड या बुद्धिबळाची जागतिक नियामक संस्थने स्पर्धेचे ठिकाण बदलण्याची शक्यता फेटाळून लावली आहे. सध्या तिथे युद्धासारखी परिस्थितीही नाही, असे फिडेचे मुख्य कार्यकारी अधिकारी () एमिल सुतोव्स्की यांनी चेसबेसला सांगितले. असा बदल करण्याइतपत 'किंचितही धोकादायक' परिस्थिती नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. सध्या भारताचा डी. गुकेश (पुरुष) आणि चीनची जू वेनजुन (महिला) यांच्याकडे असलेल्या जागतिक विजेतेपदाच्या मुकुटांसाठीचे आव्हानवीर निश्चित करणारी ही कॅण्डिडेट्स बुद्धिबळ स्पर्धा २८ मार्च रोजी सुरू होणार आहे. सुरक्षा चिंतेमुळे भारताची कोनेरू हम्पी या स्पर्धेतून माघार घेण्याचा विचार करत असल्याचे वृत्त आहे. या महिन्याच्या सुरुवातीलाच, सायप्रसमधील एका ब्रिटिश हवाई तळावर ड्रोन हल्ला झाला होता.

# कसोटी खेळण्याची इच्छा, पण टी-२० मध्ये माझा 'हातखंड'

## कर्णधार सूर्यकुमार यादवचे प्रतिपादन



**नवी दिल्ली, १६ मार्च**

मला कसोटी क्रिकेट खेळण्याची तीव्र इच्छा आहे, एकदिवसीय क्रिकेट मात्र आपल्या स्वभावाला साजेसे नाही असे मला वाटते. परंतु, शेवटी टी-२० क्रिकेट हेच माझे मुख्य बलस्थान आहे, कारण त्यात माझा आता 'हातखंड' आहे, असे टी-२० विश्वचषक विजेत्या भारतीय संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव म्हणाला.

पॉडकास्टवर तासभर चाललेल्या मुलाखतीदरम्यान सूर्यकुमार पूर्णपणे निवांत व प्रसन्न दिसत होता. भारताला विश्वचषकात प्रचंड यश मिळवून दिल्यानंतर तो स्पष्टपणे आनंदाच्या शिखरावर होता; याच वेळी त्याने फारसे कसोटी क्रिकेट खेळायला न मिळाल्याबद्दलची आपली खंतही मनमोकळेपणाने व्यक्त केली. त्याने ऑस्ट्रेलियाविरुद्ध एक कसोटी सामना खेळला होता. 'केवळ एकच डाव!' असे म्हणत त्याने हसत हसत सांगितले.

तुमच्या नशिबात जे लिहिलेले असते, तेच तुम्हाला मिळते. मी माझ्या कारकिर्दीची सुरुवात लाल चेंडूच्या क्रिकेटनेच केली होती. मी १०-१२ वर्षे रणजी करंडक स्पर्धा खेळलो आहे. मी मुंबईमध्ये असताना लाल चेंडूने खूप क्रिकेट खेळलो, जर तुम्ही मुंबईत लहानाचे मोठे झाला असाल, तर तुमची सुरुवात लाल चेंडूनेच होते, असे तो म्हणाला.

पण हळूहळू, जेव्हा आम्ही पांढऱ्या चेंडूच्या क्रिकेटला सुरुवात केली, तेव्हा माझा कल थोडा त्या दिशेने झुकला व त्यानंतर मी या टी-२० प्रकाराकडे वळलो. वन-डे क्रिकेटमध्येही चांगली कामगिरी करण्यासाठी मी खूप प्रयत्न केले, पण यात मला म्हणावे तसे यश मिळाले नाही, असे त्याने सांगितले.

टी-२० मध्ये ज्या प्रकारे माझी कामगिरी होत होती, ते पाहता मला त्यात पूर्ण प्रभुत्व मिळाले आहे असे म्हणता येईल, असे तो म्हणाला.

जर मला संधी मिळाली, तर कसोटी क्रिकेट खेळायला नक्कीच आवडेल. तसेही मी २०१०-११ पासून २०२० पर्यंत लाल चेंडूचे क्रिकेट खेळलो आहे. मला कसोटी क्रिकेट मनापासून आवडते. पण हो, साहजिकच, जर संधी मिळाली, तर कसोटी क्रिकेट खेळायला कोणाला आवडणार नाही? असेही तो म्हणाला.

तरीही, वयाच्या ३५ व्या वर्षी सूर्यकुमारला कसोटी संघात स्थान मिळणे जवळजवळ अशक्यच आहे. कसोटी क्रिकेटमधील त्याचा एकमेव अनुभव २०२३ मध्ये नागपूर येथे ऑस्ट्रेलियाविरुद्धचा होता, जिथे त्याने एका डावात ८ धावा केल्या होत्या. त्याच वर्षी तो ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय विश्वचषक अंतिम सामन्यातही खेळला होता व त्याने २८ चेंडूंत १८ धावा केल्या होत्या. भारताने तो अंतिम सामना गमावला आणि त्यानंतर सूर्यकुमारने या प्रकारात (फॉर्मेटमध्ये) पुन्हा कधीच खेळ केला नाही.

# १९ वर्षांखालील विश्वचषक अंतिम सामन्यातील खेळी खास होती : सूर्यवंशी



**जयपूर, १६ मार्च**

१९ वर्षांखालील विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात इंग्लंडविरुद्ध केलेली शतकी खेळी ही माझ्या कारकिर्दीतील सर्वात 'खास' खेळींपैकी एक होती, असे भारताचा किशोरवयीन क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशी सोमवारी म्हणाला.

भारताला विश्वचषकाचे विजेतेपद मिळवून देण्यात सूर्यवंशीच्या अविस्मरणीय खेळीने निर्णायक भूमिका बजावली होती. सूर्यवंशीने अवघ्या ८० चेंडूंमध्ये १७५ धावांची धडाकेबाज खेळी करत भारताला १९ वर्षांखालील विश्वचषकाचे विक्रमी सहावे विजेतेपद मिळवून दिले. आपल्या आक्रमक आणि जोरदार फटकेबाजीमुळे या १४ वर्षीय खेळाडूने प्रसारमाध्यमांचे लक्ष मोठ्या प्रमाणावर वेधून घेतले आहे.

माझी वैयक्तिकरीत्या सर्वात आवडती खेळी म्हणजे हरारे येथे झालेल्या १९ वर्षांखालील विश्वचषकाच्या अंतिम सामन्यातील खेळी आहे.. मला या विश्वचषकात खेळण्याची केवळ एकच संधी मिळाली. अंतिम सामन्यात शतक झळकावणे हा माझ्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण होता. मी संघासाठी जे योगदान दिले, ते खरोखरच विशेष होते, असे तो म्हणाला.

राजस्थान रॉयल्स संघाची नवीन जर्सी प्रदर्शित करण्याच्या व आगामी हंगामासाठी लक्ष्मी सिमेंटला संघाचे मुख्य प्रायोजक म्हणून घोषित करण्याच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने तो पत्रकारांशी बोलत होता.

मी केवळ आपल्या प्रक्रियेवर व विजयावर लक्ष केंद्रित करण्याचे ध्येय उराशी ठेवले आहे. इतर गोष्टींचा विचार करत नाहीये, असे सूर्यवंशी म्हणाला.

तुम्ही चांगली कामगिरी केली, तर तुमचे कौतुक होणे किंवा तुमच्याकडे लक्ष वेचले जाणे स्वाभाविक असते, परंतु मी त्या प्रसिद्धीवर किंवा लक्ष वेधून घेण्यावर लक्ष केंद्रित करत नाहीये, असेही तो म्हणाला. या कार्यक्रमाला रवींद्र जडेजाव यश राज पुंजा यांचीही उपस्थिती होती. रवींद्र जडेजा १७ वर्षांनंतर पुन्हा एकदा राजस्थान रॉयल्स संघात परतला आहे.

# एम.चिन्नास्वामी स्टेडियमवर आयपीएल सामने खेळविण्यासाठी कर्नाटक सरकारची मंजुरी



**बंगळुरू, १६ मार्च**

कर्नाटक सरकारने सोमवारी कर्नाटक राज्य क्रिकेट संघटना व रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला एम.चिन्नास्वामी स्टेडियमवर २०२६ च्या इंडियन प्रीमियर लीगचे (आयपीएल) सामने आयोजित करण्यासाठी औपचारिक मंजुरी दिली. आरसीबी संघाच्या पहिल्या विजेतेपदानंतर झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेमुळे निर्माण झालेली महिन्याभराची अनिश्चितता यामुळे संपुष्टात आली आहे.

जगातील सर्वात मोठ्या टी-२० लीगची १९ वी आवृत्ती २८ मार्च रोजी सुरू होत आहे. वेळापत्रकानुसार, या स्पर्धेच्या सलामीच्या सामन्यात गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघ एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर सनरायझर्स हैदराबादशी लढणार आहे.

कर्नाटकचे गृहमंत्री परमेश्वर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीनंतर ही औपचारिक मंजुरी देण्यात आली. या बैठकीला राज्य सरकारने स्थापन केलेली तज्ज्ञ समिती, तसेच स्पर्धा व्यवस्थापन संस्था (इव्हेंट मॅनेजमेंट फर्म) यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान तज्ज्ञ समितीने आपला अहवाल सादर केला. या अहवालात एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर करण्यात आलेली तयारी आणि सुरक्षा-नियमांचे पालन करण्यासाठी उचललेली पावले यांची सविस्तर माहिती देण्यात आली होती, असे आयपीएलचे अधिकृत प्रवक्ते विनय मृत्युंजय यांनी सांगितले.

तज्ज्ञ समितीच्या शिफारशींवर आधारित आणि स्टेडियमवरील व्यवस्थांची सविस्तर पाहणी केल्यानंतर, माननीय गृहमंत्र्यांनी बंगळुरू येथील प्रतिष्ठित एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर आगामी सामने आयोजित करण्यास औपचारिक मंजुरी दिली आहे

# एफआयएच हॉकी नेशन्स चषकांत भारतीय महिला हॉकी संघ सहभागी होणार

## ऑकलंडमध्ये १५ जूनपासून

**लॉझान (स्वित्झर्लंड), १६ मार्च**

भारतीय महिला हॉकी संघ आगामी १५ ते २१ जून या कालावधीत न्यूझीलंडमधील ऑकलंड येथे होणाऱ्या एफआयएच हॉकी नेशन्स चषक स्पर्धेत सहभागी होणार आहे.

हॉकी प्रो लीगमध्ये सहभागी नसलेल्या, परंतु जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या संघांना उच्च-स्तरीय स्पर्धेची संधी देण्यासाठी व विजेत्या संघाला पुढील हंगामात प्रो-लीगमध्ये बढती मिळवण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी, हॉकी नेशन्स चषकाची सुरुवात २०२१ मध्ये करण्यात आली होती.

नऊ संघांच्या गुणतालिकेत तळाच्या स्थानी राहिल्यामुळे, भारतीय महिला हॉकी संघाला




२०२४-२५ च्या प्रो-लीग स्पर्धेतून रेलिगेट (खालच्या गटात ढकलले) करण्यात आले होते.

या स्पर्धेत भारताशिवाय यजमान न्यूझीलंड, अमेरिका, जपान, कोरिया, चिली, स्कॉटलंड आणि फ्रान्स हे संघ सहभागी होतील. यापैकी स्कॉटलंड आणि फ्रान्स या संघांना हॉकी नेशन्स चषक२ द्वारे या स्पर्धेत बढती मिळाली आहे.

पुरुषांची स्पर्धा केपटाऊन येथे आयोजित केली जाईल. यामध्ये दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड, फ्रान्स, कोरिया, जपान, वेल्स आणि मलेशिया या संघांचा समावेश असेल; तसेच हॉकी नेशन्स चषक २ द्वारे बढती मिळालेला स्कॉटलंड आणि हॉकी प्रो-लीगच्या २०२४-२५ हंगामातून रेलिगेट झालेला आयर्लण्ड हे संघही यात सहभागी होतील.

**हॉकी पुरुष नेशन्स चषक ११ जूनपासून**

हॉकी पुरुष नेशन्स चषकाची २०२५-२६ आवृत्ती ११ ते २० जून या कालावधीत पार पडेल. या स्पर्धेच्या माध्यमातून हे सामने पुन्हा एकदा दक्षिण आफ्रिकेत परततील. यापूर्वी २०२२ मध्ये पॉचेफस्ट्रूम येथे झालेल्या पुरुष स्पर्धेच्या पहिल्या आवृत्तीचे यजमानपदही दक्षिण आफ्रिकेनेच भूषवले होते.

ऑनलाईन तभा वाचण्यासाठी
www.tarunbharat.net
वर भेट द्या!

# महाराष्ट्र केसरी विजेत्या महिलेला किया सोनेट कार

**उपविजेती बुलेटची मानकरी ठरणार** | **सोलापूरमध्ये २८ व २९ मार्च रोजी स्पर्धा** | **प्रत्येक गटातील विजेतीला ५१ हजार रोख बक्षीस**

**सोलापूर, १६मार्च**

सोलापूर येथे निर्झरा केअर फाऊंडेशनतर्फे २८ आणि २९ मार्चला आयोजित करण्यात आलेल्या चौथ्या महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत विजेत्या कुस्तीपटूला 'महाराष्ट्र केसरी' किताब, मानाची गदा आणि किया सोनेट कार देऊन गौरविण्यात येणार आहे, तर उपविजेत्या कुस्तीपटूला बुलेट दुचाकी दिली जाईल. हरिभाई देवकरण प्रशालेच्या मुळे सभागृहात चौथ्या महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेनिमित्त वासा पूजन समारंभ व माती पूजन अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते पार पडला. या कार्यक्रमात कल्याण शेट्टी यांच्या हस्ते महिला महाराष्ट्र केसरी स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्याला देण्यात येणाऱ्या बक्षिसांचे अनावरण करण्यात आले.



चांदीच्या गदेची पूजन करताना आ. सचिन कल्याण शेट्टी, स्वाती अळ्ळीमोरे-साखरे व मान्यवर

मॅटवर होणाऱ्या या स्पर्धेसाठी ५० किलो, ५३ किलो, ५५ किलो, ५७ किलो, ५९ किलो, ६२ किलो, ६५ किलो, ६८ किलो, ७२ किलो तसेच महाराष्ट्र केसरी गट (६५ ते ७६ किलो) असे वजनी गट ठेवण्यात आले आहेत. या प्रत्येक गटातील पहिल्या तीन विजेत्यांना अनुक्रमे सुवर्ण, रौप्य व कांस्य पदके दिली जाणार आहेत, तर प्रत्येक गटातील सुवर्णपदक विजेत्याला ५१ हजार रुपयांचे रोख बक्षीस देण्यात येणार असल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले. निर्झरा केअर फाउंडेशनच्या संचालिका स्वाती अळ्ळीमोरे-साखरे यांनी स्वतःच्या नफा व नुकसानीचा विचार न करता आपल्या वडिलांचा वारसा जपण्याचे काम करण्यासाठी सोलापूरमध्ये महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा आयोजित करण्याचे शिवधनुष्य उचलले आहे.

# मुंबई इंडियन्सचा आयपीएलसाठी सराव सुरू



**मुंबई, १६ मार्च**

पाच वेळा विजेते ठरलेल्या मुंबई इंडियन्स संघाने सोमवारी इंडियन प्रीमियर लीगच्या आगामी हंगामासाठी सरावाला सुरुवात केली. हा हंगाम २८ मार्च रोजी सुरू होणार आहे.

शार्दुल ठाकूर, मयंक मार्कंडे, अल्लाह गझनफर, नमन धीर, राजा अंगद बावा, रॉबिन मिन्झ, रघु शर्मा, मयंक रावत, दानिश मालेवार, मोहम्मद इझहार आणि अश्विनी कुमार हे खेळाडूंचा पहिला गट होता. हा गट सरावासाठी शिबिरात दाखल झाला.

संघातील उर्वरित खेळाडूंमध्ये रोहित शर्मा, जसप्रीत बुमराह आणि कर्णधार हार्दिक पांड्या यांसारख्या दिग्गजांचा समावेश आहे, ते आगामी काही दिवसांत शिबिरात सहभागी होण्याची अपेक्षा आहे. स्पर्धेपूर्वी सरावाची तीव्रता व तयारीचा वेग वाढत असताना हे खेळाडू संघात दाखल होतील.

हंगामापूर्व सरावाच्या पहिल्या दिवसात नेहमीच काहीतरी विशेष असते. खेळाडू शिबिरात दाखल होताना पाहणे, वाढणारा उत्साह आणि जोरदार सुरुवात करण्याचे उद्दिष्ट हे सर्व अनुभवता येते. आमच्या संघात असे खेळाडू आहेत ज्यांना या फ्रॅन्चायझीची इत्थंभूत माहिती आहे, त्याच वेळी काही नवीन व अत्यंत गुणवान चेहरेही संघात दाखल होत आहेत, असे मुंबई इंडियन्सचे मुख्य प्रशिक्षक महेला जयवर्धने यांनी सांगितले.

पहिला दिवस संपूर्ण मोहिमेची दिशा आणि सूर निश्चित करतो. आम्ही सरावाच्या पद्धतीतून, तयारीच्या शैलीतून आणि एकमेकांना देत असलेल्या पाठिंब्यातून अगदी पहिल्याच सत्रापासून संघाचा दृढ इरादा प्रत्येकाला जाणवावा, अशी आमची इच्छा होती, असे ते म्हणाले.

या सत्राची सुरुवात फिटनेस आणि कंडिशनिंगच्या एका सुनियोजित टप्प्याने झाली. यावेळी संघाच्या स्ट्रेंथ आणि कंडिशनिंग पथकाने खेळाडूंकडून हालचालींचे विविध सराव, चपळता वाढवणारे व्यायाम आणि फिटनेस चाचण्या करून घेतल्या.

मुंबई इंडियन्सच्या आयपीएल २०२६ हंगामाची सुरुवात २९ मार्च रोजी वानखेडे स्टेडियमवर कोलकाता नाईट रायडर्स विरुद्धच्या सामन्याने होईल.

# सिनर, सबालेन्काला प्रथमच इंडियन वेल्सचे विजेतेपद

**इंडियन वेल्स, १६ मार्च**

इंडियन वेल्स टेनिस स्पर्धेत इटलीच्या जॅनिक सिनर व बेलारूसच्या आर्यना सबालेन्काने प्रथमच अनुक्रमे पुरुष व महिला गटाचे विजेतेपद पटकावले.



विजेतेपदाच्या चषकासह जॅनिक सिनर व आर्यना सबालेन्का

पुरुषांच्या अंतिम फेरीत जॅनिक सिनरने रशियाच्या डॅनिल मेदवेदेवचा ७-६ (६), ७-६ (४) अशा फरकाने पराभव केला. दुसऱ्या सेटच्या टायब्रेकमध्ये ०-४ ने पिछाडीवर असताना सलग सात गुण मिळवून त्याने जोरदार पुनरागमन केले आणि एकही सेट न गमावता विजेतेपद पटकावले.

जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या या इटालियन खेळाडूने, मेदवेदेवविरुद्धच्या गेल्या १० सामन्यांपैकी नवव्या सामन्यात विजय मिळवला आणि कॅलिफोर्नियाच्या या वाळवंटी प्रदेशात होणाऱ्या स्पर्धेतील आपले पहिले विजेतेपद नावावर केले. या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत मेदवेदेवनेच अव्वल मानांकित कार्लोस अल्काराझला या वर्षातील त्याचा पहिला पराभव स्वीकारण्यास भाग पाडले होते.

महिलांच्या अंतिम फेरीत जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या आर्यना सबालेन्काने एलेना रायबाकिनाचा ३-६, ६-३, ७-६ (६) अशा फरकाने पराभव करीत, इंडियन वेल्समधील आपले पहिले विजेतेपद पटकावले. २०१३ आणि २०१५ मध्ये उपविजेतेपद मिळवणाऱ्या सबालेन्काने एका जोरदार सर्व्हिससह या विजयावर शिक्कामोर्तब केला.

# भारतीय क्रिकेटने वर्चस्व गाजविण्याची वेळ आलीय् : मिताली

## कर्नल सी.के. नायडू जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित

**नवी दिल्ली, १६ मार्च**

भारतीय क्रिकेटने जागतिक स्तरावर आपले वर्चस्व गाजवावे, अशी माझी प्रदीर्घ काळापासून इच्छा होती, हे माझे स्वप्न अखेर सत्यात उतरत आहे. अलिकडच्या वर्षांत पुरुष, महिला व कनिष्ठ अशा तिन्ही संघांनी जागतिक स्तरावरील विश्वचषक विजेतेपदे पटकावली आहेत, असे मिताली राजने म्हटले आहे.

गत काही वर्षांत भारतीय पुरुष संघाने २००४ च्या टी-२० विश्वचषकाचे विजेतेपद मिळवून, एका दशकाहून अधिक काळापासून सुरू असलेला विजेतेपदाचा दुष्काळ संपुष्टात आणला. त्यानंतर, महिला संघानेही गत वर्षी आपला पहिलाच आयसीसी करंडक म्हणजेच एकदिवसीय विश्वचषकाचे विजेतेपद पटकावून या यशाची मालिका पुढे नेली. भारताचे हे वर्चस्व कनिष्ठ स्तरापर्यंतही विस्तारले आहे; कारण



जीवन गौरव सन्मानासह मिताली राज

अलिकडच्या वर्षांत १९ वर्षांखालील संघांनीही जागतिक विजेतेपदे मिळवली आहेत. यामुळे क्रिकेट विश्वातील एक महाशक्ती म्हणून भारताचा दर्जा अधिकच उंचावला आहे. दीर्घकाळापासून माझी अशी इच्छा होती की भारतीय क्रिकेटने आपले वर्चस्व निर्माण करावे आणि आता ती वेळ खरोखरच आली आहे, असे मितालीने बीसीसीआय नमन पुरस्कार सोहळ्यादरम्यान सांगितले.

गत दोन-तीन वर्षांत भारतीय क्रिकेटनेमग ते पुरुष संघ असो, महिला संघ असो किंवा १९ वर्षांखालील मुले-मुलींचे संघ असोत अत्यंत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. एक माजी क्रिकेटपटू म्हणून, भारतीय क्रिकेटची ही प्रगती पाहणे हा माझ्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे, असे मिताली म्हणाली.

### महिला क्रिकेटमधील आमूलाग्र बदलाचे श्रेय शाह यांनाच

भारतीय क्रिकेटच्याआणि विशेषतः महिला क्रिकेटच्या परिवर्तनात महत्त्वाची भूमिका बजावल्याबद्दल, तिने बीसीसीआयचे माजी सचिव आणि सध्याचे आयसीसी प्रमुख जय शाह यांचे श्रेयपूर्वक कौतुक केले.

मी महिला क्रिकेटचा हा उत्क्रांतीचा प्रवास प्रत्यक्ष पाहिला आहे आणि या प्रवासात बीसीसीआय व जय शाह सरांनी दिलेल्या पाठिंब्याचा मी आवर्जून उल्लेख करू इच्छिते. गत चार-पाच वर्षांत, भारतीय महिला क्रिकेट संघात आमूलाग्र बदल घडून आला आहे आणि या बदलाचे संपूर्ण श्रेय एकाच व्यक्तीला जाते. त्यांची या क्षेत्राप्रती असलेली दूरदृष्टी व बांधिलकी तसेच जागतिक स्तरावरही महिला क्रिकेटची प्रतिष्ठा व व्यप्ती वाढवण्यासाठी त्यांनी केलेले अथक प्रयत्न खरोखरच वाखाणण्याजोगे आहेत, असे ती म्हणाली.

### पुरुष व महिला क्रिकेटपटूंमधील संवाद महत्त्वाचा

पुरुष आणि महिला क्रिकेटपटूंमधील हा संवाद, माझ्या मते, महिला क्रिकेटपटूंना खूप मदत करतो, कारण आम्ही नेहमीच पुरुष क्रिकेटच्या दर्जाशी बरोबरी साधण्याचा प्रयत्न करत असतो, असे ती म्हणाली. बीसीसीआयचे माजी अध्यक्ष आणि १९८३ च्या विश्वविजेत्या संघाचे सदस्य असलेल्या बिन्नी यांनी, खेळाडू आणि प्रशिक्षक म्हणून, तसेच त्यानंतर प्रशासक म्हणून गाजवलेल्या आपल्या दीर्घकालीन प्रवासावर प्रकाश टाकला.

भारतासाठी खेळणाऱ्या मोजक्या खेळाडूंपैकी एक होण्याची संधी मला मिळाली, हे मी माझे भाग्य समजतो. इतकी प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशातून येत असताना, आपल्यापैकी फारच कमी जणांना देशाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळते.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### नंदुरबारमध्ये झुलेलाल सेवा मंडळातर्फे आरोग्य शिबिरात महिलांची तपासणी

**नंदुरबार** : शहरातील श्री झुलेलाल सेवा मंडळातर्फे आरोग्य तपासणी व महिलांचे गर्भाशय मुख कर्करोग तपासणी शिबिर घेण्यात आले. शिबिरात महिलांची तपासणी करण्यात आली. भगवान श्री झुलेलाल यांचा जन्मदिवस चेट्री चंद्र अर्थात सिंधी दिन २० मार्चला साजरा केला जाणार आहे. यानिमित्त १५ मार्चपासून सिंधी समाजातर्फे विविध कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. रविवारी (१५ मार्च) लाडकाना मंगल कार्यालयात आरोग्य तपासणी शिबिर तसेच महिलांसाठी गर्भाशय मुख कर्करोगाची तपासणी शिबिर घेण्यात आले. त्यात महिलांची १०० पेप स्मीअरची चाचणी करण्यात आली. २१० व्यक्तींची बीपी, शुगर, सीबीसी आदी तपासण्या करण्यात आल्या. पेप स्मीअरने दहा ते पंधरा वर्षे आधीच भविष्यात होणाऱ्या गर्भाशय मुख कर्करोगाचा अंदाज करता येतो. त्यामुळे वेळीस योग्य उपचार करून पुढील अनर्थ टाळता येणे हेच या तपासणीचे महत्त्व आहे. ही तपासणी खासगीत केल्यास १५०० रुपयांपर्यंत खर्च येतो. मात्र, समाजाच्या दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने ही तपासणी फक्त २०० रुपयांत करण्यात आली. श्री झुलेलाल सेवा मंडळाचे सदस्य, सिंधी समाजाचे नारायणदास वादेवा, शंकरलाल रंगलाणी, डॉ. अनुप कटारिया, डॉ. यश कटारिया, डॉ. दीपिशा कटारिया, किरण चंचलानी, डॉ. रश्मी तेजवणी, डॉ. निकिता काशानी, डॉ. बखत्यापुरी, डॉ. सिमरन गुरुबक्षानी, डॉ कनक दावाणी यांनी सहकार्य केले. डॉ. राजेश केसवानी, डॉ. अर्जुन लालचंदाणी, डॉ. प्रकाश चंचलाणी, डॉ. राहुल काशानी यांनी शिबिराचे संयोजन केले.



### खोडसगाव जि. प. शाळेत मुलींना स्व-संरक्षणाचे धडे

**नंदुरबार** : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेतर्फे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांतील शाळांमध्ये १५ लाख मुलींसाठी राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा अभियान राबविले जात आहे. त्यानुसार आत्मरक्षा अभियानांतर्गत नंदुरबार तालुक्यातील खोडसगाव येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थिनींना स्व-संरक्षणाचे धडे दिले गेले. या वेळी शाळेचे अध्यक्ष राजू ठाकरे, विजेश पवार, काशिनाथ पवार, सुनीता देवकत्ते, मंजू वसावे, विक्रम पाडवी आदी उपस्थित होते. जागतिक महिला दिनानिमित्त राबविण्यात येणाऱ्या या अभियानांतर्गत मुलींना स्वसंरक्षणासाठी आवश्यक विविध प्रकारचे प्रशिक्षण पात्र प्रशिक्षकांकडून दिले जात आहे. राज्यातील मुलींना अधिकाधिक अद्ययावत व परिपूर्ण प्रशिक्षण मिळावे, यासाठी राज्याच्या महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या शालेय शिक्षण विभागाकडून राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा योजना विशेष मार्गदर्शन व सराव सत्र घेण्यात येत आहे. या प्रशिक्षणाचा एक महत्त्वाचा भाग म्हणून मुलींना योगाचेही प्रशिक्षण दिले जात आहे. योगामुळे मुलींमध्ये उत्साह, शारीरिक तंदुरुस्ती तसेच मनोबल वाढले. तसेच मिलिटरी ट्रेनिंगचेही प्रशिक्षण दिले जात आहे, असा हा एकंदरीत उपक्रम राबविला जात असल्याची माहिती विजेश पवार यांनी दिली. नंदुरबार जिल्ह्यातील २३३ शाळांमध्ये सध्या हे अभियान राबविण्यात येत असून, आश्रमशाळा, जिल्हा परिषद व महापालिकेच्या शाळांमध्येही मोठ्या संख्येने मुली या प्रशिक्षणाचा लाभ घेत आहेत.

### दिव्यांग लाभार्थ्यांच्या अनुदानात वाढ; २० पर्यंत कागदपत्रे सादर करा : कावळे

**नंदुरबार** : राज्य शासनाच्या नवीन निर्णयानुसार दिव्यांग लाभार्थ्यांच्या मानधनात वाढ करण्यात आली असून, आता लाभार्थ्यांना दरमहा दोन हजार ५०० रुपये अनुदान थेट बँक खात्यात हस्तांतरणाद्वारे (डीबीटी) जमा होणार आहे. या वाढीव लाभासाठी आणि तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी लाभार्थ्यांनी आपले यूडीआयडी कार्ड (दिव्यांग प्रमाणपत्र) पोर्टलवर अपडेट करणे आणि आधार संलग्नीकरण करणे अनिवार्य आहे, अशी माहिती नायब तहसीलदार (संगायो) मदन कावळे यांनी दिली. पूर्वीच्या अनुदानात एक हजार रुपयांची वाढ करून ते आता दोन हजार ५०० रुपये करण्यात आले आहे. नंदुरबार तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेतील ५४४ आणि श्रावणबाळ योजनेतील ५७ लाभार्थ्यांचे यूडीआयडी कार्ड व आधार कार्ड अद्याप लिंक नसल्याचे समोर आले आहे. संबंधित दिव्यांग लाभार्थ्यांनी यूडीआयडी कार्डाची झेरॉक्स प्रत, आधार कार्ड क्रमांक आणि बँक पासबुकची झेरॉक्स प्रत आदी कागदपत्रे गावातील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांच्याकडे किंवा शहरातील तहसील कार्यालयातील संजय गांधी योजना शाखेत २० मार्चपूर्वी सादर करावे. तसेच राज्याच्या अवर सचिवांच्या निर्देशानुसार लाभार्थ्यांनी दिव्यांग यूडीआयडी पोर्टलवरून आपली ई-केवायसी प्रक्रियाही पूर्ण करून घ्यावी. दिव्यांग लाभार्थ्यांनी या वाढीव लाभापासून वंचित राहू नये, यासाठी मुदतीपूर्वी कागदपत्रे सादर करावीत, असेही आवाहन नायब तहसीलदार कावळे यांनी केले आहे.

## म्हाडाच्या वकील पॅनलवर संजय सावंत यांची निवड

**वैभव करवंदकर**

**नंदुरबार/पुणे** : गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळासाठी (म्हाडा) वकील पॅनलवर अ‍ॅड. संजय दत्तात्रय सावंत (पाटील) यांची कायदेशीर सल्लागारपदी निवड करण्यात आली आहे.



पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळासाठी (म्हाडा) महाराष्ट्रातील अनेक अनुभवी वकिलांकडून जिल्हा व सत्र न्यायालय, इतर न्यायालय, जिल्हा व राज्य कंज्युमर न्यायालय, सहकार न्यायालय, महसूल न्यायालय, प्रशासकीय न्यायाधीकरण न्यायालय, इतर कोणतेही न्यायालय, न्यायाधीकरण, प्राधिकरण यासंदर्भातील दावे चालविण्यासाठी जुलै आणि ऑगस्ट २०२५ दरम्यान वकील पॅनलसाठी जाहिरातीद्वारे निवेदन-अर्ज मागविण्यात आले होते. यानंतर नोव्हेंबर २०२५ मध्ये मुलाखती घेण्यात आल्या होत्या. त्यासंदर्भात नुकताच 'म्हाडा'कडून निर्णय घेण्यात आला. यामध्ये अ‍ॅड. संजय सावंत यांची म्हाडा-पुणे वकील पॅनलवर निवड करण्यात आली.

अ‍ॅड. सावंत हे सध्या महावितरण, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक (पीडीसीसी बँक), पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जगदंब सामाजिक प्रतिष्ठान, येसूबाई सामाजिक प्रतिष्ठान यावर कायदेशीर सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. शासकीय, निमशासकीय, कंपनी, राजकीय, सामाजिक अनेक संस्था, तसेच वकिली व्यवसायातील सर्व प्रकारच्या कामाचा अनुभवाची दखल घेऊन 'म्हाडा'च्या सर्व वरिष्ठ अधिकारी यांनी अ‍ॅड. संजय सावंत यांना गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळासाठी (पुणे-म्हाडा) कायदा (विधी) विभागात वकील पॅनेलवर कायदेशीर सल्लागार म्हणून निवड केली आहे. यासंदर्भात पुणे विभागाचे चीफ ऑफिसर राहुल साकोरे यांच्या अधिकृत स्वाक्षरीने पत्र देण्यात आले आहे. पत्र पुणे विभागाचे लीगल अ‍ॅडव्हायजर अधिकारी डॉ. तुषार जाधव यांच्यामार्फत अधिकृतपणे देण्यात आले आहे, म्हाडाच्या पॅनल अ‍ॅडव्होकेट म्हणून नियुक्ती झाल्यानंतर अ‍ॅड. संजय सावंत यांनी पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे (म्हाडा) अध्यक्ष तथा माजी खासदार शिवाजी आढळराव पाटील, पुणे विभागाचे चीफ ऑफिसर राहुल साकोरे, पुणे विभागाचे लीगल अ‍ॅडव्हायजर अधिकारी डॉ. तुषार जाधव आणि 'म्हाडा' कार्यालयाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार व्यक्त केले.

# नंदुरबारला दोन समाजांत तेढ निर्माण करण्याचा कट उघड

## खोटा गुन्हा दाखल करण्यास चिथावणी देणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल

**नंदुरबार** : शहरात धार्मिक भावना दुखावून दोन समाजांत तेढ निर्माण करण्याच्या आणि दंगल घडवून आणण्याच्या उद्देशाने खोटी फिर्याद देण्यास चिथावणी देणाऱ्या टोळीचा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्यायसंहितेच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**नेमकी घटना काय?**

मिळालेल्या माहितीनुसार, ६ व ७ ऑक्टोबर २०२५ च्या दरम्यान ही घटना घडली. नंदुरबार शहर पोलीस ठाण्याचे अंमलदार भुनेश नारायण मराठे यांनी या प्रकरणी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी संशयित समीर खान पठाण (रा. पटेलवाडी), शाहरुख खान रहिम खान पठाण ऊर्फ मास (रा. जुना बैल बाजार) आणि शेख शोएब शेख फारुख ऊर्फ माज (रा. काली मशीदजवळ) यांच्या हालचालींवरून तपास केला असता धक्कादायक माहिती समोर आली.

**मोबाईल रेकॉर्डिंगमधून कट उघड**

संशयितांच्या मोबाइलची तपासणी केली असता, त्यांच्या रेकॉर्डिंग फोल्डरमध्ये आक्षेपार्ह संभाषण मिळून आले. यामध्ये संशयित एकमेकांना सूचना देत होते की, "आपल्या बाजूनेही दोन-तीन गोष्टी लिहून



द्या की ते आम्हाला जय श्रीराम बोलायला लावत होते. असे केल्याने त्यांच्यावर मजबूत केस बनेल." तसेच, "कारवाई मजबूत होत आहे की नाही? फक्त एकावर नाही तर सगळ्यांवर गुन्हा दाखल कर. सांग की, ते आम्हाला मारहाण करत होते आणि धमकावत होते," असे चिथावणीखोर संभाषण रेकॉर्ड झाले होते.

**खोट्या फिर्यादीचा बनाव फसला**

संशयित समीर खान आणि मौसीम यांनी हिंदू समाजातील लोकांनी मारहाण करून जय श्रीराम बोलायला लावल्याची खोटी फिर्याद देण्याचा बनाव रचला होता. मात्र, प्रत्यक्षात मौसीम अब्दुल धोबी यांनी दिलेल्या फिर्यादीचे अवलोकन केले असता, अशी कोणतीही घटना घडली नसल्याचे निष्पन्न झाले. केवळ समाजांत दंगल घडविण्याच्या उद्देशाने हा खोटा बनाव रचण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे.

**पोलीस कारवाई**

या गंभीर प्रकारानंतर पोलीस निरीक्षक नीलेश देसले यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक विनोदकुमार गोसावी या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत. जातीय सलोखा बिघडवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलिसांनी दिले आहेत. नागरिकांनी सोशल मीडियावरील अफवांवर विश्वास ठेवू नये आणि शहरात शांतता राखावी, असे आवाहन नंदुरबार पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## नंदुरबारमध्ये गुंडांचा धुमाकूळ!

### जातिवाचक शिवीगाळ करत खुनाचा प्रयत्न अन् भररस्त्यात लुटमार




**नंदुरबार** : शहरात एकाच रात्री गुन्हेगारी प्रवृत्तीच्या तरुणाने साथीदारांसह धुमाकूळ घातल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. मुख्य संशयित आकाश बाबूलाल धनगर याने तरुणावर जातिवाचक शिवीगाळ करत खुनाचा प्रयत्न केला, तर काही वेळातच दुसऱ्या ठिकाणी एका चालकाला अडवून मारहाण करीत २० हजार रुपये लुटल्याच्या दोन वेगवेगळ्या घटना उघडकीस आल्या आहेत. या दोन्ही प्रकरणी नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



पहिली घटना १३ मार्चला रात्री अकराच्या सुमारास शहरातील धुळे नाका परिसरातील जैन पेट्रोलपंपाजवळ घडली. फिर्यादी कपिल राजू बैसाणे हे भावाला पाहण्यासाठी गेले असता, तेथे बसलेला आकाश बाबूलाल धनगर (वय २७, रा. संजयनगर) याने 'हा येथे कसा काय आला?' असे म्हणून जातिवाचक शिवीगाळ केली. त्यानंतर दुचाकीतून धारदार लोखंडी वस्तू काढून कपिल यांच्या छातीवर ठार मारण्याच्या उद्देशाने वार केला. या प्रकरणी भारतीय न्यायसंहिता कलम १०९ सह अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी संजय महाजन तपास करीत आहेत.

या घटनेनंतर अवघ्या अर्ध्या तासात, म्हणजे रात्री पावणेबाराच्या सुमारास आकाश धनगर याने इतर साथीदारांसह छत्रपती शिवाजी नाट्यमंदिर रस्त्यावरील भरकादेवी आईस्क्रीम पार्लरसमोर दहशत माजवली. फिर्यादी मौसिम अब्दुल धोबी (वय ३२, चालक) हे वाहनाने जात असताना आकाश धनगर, विजय दिलीप पाटील, ऋषिकेश ऊर्फ राण्या दिलीप मिस्त्री व इतर दोन साथीदारांनी त्यांना अडवले. संशयितांनी मौसिम यांना अश्लील शिवीगाळ करत हाताबुक्क्यांनी आणि दुचाकीच्या चावीने डोक्यावर व छातीवर मारहाण केली. इतकेच नव्हे, तर त्यांच्या गाडीत ठेवलेले २० हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतले. या प्रकरणी दरोडा व मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक धर्मराज पहले तपास करीत आहेत.

दोन्ही घटनांमधील मुख्य संशयित एकच असल्याने शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलीस निरीक्षक नीलेश देसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक पुढील कारवाई करीत असून, संशयितांच्या मुसक्या आवळण्याचे काम सुरू आहे.

## कोराई खापर येथे गॅस सिलेंडरचा काळाबाजार!

### पोलिसांत एकाविरुद्ध गुन्हा; पावणेदोन लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**शहादा, १६ मार्च**

अक्कलकुवा तालुक्यातील कोराई खापर येथे घरगुती गॅस सिलेंडरमधील गॅस बेकायदेशीरपणे मोटारपंपाच्या सहाय्याने काळ्या बाजारात विक्री करणाऱ्यावर नंदुरबार स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई केली आहे. कारवाईत पोलिसांनी एक लाख ८७ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, १४ मार्चला सायंकाळी साडेपाचच्या सुमारास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस नाईक चेतन कृष्णा सावळे (वय ३५) यांनी कोराई खापर येथे छापा टाकला. या वेळी संशयित राजमल मदन जैन (वय ४८, रा. कोराई खापर) हा राहत्या घराच्या आडोशाला विनापरवाना घरगुती गॅस सिलेंडरमधील गॅस, मोटारपंपच्या सहाय्याने विक्री करताना मिळून आला. ज्वलनशील पदार्थ असल्याचे माहीत असतानाही स्वतःच्या व लोकांच्या जीवितास धोका निर्माण होईल अशा पद्धतीने हा व्यवहार सुरू होता.

कारवाईत सुमारे एक लाख ८७ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यात सुमारे पंधरा हजारांची गॅस भरण्यासाठी वापरण्यात येणारी स्प्रेअर पंप व लोखंडी रेग्युलेटर असलेली असेम्बल मोटार, पंधरा हजारांचा फाइव्ह स्टार कंपनीचा काळ्या रंगाचा वजन काटा, ३६ हजारांचे इंडेन कंपनीचे गॅसने भरलेले नऊ सिलेंडर, २५ हजारांचे इंडेन कंपनीचे पाच रिकामे सिलेंडर असा सुमारे एक लाख ८७ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी संशयित राजमल जैनविरुद्ध भारतीय न्यायसंहिता २०२३ चे कलम २८७, २८८, १२५ आणि जीवनावश्यक वस्तू अधिनियम कलम ३ व ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक सारंग नवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक गुमानसिंग तपास करीत आहेत.

## नंदुरबार येथे प्रेमप्रकरणातून तरुणावर लोखंडी रॉडने हल्ला

**२५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल**

**नंदुरबार** : शहरातील वावद रस्त्यावरील स्वामी समर्थ केंद्राजवळ २७ वर्षीय तरुणावर लोखंडी रॉडने प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली. बहिणीसोबत असलेल्या प्रेमसंबंधाच्या रागातून हा प्रकार घडल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. या प्रकरणी नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात मुख्य संशयितासह २५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राहुल संजय गिरासे (वय २७, रा. डोंगरगाव, ता. शहादा) हा ११ मार्चला सकाळी सव्वादहाच्या सुमारास नंदुरबार-शहादा रस्त्यावरील कच्च्या रस्त्यावरून जात होता. या वेळी संशयित तुषार झिपासिंग गिरासे (रा. कमाणे, ता. शिंदखेडा) आणि त्याच्यासोबत असलेल्या चार ते पाच साथीदारांनी राहुलला अडविले. संशयितांनी लोखंडी रॉडने राहुलला मारहाण केली, तर इतर साथीदारांनी लाथाबुक्क्यांनी मारून त्याला जखमी केले. या मारहाणीत राहुलचा मोबाइलदेखील फोडण्यात



आला असून, त्याला जीवे मारण्याची धमकी देण्यात आली.

जखमी राहुल गिरासे याला उपचारासाठी नंदुरबार येथील छत्रपती मल्टिस्पेशालिस्ट हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. या घटनेबाबत पोलिसांनी भारतीय न्यायसंहितेच्या कलम ११८ (२), १२६ (२), १८९ (१), १९१ (२), १९०, ३५१ (२) व इतर कलमांन्वये गुन्हा दाखल केला. सहाय्यक पोलीस निरीक्षक जयसिंग परदेशी तपास करीत आहेत.

## मशिदीत पाय पसरून बसल्यावरून पाच जणांकडून एकास बेदम मारहाण


**शहादा येथील पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा**
**शहादा, १६ मार्च**

मशिदीत पाय पसरून बसल्याचा राग मनात धरून एकाला पाच जणांनी मिळून बेदम मारहाण केल्याची घटना येथील कुकडेल भागात घडली. याप्रकरणी शहादा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी शफिक मेहमूद अन्सारी (वय ४२, रा. कुकडेल, शहादा) हे १४ मार्चला सायंकाळी पावणेसहाच्या सुमारास कुकडेल जामा मशिदीत बसले होते. या वेळी ते पाय पसरून बसले होते, याचा राग आल्याने संशयितांनी त्यांना गाठले. संशयित इक्बाल अफान अन्सारी याने फिर्यादीची कॉलर धरून त्यांना अश्लील शिवीगाळ केली आणि मशिदीबाहेर ओढून नेले. त्यानंतर संशयित आवेश इक्बाल अन्सारी आणि अज्जू इक्बाल अन्सारी यांनी लाकडी काठीने फिर्यादीच्या पाठीवर, मानेवर आणि उजव्या पायावर बेदम मारहाण केली. तसेच अख्तर इक्बाल अन्सारी आणि मोहसिन आफान अन्सारी यांनी फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून ठार मारण्याची धमकी दिली.

या प्रकरणी शफिक अन्सारी यांच्या फिर्यादीवरून शहादा



पोलिसांनी संशयित इक्बाल अफान अन्सारी, आवेश इक्बाल अन्सारी, अज्जू इक्बाल अन्सारी, अख्तर इक्बाल अन्सारी आणि मोहसिन आफान अन्सारी (सर्व रा. कुकडेल, शहादा) यांच्याविरुद्ध भारतीय न्यायसंहितेच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक हेमंतकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तापस सुरू आहे.

## नंदुरबार जिल्हाधिकारी कार्यालयात आरोग्य तपासणी

### जागतिक महिला दिनानिमित्त शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**नंदुरबार** : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी विशेष आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा रुग्णालयातर्फे शिबिर पार पडले. महिला आरोग्याबाबत जनजागृती करणे आणि नियमित तपासणीचे महत्त्व पटवून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

शिबिरात जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विनय सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा रुग्णालयातील विविध विभागांतील तज्ज्ञ डॉक्टरांनी कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी केली. यामध्ये स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. ऊर्मिला भोये, त्वचारोगतज्ज्ञ डॉ. प्रीती पाडवी, नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. दीपक वसावे, कान-नाक-घसातज्ज्ञ डॉ. कपिल दुसेजा, दंतरोगतज्ज्ञ डॉ. कल्पेश चव्हाण, जनरल फिजिशियन डॉ. रिजवान अन्सारी आणि बालरोगतज्ज्ञ डॉ.



कृष्णकुमार वळवी यांचा समावेश होता. शिबिरादरम्यान कर्मचाऱ्यांची रक्ततपासणी करून एचआयव्ही, थायरॉइड, हिपॅटायटिस आणि इतर आवश्यक चाचण्या करण्यात आल्या.

याप्रसंगी अपर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे यांनी सांगितले की, आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत आरोग्याकडे दुर्लक्ष होणे ही गंभीर बाब आहे. नियमित व्यायाम आणि संतुलित आहार सुदृढ जीवनासाठी आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. निवासी जिल्हाधिकारी आशा संघवी यांनी महिलांवरील दुहेरी जबाबदारीचा उल्लेख करत, महिला सुदृढ राहिल्यास समाज सुदृढ राहील, असे प्रतिपादन केले.

याप्रसंगी गणेश कासार यांनी प्रास्ताविक केले. तेजल माळी यांनी विविध आजारांच्या निदानाबाबत माहिती दिली. शिबिरासाठी उपजिल्हाधिकारी प्रमोद भामरे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी कल्पना ठुबे, सोनिया जहागिरदार, अस्मिता रघुवंशी, मीरा घुगे आणि जिल्हा रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. गोपाल गाडीलोहार यांनी आभार मानले. शिबिराला जिल्हाधिकारी कार्यालयातील महिला व पुरुष कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## शिंदखेड्यात भाजपतर्फे काँग्रेसच्या कथित कृत्याचा निषेध

### राहुल गांधींसह खासदारांच्या प्रतीकात्मक प्रतिमेस जोडे मारत आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**मेथी (शिंदखेडा), १६ मार्च**

संसदेच्या परिसरात काँग्रेस खासदारांकडून आयोजित कथित 'चाय पार्टी' प्रकरणाच्या निषेधार्थ शिंदखेडा शहरातील भगवा चौकात रविवारी (१५ मार्च) सायंकाळी पणन व राजशिष्टाचारमंत्री तथा पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या मार्गदर्शनात भाजपतर्फे निषेध आंदोलन करण्यात आले. आंदोलनादरम्यान खासदार राहुल गांधी यांच्यासह काँग्रेस खासदारांच्या प्रतिमेला जोडे मारत भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घोषणाबाजीने परिसर दणाणून सोडला.

अमेरिका व इस्राईलने इराणच्या विरोधात युद्धाची आक्रमक आघाडी उघडल्यामुळे जगावर गॅस कमतरतेचे संकट ओढवले असनू, त्यासंदर्भात १२ मार्चला संसदेत केंद्रीय अर्थसंकल्पावर चर्चा सुरू असताना काँग्रेस नेते राहुल गांधी व इतर विरोधी पक्षांतील खासदारांनी संसद परिसरातील मकर प्रवेशद्वाराजवळ चहा-बिस्कीट घेऊन 'चाय पार्टी' आयोजित केली होती. संसदेसारख्या देशाच्या सर्वोच्च लोकशाही संस्थेच्या परिसरात अशा प्रकारचा कार्यक्रम घेणे, ही खेदजनक व आक्षेपार्ह बाब आहे. संसद ही देशाच्या लोकशाही व्यवस्थेचे सर्वोच्च प्रतीक असून, तिची प्रतिष्ठा व मर्यादा राखणे ही प्रत्येक लोकप्रतिनिधीची जबाबदारी आहे. संसदीय परंपरा, नियम आणि शिस्त यांचे पालन करणे सर्व सदस्यांवर बंधनकारक आहे. मात्र, या घटनेच्या माध्यमातून संसद परिसराला एकप्रकारे 'पार्लमेंट पिकनिक स्पॉट' बनविण्याचा प्रयत्न करण्यात आला. विशेष म्हणजे मकर प्रवेशद्वाराजवळ कोणतेही धरणे-प्रदर्शन करू नये, असे लोकसभा अध्यक्षांचे स्पष्ट निर्देश असतानाही विरोधी पक्षातील खासदारांनी तेथे ठिय्या मांडत निषेध नोंदवण्याचा प्रयत्न केला. हे कृत्य संसदीय नियमांची तसेच अध्यक्षांच्या आदेशांची अवहेलना करणारे आहे. या पार्श्वभूमीवर शिंदखेडा शहरातील भगवा चौकात रविवारी (१५ मार्च) सायंकाळी भाजपेतर्फे निषेध आंदोलन करण्यात आले. आंदोलनादरम्यान राहुल गांधी यांच्या प्रतिमेस जोडे मारत 'राहुल गांधी मुर्दाबाद', 'राहुल गांधीचे करायचे काय, खाली डोके वर पाय' या घोषणांनी परिसर दाणाणून सोडला.

शहराध्यक्ष संजयकुमार महाजन यांनी सांगितले की, राहुल गांधी जर देशातील कमी झालेल्या एलपीजी गॅसच्या मुद्याबद्दल बोलत असतील, तर त्यांनी पहिले भारत सरकारच्या गोष्टीही ऐकल्या पाहिजेत. फक्त विरोधाला विरोध करू नये. सर्व जगात गॅस कमतरतेचे संकट ओढवले असून, त्याची झळ भारतालाही थोडीफार पोहोचलेली आहे. याचा अर्थ असा नाही की, भारतात गॅस कमतरतेचे मोठे संकट ओढवले आहे. भारत सरकार भारतीय नागरिकांना गॅस पुरवठा करण्यास सक्षम असून, नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही त्यांनी केले.

याप्रसंगी शहराध्यक्ष संजयकुमार महाजन, पाणीपुरवठा सभापती प्रतिनिधी दादा मराठे, नगरसेवक ज्ञानेश्वर सकट, नगरसेवक प्रतिनिधी चंद्रकांत सोनवणे,संदीप राजपूत, माजी नगराध्यक्ष युवराज माळी, माजी शहराध्यक्ष अ‍ॅड. विनोद पाटील, श्याम फुले, दिनेश गोसावी, गोपाल चौधरी, गणेश परदेशी आदींसह माजी नगराध्यक्ष, आजी-माजी उपनगराध्यक्ष, सभापती, नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जिल्ह्यातील युवकांना रोजगाराची सुवर्णसंधी!

## धुळ्यात आज प्लेसमेंट ड्राइव्ह

**धुळे** : जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र (धुळे) आणि मॉडेल करिअर सेंटर यांच्यातर्फे मंगळवारी (१७ मार्च) सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत शहरातील इतिहासाचार्य राजवाडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्लेसमेंट ड्राइव्ह-१२ (जागेवर निवड) होणार आहे.

नोकरीच्या शोधात असलेल्या जिल्ह्यातील युवक-युवतींना विविध खासगी कंपन्या, कारखाने, उद्योग-व्यवसाय आणि आस्थापनांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याच्या उद्देशाने प्रत्येक महिन्यात रोजगार सहाय्यासाठी विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. यासाठी स्वातंत्र्य मायक्रो फायनान्स, फिल्ड ऑफिसर-१५ पदे, फ्यूजन मायक्रो फायनान्स लिमिटेड- १० पदे, ओरिअन रोप्स प्रायव्हेटि लिमिटेड (धुळे)- २० पदे, सोना सुपर शॉप (धुळे)- १० पदे, डोमिनोड डिलिव्हरी एक्झिक्यूटिव्ह-१० पदे, नवकार लक्साइल (धुळे)- ४ पदे, नवकार हिरो (धुळे)- २ पदे, नवकार हुंडई (धुळे व नंदुरबार)- १२ पदे प्राप्त झाली आहेत. यासाठी नोकरीस इच्छुक दहावी, बारावी, पदवीधर, आयटीआय पात्रताधारक उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येऊन त्यांची जागेवरच निवड करण्यात येणार आहे.

अधिक माहितीसाठी https://www.mahaswayam.gov.in/ या वेबसाइट पोर्टलसंदर्भात संदीप बोरसे (९०९६०९७५२४) आणि https://www.ncs.gov.in/ पोर्टलसंदर्भात पीयूष परिहार (८००३३४३९४४) यांच्याशी संपर्क साधावा. दोन प्रतींत बायोडाटासह फोटो छायाप्रती संचासोबत ठेवून मंगळवारी सकाळी दहाला प्रत्यक्ष मुलाखतीसाठी राहावे, असे आवाहन प्रभारी सहायक आयुक्त चंद्रकांत दुसाने यांनी केले आहे.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### संत मुक्ताबाई पादुकांचे सावद्यात भव्य स्वागत

**सावदा :** संत मुक्ताबाई संस्थान मुक्ताईनगरतर्फे होणाऱ्या फिरत्या नारळी सप्ताह यंदा कुंभरखेडा ता. रावेर येथे होत असून यानिमित्ताने संत मुक्ताबाई यांच्या चरण पादुका प्रथमच रावेर तालुक्यात १६ रोजी आगमन झाले. सावदा शहरात सकाळी ११ वा दरम्यान आगमन झाले यावेळी शहरवासीयांतर्फे भक्तीभावपूर्ण स्वागत करण्यात आले, यावेळी महामंडलेश्वर आचार्य जनार्दनहरिजी महाराज, ह.भ.प. रवींद्रमहाराज हरणे, रवींद्र पाटील, नरेंद्र नारखेडे, यांचेसह हरिभक्त उपस्थित होते या चरण पादुका पालखीचे येथील विठ्ठल मंदीर, स्वामीनारायण मंदिर तसेच विविध चौकात स्वागत करण्यात आले, दरम्यान ठिकठिकाणी या पालखी सोहळ्यात अनेकांनी दूध, थंड पेय, सरबत देऊन सेवा केली, तर या पालखी सोहळ्यात लहान वारकरी यांनी अभांगवर खेळलेली पावली, तसेच वारकरी यांनी गायलेलले अभंग यांनी शहर भक्तीमय झाले होते.



### शास्त्री फार्मसी महाविद्यालयात स्नेहसंमेलन उत्साहात

**एरंडोल -** येथील शास्त्री फार्मसी महाविद्यालयात 'युफोरिया २२६' या वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. यावेळी स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी पारंपरिक व आधुनिक नृत्य, समूह नृत्य, गायन, नाटिका, फॅशन शो आदी विविध स्पर्धा उत्साहात पार पडल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. विजय शास्त्री, सचिव रूपा शास्त्री, उपप्राचार्य डॉ. पराग कुलकर्णी, प्रा. जावेद शेख, कार्यक्रम समन्वयक प्रा.राहुल बोरसे आदी उपस्थित होते. या स्पर्धांत विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. तसेच 'स्टुडन्ट ऑफ द इयर' हा पुरस्कार पदवी विभागात मुलींमधून नाजनीन सय्यद, तर मुलांमधून तुषार साळुंखे तसेच पदविका विभागातून आरती पाटील व महेंद्र पाटील यांना प्रदान करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा. अनुप कुलकर्णी यांनी तसेच विद्यार्थी प्रतिनिधी ऋषिकेश पाटील, प्रतीक्षा पाटील, प्रियंका सोनवणे व प्रज्ञा पाटील यांनी केले. प्रा. दिग्विजय पाटील, प्रा. गायत्री सूर्यवंशी, प्रा. योगेश्वरी लोहार, प्रा. मयुरी पाटील, प्रा. श्रद्धा शिवदे, प्रा. सुमेश पाटील, प्रा. मंगेश पाटील, प्रा. करण पावरा, प्रा. अनिता वळवी, प्रा. चंद्रभान पाटील, प्रशांत निळे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. प्रा. जावेद शेख यांनी आभार मानले.

### डोळ्यांत मिरचीपूड फेकत लुटणाऱ्या एकाला अटक

**अमळनेर :** बाजार समितीचे व्यापारी यतीन कोठारी यांच्या डोळ्यात मिरची पावडर फेकून तब्बल साडे पाच लाखांची रोकड असलेली पिशवी लांबवणाऱ्या टोळीतील मनोज अधिक मोकल (वय २५, रा. मोहाडी, धुळे) या एका संशयीताला एलसीबी पोलिसांनी नाशिक येथून अटक केली आहे. बाजार समितीचे व्यापारी यतीन कोठारी हे २५ फेब्रुवारी रोजी स्कुटीवरून पिंपळे रस्त्यावरील लामा जीनकडे जात असताना तीन जण मोटरसायकलवर आले. त्यांनी कोठारी यांचा चष्मा काढून डोळ्यात मिरचीपूड टाकत त्यांच्याजवळील साडे पाच लाख रुपयांची पिशवी खाली पडताच आरोपी ती घेऊन मंगरूळ मार्गे फरार झाले होते. या घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील सीसीटीव्ही फुटेजमधून तपास सुरू करण्यात आला. आरोपींचा मागोवा घेतला असता ते धुळे येथील असल्याचे समोर आल्यानंतर एलसीबीचे पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र वलटे व त्यांच्या पथकाने तपास करत आरोपी मनोज मोकल याला नाशिक येथे पकडून अमळनेर पोलीस ठाण्यात आणण्यात आले आहे.

### गुराख्यांकडूनच तीन गायींची विक्री, दोघांविरुद्ध गुन्हा

**अमळनेर :** गायी चारण्यासाठी दिलेल्या गुरांखांनी संबधीत शेतकऱ्यांच्या तीन गायींची परस्पर विक्री केल्याची घटना शिरूडनाका परिसरात उघडकीस आली. याप्रकरणी अमळनेर पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजेंद्र सुपडू पाटील, निलेश प्रकाश सूर्यवंशी, कृष्णा रतन ठाकरे या शेतकऱ्यांनी त्यांची प्रत्येकी एक गाय सागर श्याम परदेशी राजाराम नगर, भैय्या भगत बोरसे गल्ली अमळनेर या गुराख्यांकडे चारण्यासाठी दिल्या होत्या. काही दिवसांनंतर राजेंद्र पाटील यांची गाय परत आली नाही याची विचारणा केल्यावर संबधीत गुराख्यांनी गाय पळून गेल्याचे सांगितले. मात्र गायीचा मालक राजेंद्र पाटील यांना त्यांच्या मित्राकडून या गुराख्यांनी १२ मार्च रोजी रात्री गायी परस्पर विकल्याची माहिती मिळाली. याबाबत राजेंद्र पाटील यांनी अन्यत्र चौकशी केली असता या गुराख्यांनी इतर दोन गायी देखील विकल्याचे उघडकीस आले. याबाबत राजेंद्र पाटील यांनी अमळनेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून दोघा गुराख्यांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अधिक तपास हेडकॉन्स्टेबल प्रमोद पाटील करीत आहेत.

### गोवंशाची कत्तलीसाठी विक्री, तिघांना अटक

**अमळनेर :** कत्तलीसाठी नेत असलेल्या गोवंश असलेले वाहन गो रक्षकांनी पकडले होते. यासंदर्भात पोलीसांनी तपासांअंती शहरातील ताडेपुरा व तालुक्यातील वासरे येथील दोन अशा तीन संशयीतांना अटक केली. या तीघांना पोलीसांनी न्यायालयासमारे उभे केले असता त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. गो रक्षक सचिन महाजन, पवन बारी यांनी वाहन क्रमांक एम एच ५४ ओ १२२ मध्ये एक गोवंश कत्तलीसाठी नेला जात असल्याची माहिती पोलीस कॉन्स्टेबल अविनाश भदाणे यांना १४ मार्च रोजी दुपारच्या सुमारास शाहआलम नगर आयटीआय कॉलेजजवळ पेट्रोलिंगदरम्यान असताना दिली. त्यावेळी अविनाश भदाणे याने पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांच्या मार्गदर्शनाने वाहन चालक याची चौकशी केली असता बंटी उर्फ विजय कैलास धनगर वय २२ रा ताडेपुरा असे नाव सांगीतले. दरम्यान वाहनचालकाने विना परवानगी, कोणतीही वैद्यकीयचाचणी न करता गोवंशाची वाहतूक करीत असल्याचे आढळून आले. वासरे येथील गोवंश मालक नामदेव परमेश्वर पाटील, शरद रतीलाल पाटील यांनी पैश्याची गरज असल्याने तो मोईन नावाच्या व्यक्तीला विकण्यासाठी नेत असल्याचे सांगितले. पोलिसांनी चालकासह गोवंशाच्या मालकांस अटक करीत गुन्हा दाखल केला. तपास अधिकारी पोलीस निरीक्षक शरद काकळीज यांनी आरोपीना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली.

### प्रा. चव्हाण यांना क्रीडा जीवनगौरव पुरस्कार जाहीर

**चाळीसगाव :** शहरातील नानासाहेब यशवंतराव नारायणराव चव्हाण



महाविद्यालयातील निवृत्त उपप्राचार्य व क्रीडा संचालक प्रा. एम. वाय. चव्हाण यांना त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव म्हणून जिल्हा क्रीडा कार्यालयातर्फे क्रीडा जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. प्रा. चव्हाण यांना आतापर्यंत केलेल्या कार्यांची पावती म्हणून अनेक राज्यस्तरीय, विद्यापीठस्तरीय पुरस्कार मिळाले असून, त्यांनी अनेक आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविले आहेत. या मोलाच्या योगदानाबद्दल त्यांना क्रीडा जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला.

# गणपूरचे टरबूज राजस्थान, हरियाणात!

## नरेश पाटील यांनी केली अडीच महिन्यांत तेरा लाखांची कमाई



**गणपूर (चोपडा), १६ मार्च**

टरबूज खरेतर बागायतदार शेतकऱ्यांसाठी धोकादायक पीक. पूर्ण पक्व होऊनही हातात काय येईल, हे सांगणे तसे कठीण. मात्र, येथील नरेश शांताराम पाटील या युवा शेतकऱ्याने तीन एकर क्षेत्रांत लागवड केलेल्या टरबुजापासून अवघ्या ७५ दिवसांत १३ लाखांची कमाई केली असून, या क्षेत्रात असलेल्या आणि येऊ पाहणाऱ्या तरुण वर्गासाठी ही बाब उभारी देणारी अशीच आहे.

> पिकासाठी योग्य नियोजन केल्यास आणि वेळेवर मार्गदर्शनानुसार सर्व खते व मायक्रो न्यूट्रॉनचा पुरवठा केल्यास चांगल्या प्रकारचे उत्पन्न घेणे सहज शक्य आहे. मात्र, त्यासाठी वातावरणाची साथ हवी. हे तेवढेच खरे आहे.
> **- नरेश शांताराम पाटील (टरबूज उत्पादक, गणपूर, ता. चोपडा)**

नरेश पाटील यांनी वडील शांताराम तोताराम पाटील, बंधू भास्कर पाटील यांच्या मदतीने २९ नोव्हेंबर २०२५ रोजी खडके बुद्रुक (ता. एरंडोल) येथून सुरभी नर्सरीम धून रवी हायब्रीड सीडच्या सुपर बन्नी या वाणाची १८ हजार रोपे आणून त्यांची तीन एकर क्षेत्रात लागवड केली. पीक ७५ दिवस शेतात असताना वेळेवर आणि आज नव्हे; तर आत्ताच याप्रमाणे खते, मायक्रो न्यूट्रेन, वॉटर सोल्युबल खते, कीडनाशक वेळेवर फवारून अवघ्या ७५ दिवसांत केलेल्या प्रयोगाचे फलित प्रयत्नांना फळ देणारे ठरले आहे. त्यांच्या शेतात असलेल्या सुपर बन्नी या टरबुजांची विक्री त्यांनी चोपडा येथील व्यापारी रियाजभाई यांना केली. एक नंबर माल वीस रुपये प्रतिकिलो, तर दोन नंबर माल साडेसात रुपये प्रतिकिलो याप्रमाणे त्यांना विकला. एकूण तीन एकर क्षेत्रात त्यांनी ५८ टन माल वीस रुपये भावाने, तर १७ टन दोन नंबर माल साडेसात रुपये भावाने विकला. राहिलेला उर्वरित माल ठराविक रकमेवर विकून तीन एकर क्षेत्रात अवघ्या अडीच महिन्यांत १३ लाखांचे उत्पन्न घेऊन या क्षेत्रात एक प्रयोगशील शेतकरी म्हणून नावलौकिक मिळविला.

पीक घेत असताना नरेश पाटील यांना सोलोफाइन कंपनीचे विनायक पाटील व रवी हायब्रीड सीड्सचे भूषण बोरसे यांचे मार्गदर्शन लाभले. पाटील यांनी सुरुवातीला सरी काढून त्यावर प्लास्टिक मल्चिंग अंथरले आणि टरबुजांच्या रोपांची लागवड केली. साधारणपणे एका वेलीला दोन टरबूज चांगल्या प्रकारे पोसले जातील, अशा प्रकारे खतांचे नियोजन केले. माल निघाल्यानंतर पुन्हा त्याच बेडवर टरबूज लावण्याचा निर्णय त्यांनी घेतला असून, या पिकात त्यांनी त्यांचे कसब सिद्ध केले आहे.

**टरबूज पिकासाठी लागलेला खर्च**

खते, वॉटर सोल्युबल खते, मायक्रोन्यूट्रॉन, कीडनाशक आदींसाठी ९० हजार रुपये, सरी पाडणे व मल्चिंग अंथरणे- २२ हजार रुपये, १८ हजार टरबूज रोपे खरेदी- ४२ हजार रुपये. अशाप्रकारे खर्च केला असून, बागेची उत्तम प्रकारे निगा राखत आणि रोज बारीक निरीक्षण करून टरबुजाचे पीक पिकवले.

# जनतेच्या चेहऱ्यावरचे समाधान हाच खरा सन्मान

## पालकमंत्री पाटील : जळके येथे राजस्व समाधान शिबिर उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १६ मार्च**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर हे शिस्तीत व पारदर्शक पद्धतीने जनतेला सेवा देण्याचे व्यासपीठ आहे. विनाअडथळा मंजूर होणाऱ्या योजना आणि रयतेच्या न्यायासाठी उभे असलेले शासन या शिबिराच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचत आहे. जनतेच्या चेहऱ्यावरचे समाधान हाच आमचा खरा सन्मान आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले.

जळके (ता. जळगाव) येथे छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिराचे उद्घाटन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते गजानन महाराज मंदिरासमोरील पटांगणात झाले. या वेळी शेतकरी व ग्रामस्थांनी भागपूर उपसा सिंचन योजनेसाठी २५० कोटींचाा निधी मंजूर करून तसेच वसंतवाडी तांड्याला महसुली गावाचा दर्जा देत व शेतकऱ्यांना कर्जमाफी केल्याबद्दल पालकमंत्री पाटील यांचा सत्कार केला.

पालकमंत्री पाटील यांनी पोकरा योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन केले. शेतपाणंद रस्ते तयार करण्यासाठी शेतकऱ्यांचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. गावाच्या विकासासाठी एकजूट राखणे गरजेचे असून, चारचाकीच्या काळजीपेक्षा बैलाच्या खुराची काळजी महत्त्वाची असते, असे सांगत पालकमंत्री पाटील यांनी शेती व शेतकऱ्यांच्या कष्टांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच ''टायगर, बॉस अशा शब्दांपेक्षा 'मी शेतकरी आहे' हा अभिमान प्रत्येकाने बाळगावा,'' असे भावनिक प्रतिपादन करत त्यांनी केले.



**शिबिरात लाभार्थ्यांना दिलेले लाभ**

डोमिसाईल २८, डिजिटल सातबारा १५६, सातबारा दुरुस्ती ३४, जात प्रमाणपत्र ६२, विविध शासकीय योजनांचे / प्रकरणे (संजय गांधी, विधवा, दिव्यांग, श्रावणबाळ) १५०, वारस नोंदी ४२, उत्पन्न दाखले ६६, फार्मर आयडी ४६ यासह इतर सेवांमधून एकूण ६४७ लाभार्थींना लाभ देण्यात आला. शिबिरात विविध विभागांचे माहितीपर स्टॉल लावण्यात आले होते. सुमारे ६००७०० नागरिकांची उपस्थिती नोंदवली गेली असून शासकीय सेवा थेट गावपातळीवर उपलब्ध करून देण्यात आल्या.

जिल्ह्यातील महिला बचत गटांनी स्वावलंबनाचा नवा आदर्श निर्माण केला असून, त्यांना शासनाच्या विविध योजनांचा अधिकाधिक लाभ मिळाला पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी प्रास्ताविकात अभियानाचे महत्त्व स्पष्ट केले. नागरिकांना दैनंदिन शासकीय कामांमध्ये येणाऱ्या अडचणी या शिबिराच्या माध्यमातून तत्काळ सोडविण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे त्यांनी सांगितले. बळीराजा शेतपाणंद रस्ते मोकळे करण्यासाठी शेतकऱ्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. जिल्हाधिकारी घुगे यांनी शिबिरात उभारण्यात आलेल्या विविध दहा विभागांच्या स्टॉलना भेट देऊन माहिती घेतली तसेच नागरिकांना दिल्या जाणाऱ्या लाभांचा आढावा घेतला.

या वेळी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य पवन सोनवणे, गटविकास अधिकारी चंद्रकांत बोढरे, तालुका वैद्यकीय अधिकारी प्रमोद पांढरे, दूध संघाचे संचालक रमेश पाटील, अर्जुन पाटील, तालुकाप्रमुख शिवराज पाटील, नायब तहसीलदार डी. बी. जाधव, मंडळ अधिकारी प्रवीण बेंडाळे, अजिंक्य आंधळे, उपसरपंच निवृत्ती पाटील, पी. के. पाटील, सरपंच विनोद पाटील, स्नेहा साठे, राजाराम राठोड, दिनेश पाटील, प्रदीप पाटील, धैर्यसिंग पाटील, बाळू शेरे तसेच जळके परिसरातील सरपंच, उपसरपंच, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन, संचालक, ग्रामपंचायत सदस्य, लाभार्थी, अधिकारी - कर्मचारी, महिला व शेतकरी उपस्थित होते. नायब तहसीलदार प्राजक्ता केदार यांनी सूत्रसंचालन केले. तहसीलदार शीतल राजपूत यांनी आभार मानले.



## पारोळ्यात 'सदगुरू महिला उद्योग'तर्फे २१ कर्तबगार महिलांना हिरकणी पुरस्कार

**पारोळा :** येथील 'सदगुरू महिला उद्योग'च्या वतीने तालुक्यातील विविध कार्यक्षेत्रात योगदान देणाऱ्या २१ महिलांचा जागतिक महिला दिनानिमित्त हिरकणी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष मृणाल पाटील, प्रमुख अतिथी नगरसेविका किरण पाटील, महिला व बालविकास विभागाच्या सहाय्यक अधिकारी मिना पाटील आणि डॉ. राजकुमारी जैन आदी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज आणि राणी लक्ष्मीबाई यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.

'सदगुरू महिला उद्योग'च्या अध्यक्षा सुवर्णा पाटील यांनी शेती, उद्योग, कायदा, वैद्यकीय, पोलीस, शिक्षण, समाजसेवा, आरोग्य, अंगणवाडी आणि अनौपचारिक क्षेत्र (भाजी विक्रेत्या) अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या २१ महिलांना 'हिरकणी पुरस्कार' प्रदान करण्यात आला. यात महिला सक्षमीकरणाचा संदेश देणाऱ्या शालिनी पाटील शेतकरी, डॉ. खुशी पाटील सीईओ, डायमर इंडिया इंटरनॅशनल, संगीता पाटील, रेखा क्षत्रिय महिला उद्योजिका, निकिता पाटील स्वसंरक्षण, डॉ. सुवर्णा पाटील वैद्यकीय अधिकारी, ॲड. स्वाती शिंदे, ॲड. वनिता शिंपी, सविता पाटील, भाग्यश्री पाटील पोलीस विभाग, ज्योती पाटील अंगणवाडी सेविका, मिना पाटील महिला बालविकास सहाय्यक अधिकारी, शितल सोनवणे कनिष्ठ सहाय्यक, विद्या टेहल्यानी शिक्षक, लता मोरे, सोनाली पवार, आशाताई माळी, उन्नती अहिरराव, सविता कोळी, तेजस्वीनी पाटील आदी महिलांना हिरकणी पुरस्कार प्रदान करण्यात आला. दरम्यान, सांस्कृतिक आणि आरोग्य जनजागृती कार्यक्रम ंतर्गत समूह नृत्य, लावणी, उखाणा स्पर्धा आणि 'सुर संगम' ऑर्केस्ट्रा आदी मनोरंजक खेळांचा समावेश होता. आरोग्य सत्रात नाशिक येथील डॉ. शिरसाट आणि हेमलता शिरसाट यांनी ॲक्युप्रेशर व नाडी परीक्षणाद्वारे मार्गदर्शन केले. डॉ. राजकुमारी जैन यांनी जागतिक ग्लाकोमा सप्ताहानिमित्त डोळ्यांच्या आरोग्य तसेच, ग्लाकोमा जनजागृतीसाठी १५ एप्रिलपर्यंत रील किंवा पोस्टर निर्मिती करण्याचे आवाहन त्यांनी केले. सूत्रसंचालन जीवन मोरे यांनी केले. सद्गुरू महिला उद्योगाच्या अध्यक्षा सुवर्णा पाटील यांनी आभार मानले. यशस्वितेसाठी सदगुरू महिला उद्योगाच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.



# नवी दिल्लीतील 'वूमन फॉर ट्रीज'मध्ये पाचोऱ्यातील महिला बचत गटांचा गौरव

**पाचोरा :** केंद्र सरकारच्या अमृत योजनेंतर्गत 'वूमन फॉर ट्रीज'मध्ये सहभागी महिला बचत गटांचा गौरव करण्यासाठी नवी दिल्ली येथील भारत मंडपममध्ये 'अमृत मित्र महोत्सव' घेण्यात आला. केंद्रीय शहरी विकासमंत्री मनोहरलाल खट्टर अध्यक्षस्थानी होते. शहरी विकास खात्याचे सचिव, सहसचिव व इतर अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमास देशभरातील ३० राज्यांमधून महिला बचत गटांचे प्रतिनिधी उपस्थित होते. विशेष म्हणजे एका नगरपरिषदेचे सर्वाधिक प्रतिनिधी म्हणून पाचोरा शहराचे ८० महिला बचत गट प्रतिनिधी उपस्थित होते.

कार्यक्रमात अमृत योजनेविषयीच्या चर्चासत्रात पाचोरा पालिकेचे मुख्याधिकारी मंगेश देवरे यांना संधी देण्यात आली. त्यांनी पाचोरा शहरात महिला बचत गटांमार्फत केलेल्या वृक्षारोपण कामाची माहिती दिली. शहरात खुले भूखंड सुव्यवस्थित असल्याने वृक्षलागवड करणे शक्य झाले. महिला बचत गटांना पालिका क्षेत्रात अधिकाधिक कामे मिळण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षणाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमामुळे पाचोरा शहरातील बचत गटांचा उत्साह नक्कीच वाढणार असून, येत्या काळात अधिकाधिक कामे करण्यास महिला सक्षम होतील. कार्यक्रमास महिला बचत गटांसोबत जिल्हा सहआयुक्त जनार्दन पवार, मुख्याधिकारी मंगेश देवरे, उपमुख्याधिकारी दुर्गेश सोनवणे, कर अधीक्षक दगडू मराठे, शहर अभियान व्यवस्थापक अर्जुन भोळे, पाणीपुरवठा अभियंता श्रुतिका धात्रक, भांडारपाल प्रगती खडसे, समूह संघटक कुणाल तायडे उपस्थित होते.

# चाळीसगाव तालुक्यातील विद्यार्थ्यांचा विधानसभा-विधान परिषद अभ्यासदौरा

## चार प्राध्यापकांसह विशेष बसने मुंबईकडे रवाना

**चाळीसगाव, १६ मार्च**

आमदार मंगेश चव्हाण यांच्या संकल्पनेतून दरवर्षी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विधानसभा व विधान परिषद अभ्यासदौऱ्याचे आयोजन करण्यात येते. याच उपक्रमांतर्गत यावर्षी नानासाहेब य. ना. चव्हाण वरिष्ठ महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागातील ४९ विद्यार्थी व ४ प्राध्यापक सोमवारी (१६ मार्च) विशेष बसने मुंबईकडे रवाना झाले.

अभ्यासदौऱ्याच्या प्रारंभी आमदार मंगेश चव्हाण यांच्या कार्यालयात विद्यार्थी व प्राध्यापक एकत्र जमले. या वेळी महापुरुषांच्या जयघोषात उत्साहपूर्ण वातावरणात या अभ्यासदौऱ्याची सुरुवात करण्यात आली.

मुंबई येथे विद्यार्थी विधानसभा व विधान परिषद या दोन्ही सभागृहांतील कामकाज प्रत्यक्ष पाहणार आहेत.



सभागृहातील चर्चा, प्रश्नोत्तरांची प्रक्रिया, विधिमंडळाचे कामकाज व लोकशाही पद्धतीने शासनव्यवस्था कशी चालते याची माहिती विद्यार्थ्यांना या अभ्यासदौऱ्यातून मिळणार आहे.

अभ्यासदौऱ्यातील दोन्हीकडील प्रवास, मुंबईतील निवास व भोजनव्यवस्था तसेच मंत्रालयातील आवश्यक परवानग्या या सर्व खर्चाची जबाबदारी आमदार मंगेश चव्हाण यांनी घेतली आहे. या उपक्रमाचे समन्वयक राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. राजू परभत निकम असून, त्यांना प्राचार्य डॉ. गुणवंतराव बी. शेळके, उपप्राचार्य डॉ. जी. डी. देशमुख, डॉ. पी. एस. पाडवी, प्रा. एम. एस. बेलदार यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

कला शाखेबरोबरच विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनाही विधानभवनाचा अनुभव मिळावा यासाठी संगणक विभागप्रमुख प्रा. डॉ. पाटे, प्रा. साक्षी चव्हाण, प्रा. माधुरी देशमुख यांनी सहकार्य करून विद्यार्थ्यांची निवड करण्यात मदत केली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पुस्तकातून शिकलेली लोकशाही व्यवस्था प्रत्यक्ष अनुभवता यावी, या उद्देशाने आमदार मंगेश चव्हाण यांच्या पुढाकारातून हा अभ्यासदौरा आयोजित करण्यात आला आहे.

# रणाईचे, भरवस येथील महानुभाव पंथाच्या तीर्थक्षेत्रासाठी २ कोटी ९० लाखांचा निधी

## आमदार पाटील यांची माहिती; सभामंडप, डोम, सुशोभीकरण व विकासकामे लागणार मार्गी

**तभा वृत्तसेवा**
**अमळनेर, १६ मार्च**

तालुक्यातील रणाईचे व भरवस येथील महानुभाव पंथाच्या तीर्थक्षेत्रासाठी राज्य शासनातर्फे दोन कोटी ९० लाखांचा निधी मंजूर झाला असून, निधीतून

मंदिर परिसरात सभामंडप, डोम, सुशोभीकरण व पर्यटनाच्या अनुषंगाने विविध विकासकामे लागणार मार्गी लागणार असल्याची माहिती माजी मंत्री तथा आमदार अनिल पाटील यांनी दिली.

याबाबत शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक विभागाचे आदेश ११ मार्चला प्राप्त झाले असून, यात तालुक्यातील रणाईचे व भरवस येथील देवस्थानांचा समावेश आहे. यात रणाईचे येथील महानुभाव



पंथाच्या श्रीकृष्ण मंदिर परिसरात सभामंडप बांधकामासाठी एक कोटी, रणाईचे येथील महानुभाव पंथाच्या श्रीकृष्ण मंदिर परिसरात सुशोभीकरणासाठी एक कोटी आणि रणाईचे येथील महानुभाव पंथाच्या श्रीकृष्ण मंदिर परिसरात सभामंडप व डोम बांधकामासाठी ५० लाख, तसेच भरवस येथील श्री चक्रधर स्वामी मंदिर परिसरात पर्यटनविषयक विविध विकासकामांसाठी ४० लाख, असे दोन कोटी ९० लाखांच्या विकासकामांचा समावेश आहे.

अमळनेर तालुका तथा मतदारसंघात रणाईचे व भरवस हे महानुभाव पंथाचे तीर्थक्षेत्र असून, या ठिकाणी संपूर्ण महाराष्ट्रातून महानुभाव पंथाचे अनुयायी येत असतात. आमदार अनिल पाटील हेही श्रद्धेने या परिवाराशी जुळले आहेत. या ठिकाणी भाविकांच्या सोयीसाठी व मंदिर सुशोभीकरणासाठी निधी आवश्यक असल्याने रणाईचे येथील परमपूज्य प. म. वर्धनस्थ बीडकर बाबा महानुभाव व भरवस येथील परमपूज्य ढोकीकर बाबा यांनी विकासकामांसाठी निधीची मागणी केली होती. याशिवाय, अखिल भारतीय महानुभाव परिषदेचे अध्यक्ष कवीश्वर कुळाचार्य श्री. कारंजेकर बाबा, प्रकाशशेठ नन्नावरे यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील महानुभव पंथाच्या तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी निधीची मागणी केली होती. अखेर राज्य शासनाने या तीर्थक्षेत्रास निधी मंजूर करून भाविकांची मोठी सोय केली असून, यामुळे रणाईचे व भरवस येथील दोन्ही तीर्थक्षेत्रांचा कायापालट होणार असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

निधीच्या मंजुरीबद्दल आमदार अनिल पाटील व खासदार स्मिता वाघ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, पर्यटनमंत्री शंभूराजे देसाई, पर्यटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक व पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# ज्वारीवरील अळींचा प्रादुर्भाव; कृषी विभागातर्फे प्रत्यक्ष पाहणी

## आमदार अमोल पाटील यांचा पाठपुरावा

**तभा वृत्तसेवा**
**पारोळा, १६ मार्च**



एरंडोल-पारोळा मतदारसंघातील ज्वारी पिकावर पडलेल्या अळीच्या प्रादुर्भावामुळे शेतकरी चिंतेत होते. यासंदर्भात, कृषी विभागाने पाहणी करीत ड्रोनव्दारे फवारणी करण्याची मागणी आमदार अमोल पाटील यांनी राज्य शासनाकडे केली होती. आमदार पाटील यांच्या पाठपुराव्याने कृषी विभागाने तत्काळ कृती आराखडा राबवण्यास सुरुवात केली आहे. कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष शेतीक्षेत्रात जाऊन पाहणी केली जात आहे.

ज्वारी पिकावर अळीचे आक्रमण होवून हाती येत असलेल्या उत्पन्नाची नासाडी होत आहे. यासंदर्भात कृषी विभाग अधिकाऱ्यांनी तालुकापातळीवर प्रत्यक्ष पाहणी करीत अळी संसर्ग असलेल्या बाधित क्षेत्राचे पंचनामे करण्यात यावेत. शेतकऱ्यांना तातडीने कीटकनाशके उपलब्ध करून देणे, ड्रोनद्वारे फवारणी आणि तज्ज्ञांमार्फत मार्गदर्शन देण्याची मागणी एरंडोलचे आमदार अमोल पाटील यांनी मुख्यमंत्री व संबंधित मंत्र्यांना निवेदनाव्दारे केली होती. या मागणीची दखल घेत कृषी विभागाची पथके आता युद्धपातळीवर काम करत आहेत. शेतकऱ्यांनी पिकांची नियमित पाहणी करून अळीचा प्रादुर्भाव आढळल्यास तत्काळ कृषी विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. लोकप्रतिनिधींच्या पाठपुराव्यामुळे ज्वारी पिकाचे होणारे संभाव्य नुकसान टाळण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## महत्त्वाचे

### चोरट्या वाळूचे पकडलेले ट्रॅक्टर पळवून नेले

**जळगाव :** नदीपात्रातून उत्खनन केलेल्या वाळुची चोरटी वाळुचे ट्रॅक्टर पथकाने पकडले. हे ट्रॅक्टर तहसिल कचेरीत नेण्याचे चालकाला बजावले होते. मात्र चालकाने हे ट्रॅक्टर वाळु खनिजसह पळवून नेले. शनिवारी (१४ मार्च) रात्री ११ वाजेच्या सुमारास पळासदड गावात ही घटना घडली. मंडळ अधिकारी दीपक ठोंबरे यांच्या तक्रारीनुसार याप्रकरणी ट्रॅक्टर चालक , ट्रॅक्टर मालक अबरार खान यांच्या विरोधात एरंडोल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस नाईक दीपक पाटील हे तपास करीत आहेत.

### क्लासला जाणाऱ्या मुलीस पळविले

**जळगाव :** शहरातील क्लासेसला जाणाऱ्या सतरा वर्षीय मुलीस अमिष दाखवून पळवून नेले. शनिवारी (१४ मार्च) सकाळी दहा ते दुपारी चार वाजेच्या दरम्यान ही घटना जिल्हापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. मुलगी उशिरापर्यत घरी न परतल्याने तिचा कुटुंबियांनी शोध घेतला असता तपास लागला नाही. याप्रकरणी तक्रारीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक शांताराम देशमुख हे तपास करीत आहेत.

### घरासमोरून दुचाकी चोरली

**जळगाव :** घरासमोर लावलेली सुमारे ३० हजार रुपये किमतीची हिरो स्प्लेंडर(एमएच १९ सीई ७३९०) चोरट्याने हॅन्डल लॉक तोडुन चोरुन नेली. रविवारी (१५ मार्च) सकाळी सात वाजता ही घटना उघडकीस आली. दुचाकी मालक संदीप भिका कोळी (वय ३५,रा. खेडी भोकरी) यांच्या मालकीची ही दुचाकी होती. याप्रकरणी तक्रारीनुसार अडावद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. हवालदार संजय धनगर हे तपास करीत आहेत.

### तपासात मिळाल्या तरुणी


**जळगाव :** एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून बेपत्ता झालेल्या दोन तरुणी मिसिंग तपासातून पोलिसांना मिळुन आल्या. १२ जून २०१९ रोजी २४ वर्षीय तरुणी तसेच बुधवारी (१८ फेब्रुवारी) २६ वर्षीय तरुणी बेपत्ता झाली होती. या दोन्ही मिसिंग पोलिसात दाखल केल्या होत्या. रविवारी या दोन्ही तरुणी तपासात मिळाल्या. दोघांना त्यांच्या कुटुंबियांकडे स्वाधीन करण्यात आले.

### क्लासला गेलेला मुलगा बेपत्ता

**जळगाव :** क्लासला जातो,असे सांगुन गेलेला १८ वर्षीय मुलगा बेपत्ता झाला. कुटुंबियांनी शोध घेतला असता तपास लागला नाही. शुक्रवारी (१३ मार्च) सकाळी सव्वा सहा वाजेच्या सुमारास ही घटना एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत शहरात घडली. याप्रकरणी मिसिंग तपास हवालदार भगवान चौधरी हे करीत आहेत.

### अस्वस्थ गृहस्थाचा मृत्यू

**जळगाव :** अस्वस्थ वाटुन प्रकृती बिघडल्याने गृहस्थाचा मृत्यू झाला. हेमंत तुकाराम भोळे (वय ६३,रा. रिंगरोड, जळगाव) असे मृताचे नाव आहे. त्यांना अस्वस्थता जाणवु लागल्याने कुटुंबियांनी तत्काळ त्यांना आधी खाजगी हॉस्पिटलमध्ये नेले. तेथुन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात हलविले असता तपासणीअंती डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. याप्रकरणी वैद्यकीय अधिकारी यांच्या खबरीनुसार जिल्हापेठ पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. हवालदार रवींद्र ठाकरे तपास करीत आहेत.

**गरजूंसाठी शवपेटी उपलब्ध**

संपर्क – (०२५७) २२३६१६६, २२२३६९९



**अंकासाठी संपर्क**

'तरुण भारत' अंकासंदर्भात काही सूचना, तक्रारी किंवा काही अडचण असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

मो.९०२३३४५५५०
९६२३६०४७१२


# उत्तर महाराष्ट्रात सर्वाधिक तापमानाची जळगावात नोंद

## उन्हाच्या तीव्रतेत बचाव हीच सुरक्षितता ठरेल मोलाची

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १६ मार्च**

दिवसेंदिवस उन्हाचे चटके असह्य होवू लागले आहेत रविवारी (१५ मार्च) उत्तर महाराष्ट्रात सर्वाधिक तापमानाची नोंद जळगाव जिल्ह्यात झाली. यापार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन अलर्ट झाले असुन उन्हाच्या प्रहरात नागरिकांनी घराबाहेर पडू नये,असे आवाहन जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे. दरम्यान मंगळवारी (१७ मार्च) पासुन तीन ते चार दिवस पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असल्याने या काळात उष्म्यापासून दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

तिव्र उन्हात घराबाहेर पडू नये तसेच भरपूर पाणी प्यावे,असा सल्ला वैद्यकीय तज्ञांनी दिला आहे. रणरणते उन्हाच्या सहवासात उष्माघात होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे सुरक्षिता घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे. जळगाव जिल्ह्यात दरवर्षी उन्हाळ्याची तिव्रता मोठ्या प्रमाणात जाणवते. विदर्भातील एखादा जिल्हा वगळता १५ रोजी राज्यात सर्वाधिक तापमानाची नोंद जळगाव जिल्ह्यात झाली,अशी माहिती जिल्हाधिकारी घुगे यांनी दिली आहे. वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. प्रत्येक स्तरावर आवश्यक त्या वैद्यकीय सुविधा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, उपकेंद्र तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रात पुरेसा साठा उपलब्ध करुन देण्यात आला आहे,अशी माहिती जिल्हाधिकारी यांनी दिली.



दुपारपासुन तापमान अधिक असते. त्यामुळे शक्यतो महत्वाची कामे सकाळच्या प्रहरी आटोपून घरी थांबावे. भरपूर पाणी प्यावे. विशेषत: लहान मुले, ज्येष्ठ व वृध्द नागरिकांनी अधिक काळजी घ्यावी,असेही त्यांनी नमुद केले आहे.

**काय घ्यावी काळजी?**

विविध कामानिमित्त घराबाहेर पडणे आवश्यक असल्यास सकाळी लवकर ती आपटून घ्यावी. बाहेर जाताना कॉटन, सुती कपडे, डोक्याला तसेच चेहऱ्याला झाकुन घेणे आवश्यक आहे. याशिवाय सोबत पिण्याचे पाणी, खिशात कांदा ठेवण्याची दक्षता घ्यावी. दुपारी बारा वाजेनंतर घराबाहेर पडू नये. अथवा ऊन अंगावर घेऊ नये. दुपारच्या समयी रस्त्याचे पायी चालण्याचे जाणीवपूर्वक टाळले पाहिजे. जास्तीत जास्त पाणी पिण्याला प्राधान्य द्यावे. घराबाहेर असताना बर्फयुक्त पेयपदार्थ शक्यतो घेऊ नये.

**...तर विश्रांती हवीच**

शरीरातील पाण्याची पातळी कमी झाल्यानंतर तोंडाला कोरड , अंग गरम होऊन घाम येणे, उभे राहिल्यास चक्कर येणे अथवा गरगर वाटणे, अशक्तपणा अशी जाणीव होणे अथवा अस्वस्थ वाटणे. अशी लक्षणे उष्माची अथवा तिव्र उन्ह लागल्याची असतात. या लक्षणाची शरिरात जाणीव झाल्यास त्वरीत डॉक्टरकडे जावुन औषधोपचार घेण्याला प्राधान्य देणे, तसेच तत्काळ विश्रांती घेण्याची दक्षता घेणे आवश्यक असते.

हा त्रास अंगावर काढल्यास उष्म्याचा तिव्र त्रास होऊ शकतो. अचाकन चक्कर येऊन व्यक्ती जागेवर कोसळण्याची शक्यता बळावते. आणि त्यातून प्रकृती अधिक अत्यवस्थ होऊ शकते. त्यामुळे अशी लक्षणे जाणवल्यास त्वरीत वैद्यकीय सल्ला व उपचार हेच सर्वाधित सुरक्षिततेचे कवच ठरु शकेल.

वाढत्या तापमानामुळे खान्देशात उन्हाची तिव्रता वाढली असुन उष्माघाताची भीती व्यक्त केली जात आहे. नागरिकांनी स्वतःची काळजी घ्यावी,असा सल्ला वैद्यकीय सुत्रांकडून देण्यात आला आहे.

**घरगुती पेय उत्तम**

चिंचाचे पाणी, कैरीचे पन्हे, लिंबु सरबत, ताक हे घरी तयार करुन ते सेवन केल्यास आरोग्याला ते उत्तम औषध ठरते. यामुळे शरीराला गारवा मिळतो. आणि उष्म्यापासुन बचाव करण्याच्या उर्जत वाढ होते. त्यामुळे शारिरीक थकवा जाणवत नाही. तसेच उन्हापासुन मोठा दिलासा मिळत असतो.कांदा किसुन त्याचा रस हातापायाला लावल्यास उन्हं लागलेल्या व्यक्तीला लवकर आराम मिळतो. वाढत्या उन्हात शक्यतो बाहेर जाणे टाळावे आणि भरपूर पाणी पिऊन स्वतःचे रक्षण करावे, असे आवाहन हॉस्पिटल प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.





# मनपा कर्मचाऱ्यांवर अधिकचा भार; पालकमंत्र्यांना देणार पत्र

## जनता दरबारात उपमहापौरांनी साधला कर्मचाऱ्यांशी संवाद

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १६ मार्च**

महापालिकेत मनुष्यबळाची मोठी टंचाई आहे. त्यामुळे एका अधिकारी आणि कर्मचाऱ्याकडे चार-चार पदांचा अधिकचा पदभार आहे. परिणामी नागरिकांचे प्रश्न सोडवितांना कर्मचाऱ्यांना अनेक समस्या निर्माण होतात. ही बाब जनता दरबाराच्या माध्यमातून समोर आली असल्याची माहिती उपमहापौर मनोज चौधरी यांनी दिली. दरम्यान महापालिकेतील अपुऱ्या मनुष्यबळावर तोडगा काढण्यासाठी भरतीसंदर्भात पालकमंत्री गुलाबराव पाटील यांना पत्र देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

महानगरपालिकेत सोमवारी उपमहापौर मनोज चौधरी यांच्या संकल्पनेतून कर्मचाऱ्यांशी संवाद साधण्याकरीता जनता दरबारचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला उपायुक्त निर्मला गायकवाड, धनश्री शिंदे, मुख्यलेखाधिकारी तथा मुख्य लेखा परिक्षक विजयकुमार सोनवणे, सहाय्यक आयुक्त उदय पाटील इत्यादी अधिकारी तसेच विविध विभागांचे प्रमुख यावेळी उपस्थित होते. स्थायित्व प्रमाणपत्र, एकापेक्षा अधिक कार्यभार, निम्न पदावर असूनही वरिष्ठ पदाचे काम सोपवण्यात आलेल्यांना कोणताही अतिरिक्त मोबदला दिला जाणे, बी.एल.ओची अतिरिक्त जबाबदारी. ३० वर्षांपासून बहुसख्य 'ड' वर्गाचे कर्मचारी हे 'क' वर्गाची कामे करणाऱ्यांवरील अन्याय, कालबध्द पदोन्नती, विमा सुविधा मिळावी, पगाराची अनिश्चित तारीख, सेवानिवृत्त कर्मचारी यांची बंद केलेली एटीएम सेवा परत सुरु करण्यासाठी बँकेकडे पाठपुरावा करणे, थकित रकमा, कराच्या मोठ्या रकमा मनपात पोहोचवण्यासाठी सर्व प्रभाग समिति मिळून एका वाहनाची आवश्यकता आदी प्रश्न आणि समस्या यावेळी मांडण्यात आल्या. २००५ नंतर सेवेत लागलेल्यांना पेन्शन सुरु व्हावी यासाठी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे पाठपुरावा करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. सध्य स्थितीत मनपाकडे केवळ १३०० कर्मचारी कार्यरत आहेत, कर्मचारी संख्या कमी असल्यामुळे कर्मचारी वर्गांना अतिरिक्त कार्यभार सोपवणे भाग आहे. नविन भरतीसाठी बिंदु नामावलीचा विषय विभागीय आयुक्त कार्यालयाकडे पाठविण्यात आलेला असून त्यावर काम सुरु आहे. कालबध्द पदोन्नती देण्याबाबत कार्यवाही सुरु असून पहिल्या टप्प्यात ४५० जणांना कालबध्द पदोन्नती देण्यात आल्या आहेत. दीर्घ काळापासून बीएलओ असलेल्यांना कार्यमुक्त करण्यासाठी तहसिलदार यांना पत्र देण्यात येईल अशी माहिती प्रशासनाकडून यावेळी देण्यात आली. सेवानिवृत्तांचे ३५ कोटीचे देणे, महापालिकेच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी देखील याठिकाणी संवाद साधत आपल्या व्यथा मांडल्या. मनपा कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतरच्या त्यांच्या हक्काचे पैसे मिळालेले नाही. साधारणत: ३५ कोटी रूपयांचे देणे असल्याची माहिती उपमहापौर मनोज चौधरी यांनी दिली.



**पालकमंत्र्यांना भरतीबाबत पत्र**

महापालिकेत सद्यस्थितीला किमान ८०० कर्मचाऱ्यांची भरती होणे आवश्यक आहे. मात्र शासनाकडून तेवढी परवानगी मिळणे अवघड आहे. त्यामुळे किमान ३०० ते ४०० कर्मचारी भरती व्हावे आणि मुख्य पदांवर चांगले अधिकारी यावेत यासाठी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांची भेट घेऊन त्यांना पत्र देणार असल्याची माहिती उपमहापौर मनोज चौधरी यांनी दिली.

**दबावास बळी पडू नका**

मनपा कर्मचाऱ्यांनी कामे मन लावून व प्रामाणिक पणे करावित, कामे करतांना कोणाच्याही दबावास पडू नये, नियमबाहय कामे करण्यासाठी कोणी दबाव आणत असल्यास ती बाब महापौर, उपमहापौर इत्यादी पदाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी. चांगले काम करणाऱ्यांच्या आम्ही सदैव सोबत आहोत. त्याचबरोबर कर्मचाऱ्यांच्या अडचणी व त्यांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी पुरेपुर प्रयत्न केले जातील असे आश्वासन उपमहापौर मनोज चौधरी यांनी कर्मचाऱ्यांना दिले.

**यांनी मांडल्या समस्या**

कैलास चौधरी, गौरव सपकाळे, समिर बोरोले, कैलास गायकवाड, भारत बारी, अश्वजित घरडे, तेजस जोशी, रोहिदास चौधरी, अमोल सपकाळे, घनशाम बाविस्कर, सुजाता पाटील यांनी सभागृहात प्रत्यक्ष समस्या मांडल्या.

# केसीईएस अभियांत्रिकीत सौरऊर्जा तंत्रज्ञान प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १६ मार्च**

सौर ऊर्जेचे दिवसेंदिवस महत्व वाढत आहे. त्या अनुषंगाने या क्षेत्रातील कुशल व्यावसायिकांची गरज निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष तांत्रिक प्रशिक्षण मिळण्यासाठी हे केंद्र अत्यंत उपयुक्त ठरेल, असे सोलर एनर्जी सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष प्रफुल्ल पाठक यांनी सांगितले.

खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी संचलित अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन स्वायत्त महाविद्यालयात सोमवारी ( १६ मार्च) महाविद्यालयीन परिसरात सौर ऊर्जा तंत्रज्ञान प्रशिक्षण केंद्राचे दिमाखात उद्घाटन करण्यात आले. सौर ऊर्जा क्षेत्रातील जागरूकता, कौशल्य विकास आणि शाश्वत तंत्रज्ञान शिक्षणाला चालना देण्यासाठी हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.



कार्यक्रमाचे आयोजन खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रज्ञावंत नंदकुमार बेंडाळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून प्रफुल्ल पाठक बोलत होते. कार्यक्रमाला केसीईएस सोसायटीचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. एस. एन. भारंबे, करिअर कट्टा संचालक डॉ. शमा सराफ, प्रतिष्ठित उद्योजक योगेश मुंदडा, . श्याम अग्रवाल, डॉ ए पी जे अब्दुल कलाम कौशल्यचे संचालक प्रा. संजय पावडे, डॉ. के.बी. महाजन आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय सुगंधी यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात पारंपारिक दीपप्रज्वलनाने झाली. प्रा. शेफाली अग्रवाल यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला आणि सौर ऊर्जा क्षेत्रातील त्यांच्या योगदानावर प्रकाश टाकला. यावेळी संस्थेच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यानंतर मान्यवरांच्या हस्ते प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. पाठक यांनी उपस्थित प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधून सौर ऊर्जा क्षेत्रातील संधींची माहिती दिली.

सूत्रसंचालन प्रा. श्रुतिका घर्डे (विभागप्रमुख, एमबीए फिनटेक) आणि प्रा. शेफाली अग्रवाल यांनी केले. यशस्वीतेसाठी प्रशासकीय अधिष्ठाता प्रा. गणेश पाटील आणि प्रा. सचिन नाथ यांनी परिश्रम घेतले. शेवटी प्रा. श्रुतिका घर्डे यांनी आभार मानले.

## सोने-चांदीच्या दरात पुन्हा घसरण

**जळगाव :** सोने-चांदीच्या दरात घसरण सुरुच आहे. २४ तासात सोन्याचे भाव एक हजार ५०० रुपयांनी तर चांदीच्या दरात चार हजार रुपयांची घसरण झाली आहे. आठ दिवसात सोन्याच्या दरात ४ हजार रुपयाची तर चांदीच्या दरात १७ हजार ५०० रुपयाची घसरण झाली आहे. आज सोन्याचे दर एक लाख ५९ हजार तर चांदीचे दोन लाख ६१ हजार असे विना जीएसटीचे दर होते. जीएसटीसह सोन्याचे दर एक लाख ६४ हजार ६८० तर चांदीचे दर दोन लाख ६८ हजार ६८० रुपयांवर होता. अमेरिका इजराइल आणि इराण यांच्या युद्धजन्य परिस्थितीमुळे सराफ बाजारावर मोठा परिणाम झाल्याचे पाहायला मिळत आहे. धातुचे भाव खाली येत असल्याने ग्राहकांकडून खरेदीला पसंती दिली जाईल,असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# विद्यार्थ्यांच्या भोजन व्यवस्थेचा घेतला आढावा

## कुलगुरूंनी साधला पुरवठादारांशी संवाद

**जळगाव :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विद्यार्थी विद्यार्थिनींच्या वस्तीगृहातील खानावळ ठेकेदार यांच्यासोबत कुलगुरू प्रा. व्ही एल माहेश्वरी यांनी बैठक घेऊन गॅस सिलेंडर पुरवठासंदर्भात आढावा घेतला.

सद्यस्थितीतील गॅस सिलेंडर संदर्भात निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेत ि विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थिनींना वस्तीगृहात भोजन व्यवस्थेसंदर्भात कुलगुरु यांनी आढावा घेतला. भोजन व्यवस्था सुरळीत नियमित कायम सुरू असण्यासाठी विविध खानावळीतून भोजण पुरविले जात आहे. ठेका पध्दतीने विद्यापीठाने खानावळी कामाचा ठेका दिला आहे.

ही ठेकापध्दत सुरळीतपणे चालविण्याच्या अनुषंगाने कुलगुरुंनी विविध ठेकेदारांशी संवाद जाणुन निर्माण परिस्थितीची त्यांनी माहिती जाणुन घेतली. गॅस सिलेंडर उपलब्धतेच्या अनुषंगाने निर्माण परिस्थितीत विद्यार्थी विद्यार्थिनींच्या भोजन व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यावर त्यांनी भर दिला. विद्यापीठातील विविध खानावळ पुरवठादार यांच्या समवेत कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी थेट संवाद साधला. त्यांच्याकडून माहिती जाणुन घेतली.

गॅस सिलेंडर उपलब्धतेसंदर्भात माहिती जाणुन घेतली. विद्यार्थ्यांचा स्वयंपाकात कोणताही अडथळा येऊ नये, या अनुषंगानी कुलगुरु यांनी उपाययोजना करण्याचे निश्चित करण्याबद्दल सुचित केले.

यावेळी विद्यापीठाकडून प्र - कुलगुरू प्रा. एस टी इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, विद्यापीठ अभियंता इंजिनिअर राजेश पाटील उपस्थित होते. तर मुलांचे वस्तीगृह क्रमांक १,२,३, डॉ. एपीजे मुलांचे वस्तीगृह, मुलींचे वस्तीगृह क्रमांक १,२,३ व ४, बीजे मुलींचे वस्तीगृह, अल्पसंख्यांक मुलींचे वस्तीगृह अशा एकूण नऊ वस्तीगृहातील खानावळ पुरवठादार उपस्थित होते.

# जागतिक चिमणी दिनानिमित्त मातीचे परळ-कापडी पिशवी वाटप

## ऑर्किड नेचर फाऊंडेशनतर्फे काव्यरत्नावली चौकात राबविला उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १६ मार्च**

जागतिक चिमणी दिन (२० मार्च) औचित्य साधत परळ तसेच कापडी पिशव्या वाटप कार्यक्रम पार पडला. ऑर्किड नेचर फाऊंडेशन तर्फे रविवारी (१५ मार्च) सकाळी ७ ते ८:३० या वेळेत काव्यरत्नावली चौकात हा कार्यक्रम झाला.

यावेळी फाऊंडेशनचे अध्यक्ष आर. एन. कुलकर्णी, उपाध्यक्ष आर. एन. पाटील यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. मॅक टेक कंपनीचे डायरेक्टर सुधीर चौधरी, उद्योजक संतोष इंगळे आणि नगरसेविका वंदना इंगळे, डॉ. पराग जहागिरदार यांच्या आर्थिक मदतीने तसेच फाऊंडेशनचे पदाधिकारी आणि सदस्य यांच्या आर्थिक सहकार्यातून परळ वाटप कार्यक्रम शक्य झाला. सुधीर चौधरी आणि डॉ. पराग जहागिरदार यांचे गुलाबपुष्प आणि घरटं देऊन स्वागत करण्यात आले. फाऊंडेशनच्या देणगीदारांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले.



यावेळी रोटेरियन डी. ओ. चौधरी, सरिता खाचणे, उषा शर्मा, शंकरभाई पटेल, ऑर्किड नेचर फाऊंडेशनच्या सचिव सुनिता महाजन, कोषाध्यक्ष नितीन अट्रावलकर, डॉ. अमित चौधरी, कार्याध्यक्ष डॉ. विकास पाटील, नानासाहेब वाघ, दीपक तांबोळी, सुनील पवार, उमेश इंगळे, राजेंद्र गोसावी, अतुल कोल्हे, वसंत सोनवणे, जयंत राणे, विलास बरडे, विजय पाटील, उल्हास सुतार, सुनिता गुळवे, ज्योती गोसावी, रिटा येवले, मिनाक्षी सुतार, स्नेहल झोपे, लता इंगळे, नवनिर्वाचित सदस्य महेश जाधव, वाल्मिक साळुंखे, सोमनाथ महाजन या सर्वांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी झाला. तासभरात ३०० परळ वाटप झाले. उद्यानात मॉर्निंग वॉकला आलेले महिला, आबाल वृद्ध या सर्वांनी कार्यक्रमाचा लाभ घेतला.

**चिऊताईचे घरटे ठरले लक्षवेधी**

आजच्या कार्यक्रमाचे खास आकर्षण ठरले विक्रीसाठी ठेवलेले चिऊताईचे घरटे. चिमण्यांची कमी होत चाललेली संख्या लक्षात घेऊन त्यांच्या साठी निवाऱ्याची व्यवस्था करण्याच्या उद्देशाने ही घरटी तयार करण्यात आली आहेत. या उपक्रमालाही उत्तम प्रतिसाद मिळाला. घरट्यांना नागरिकांची पहिली पसंती मिळाली. अनेकांनी घरटं ॲडव्हान्स बुकिंग केले आहे.

**विजया नेरकर यांना पर्यावरणमित्र पुरस्कार**

फाउंडेशनच्या आजीवन सदस्या विजया नेरकर खास नाशिकहून जळगाव येथे या कार्यक्रमासाठी उपस्थित होत्या. त्यांच्या सामाजिक कार्याचा एक भाग म्हणून त्या जुन्या साड्यांपासून स्वतः पिशव्या शिवतात. त्यांच्या वयाच्या ७६ व्या वर्षीही अखंड काम सुरूच आहे. फाऊंडेशन तर्फे परळ सोबत कापडी पिशवी द्यावी जेणेकरून नागरिक प्लॅस्टिक पिशवीचा वापर करणार नाहीत. यासाठी विजया नेरकर यांनी ३०० पेक्षा जास्त पिशव्या स्वतः आणल्या. त्यांच्या आतापर्यंत केलेल्या सामाजिक आणि निसर्ग संवर्धन कार्याचा गौरव म्हणून ऑर्किड नेचर फाऊंडेशन तर्फे त्यांना पर्यावरण मित्र पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

# दुचाकी चोरट्यांचे कारनामे उघड

## नाशिकमधील दुचाकी जळगावात विक्री

**जळगाव :** शहरातील दुचाकीप्रकरणी दाखल गुन्ह्यात जिल्हापेठ पोलिसांनी मालेगाव येथील तिघांना जेरबंद केले. या तिघांचे दुचाकी चोरीचे धक्कादायक कारनामे तपासातून उघडकीस आले आहेत. या चोरट्यांनी नाशिक येथुन चोरलेली टीव्हीएस रायडर दुचाकी जळगाव येथे विकली होती. त्यानंतर जळगाव नवीन बसस्थानक परिसरातून स्प्लेंडर प्लस हिरो ही दुचाकी शिताफीने लंपास करत संशयित मालेगावला नेली होती. नाशिक जिल्ह्यात या दुचाकीची विक्री करण्याच्या तयारीत होते.

नवीन बसस्थानक दुचाकी चोरी प्रकरणी जिल्हापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता. तांत्रिक विश्लेषण करुन मलीक अल्ताफ अहमद अन्सार, मोहम्मद मुज्जमील अब्दुल खालक, अबुबकर नईम कौसर (रा. मालेगाव) यांना ताब्यात घेतले. चौकशीत संशयितांनी स्प्लेंडर प्लस ( एमएच १९ बीएस १५७३) ही काढुन दिली, तसेच नाशिकची विक्रीची गाडी जप्त केली.

रिमांडमध्ये तिघांची पुन्हा विचारपुस केली असता नाशकातील टीव्हीएस रायडर (एमएच १५ जेएफ ३६०९) या दुचाकीचा उलगडा झाला. कागदपत्रे नंतर देतो,असा बहाना करत ही दुचाकी संशयितांनी विकली. याच दुचाकीवर ग्राहकाला नवीन बसस्थानकापर्यत सोडावयास लावले. येथे आल्यानंतर हिरो स्प्लेंडर प्लस चोरुन तिघ्याने तिघे मालेगावकडे मार्गस्थ झाल्याची माहिती त्यांनी दिली.या दोन्ही दुचाकी पोलिसांनी हस्तगत केल्या आहेत.या गुन्ह्याचा तपास पोलीस नाईक संतोष सोनवणे हे करीत आहेत.

पोलीस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते, उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे, सपोनि प्रभारी अनिल वाघ यांच्या मार्गदर्शनात उपनिरीक्षक शांताराम देशमुख, हवालदार महेश महाजन, नरेश सोनवणे, संतोष सोनवणे, कॉन्स्टेबल तेजस मराठे, राहुल पाटील, नरेंद्र दिवेकर, अमीत मराठे, प्रवीण जाधव यांनी ही कारवाई केली.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### कुसुंबे खुर्द येथे बलिदान शिवव्याख्यान किर्तन सादर

**जळगाव :** कुसुंबे खुर्द येथे बलिदान मास शिवव्याख्यान सादर करत छत्रपतींच्या इतिहासाला उजळणी देण्यात आली. सोमवारी त्रीमुर्ती मित्रमंडळातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विशालमहाराज वेरुळकर यांच्या पहाडी आवाजाने छत्रपतींच्या शंभूराजे यांच्या कार्याची व बलिदानाची आठवण समस्त समाजाला करुन देण्यात आली यावेळी चंदू महाराज व गायक वादक समुहाने ताल धरुण मंत्रमुग्ध केले. या प्रसंगी किर्तनाचे मानकरी प्रमोद घुगे यांच्या वतीने विशाल महाराजांचा शाल व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. त्रीमुर्ती मित्रमंडळाचे सदस्य कैलास फेगडे, निर्मल पाटील, योगेश फेगडे, धनंजय दुसाने, गणेश मिस्तरी, महेश पाटील, मयुर पाटील, विशाल शेवाळकर, राजेश्वर चिंचोले, स्वप्निल पाटील, महेंद्र पाटील, भुषण पाटील, प्रसाद पाटील, कृष्णा सोनवणे, चंद्रकांत पाटील, रितेश पाटील, बबलु पाटील, अक्षय पाटील, अभिजित सोनवणे, सुधीर पाटील, महेश महाजन, मनोज कोल्हे, योगेश घुगे, जयवीर पाटील, वेदांत पाटील, दीपक महाजन, लोकेश राजपूत, खुशाल अहिरे यांनी परिश्रम घेत हा किर्तनसोहळा यशस्वीपणे पार पाडला. यावेळी शेकोडो संख्येने किर्तनाचा लाभ घेण्यासाठी महिला,पुरुष तरुण मुल,मुली व बाळगोपाळांनी गर्दी केली होती.

# स्वीकृत नगरसेवक पदासाठी आता २५ मार्चपर्यंत मुदत

## नावांबाबत एकमत न झाल्याने महायुतीचा प्रस्ताव

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १६ मार्च**



महानगरपालिकेच्या स्वीकृत नगरसेवक निवडीची प्रक्रिया आता लांबणीवर पडली आहे. या पदासाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत मंगळवारी संपत असतानाच, मनपा प्रशासनाने आता ही मुदत २५ मार्चपर्यंत वाढवून दिली आहे. सोमवारी दुपारपर्यंत एकही अर्ज दाखल न झाल्याने आणि कागदपत्रांच्या प्रक्रियेसाठी वेळ लागत असल्याने राजकीय पक्षांच्या गटनेत्यांनी केलेल्या मागणीची दखल घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.

स्वीकृत नगरसेवक निवडीसाठी मंगळवारपर्यंत अर्जांची मुदत होती. मात्र, ही निवड प्रक्रिया निवडून आलेल्या नगरसेवकांप्रमाणेच तांत्रिक आणि कायदेशीर कागदपत्रांच्या आधारे राबवली जाते. सोमवारी दुपारपर्यंत एकाही इच्छुकाने आपला अर्ज दाखल केला नव्हता. दुसरीकडे, राजकीय वर्तुळात नावांची जोरदार चर्चा असली, तरी कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण झाली नव्हती.

**ट्रॅफिक गार्डन समोरील अतिक्रमणावर कारवाई**

शहरातील शाहुनगर भागात ट्रॅफिक गार्डनसमोर दुकानासमोरील मोकळ्या जागेवर अतिक्रमण करून व्यवसाय करणाऱ्यांवर महानगरपालिकेने सोमवारी मोठा प्रहार केला. बॉम्बे बिर्याणी आणि श्रीराम चायनीज या दुकान चालकांनी दुकानासमोरील तब्बल १० फुटांच्या जागेत पत्र्याचे शेड टाकून अनधिकृत पक्के बांधकाम केले होते. अतिक्रमण निर्मूलन विभागाने सोमवारी सकाळी ११ वाजेपासून कारवाई करत हे अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त केले. सकाळी ११ वाजता अतिक्रमण निर्मूलन अधीक्षक संजय ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली साजीद अली व नाना कोळी यांचे पथक कारवाईसाठी पोहोचले. यावेळी एका दुकानदाराने केवळ आमच्यावरच कारवाई का?''असा सवाल करत पथकाशी हुज्जत घातली. यामुळे परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता. वादावादीमुळे ही कारवाई दुपारी २ वाजेपर्यंत रेंगाळली.

### गटनेत्यांचे आयुक्तांना साकडे

या पार्श्वभूमीवर भाजपचे गटनेता प्रकाश बालाणी, शिंदे सेनेचे विष्णू भंगाळे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रफुल्ल देवकर यांनी सोमवारी दुपारी नगरसचिवांची भेट घेतली. स्वीकृत नगरसेवक पदासाठी अर्ज दाखल करण्यासाठी किमान आठ दिवसांची मुदतवाढ मिळावी, असे मागणीपत्र त्यांनी दिले होते. प्रशासनाने या पत्राची तातडीने दखल घेत आता २५ मार्च रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत अर्ज स्वीकारले जातील, असे स्पष्ट केले आहे.

# उन्हाळ्यात सर्व भागातील नागरिकांना पाणी मिळायलाच हवे

## स्थायी समिती सभापतींचा आढावा; गळती दुरुस्ती करण्याच्या सूचना

**जळगाव, १६ मार्च**

महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचा आढावा स्थायी समिती सभापती डॉ. चंद्रशेखर पाटील यांनी घेतला. या बैठकीत विभागाचे अभियंता श्यामकांत भंडारकर यांच्यासह अन्य अभियंता व कर्मचारी उपस्थित होते. उन्हाळ्यात सर्व भागातील नागरिकांना पाणी मिळायलाच हवे, त्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने राबविण्याचे सुचना सभापतींनी पाणी पुरवठा विभागाला दिले.

सभापतींनी जलवाहिनीतील गळती तात्काळ दुरुस्त करण्याचे आदेश दिले. कोणत्याही भागातून पाणीपुरवठ्याबाबत तक्रार येऊ नये यासाठी अधिकारी व व्हॉलमॅन यांनी २४ तास आपले फोन सुरू ठेवावेत आणि नागरिकांच्या संपर्कात राहावे, असे त्यांनी स्पष्ट केले. नागरिकांच्या अडचणी त्वरित सोडविणे हीच प्रशासनाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. या बैठकीत पाणीपुरवठा विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनीही आपले मत मांडले. उन्हाळ्यातील वाढत्या मागणीचा विचार करून पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा करण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज राहणार असल्याचे आश्वासन दिले.

**दोन हजार वॉटर मिटर बसणार**

उन्हाळ्यानंतर शहरात दोन हजार वॉटर मिटर बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रयोगिक तत्वावर हा उपक्रम राबविला जाणार असून आयोध्यानगर, रायसोनी नगर आणि रामेश्वर कॉलनी परिसरात हे मिटर बसविले जाणार आहेत. या माध्यमातून पाणीपुरवठ्याची चाचणी घेऊन कार्यक्षमतेचा अभ्यास केला जाणार आहे.

**खोदलेले रस्ते बुजविणार**

तसेच नळ कनेक्शनसाठी खोदलेले रस्ते दुरुस्त करण्यासाठी घेतलेल्या रकमेचा उपयोग करून रस्ते बुजविण्याचे काम करण्यात येईल, अशी माहिती सभापतींनी दिली.

# आरसीसी ऑफ राईपतर्फे महिला अधिकारावर व्याख्यान



**जळगाव :** भारतीय महिलांच्या व्यथा आणि संघर्षाच्या अनेक यशोगाथा असल्या तरी स्त्री-पुरुष समानतेसाठी आजही व्यापक जनजागृती करण्याचे आवश्यक असल्याचे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या श्रद्धा रेखा राजेंद्र यांनी केले.

गणपती नगरातील रोटरी हॉलमध्ये रोटरी क्लब जळगाव पुरस्कृत आरसीसी ऑफ राईप आयोजित महिलांचे अधिकार विषयावरील व्याख्यानात त्या बोलत होत्या. याप्रसंगी व्यासपीठावर ॲड. रुपाली भोकरीकर, आरसीसी अध्यक्षा पल्लवी शिंपी व क्लबचे मानद सचिव सुभाष अमळनेरकर यांची विशेष उपस्थिती होती. मनोगतात त्या म्हणाल्यात कि, संविधान सभेतील १५ महिलांच्या योगदानाच्या प्रेरणादायी कहाण्या आणि संविधान सभेत महिलांच्या अधिकारांसाठी केलेला संघर्ष समजून घेतला पाहिजे. कार्यक्रमाच्या सुरुवातीस वक्त्यांना मानपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रास्ताविक पल्लवी शिंपी यांनी केले. ॲड. रूपाली भोकरीकर यांनी मार्गदर्शन केले.

सूत्रसंचालन प्रतिभा शिंपी यांनी केले तर योगिता पाटील यांनी आभार प्रदर्शन केले व महिलांप्रती आदर व्यक्त करणारी शपथ दिली. कार्यक्रमास फर्स्ट लेडी ऑफ क्लब आदिती कुलकर्णी, डॉ. शुभदा कुलकर्णी, आरसीसी सदस्यांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थिती दिली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व आरसीसी सदस्यांनी परिश्रम घेतले.

# मनसेच्या शहर उपमहानगर अध्यक्षपदी आशुतोष जाधव

**जळगाव :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या जळगाव शहर संघटनेत महत्त्वाची संघटनात्मक नियुक्ती करण्यात आली असून आशुतोष जाधव यांची जळगाव शहर उपमहानगर अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. मनसेचे नेते ॲड. जयप्रकाश बाविस्कर यांनी ही नियुक्ती जाहीर केली असून संघटना अधिक मजबूत करण्यासाठी जाधव यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

नियुक्तीपत्रानुसार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची ध्येय-धोरणे, कार्यक्रम आणि संघटनात्मक उपक्रम जळगाव शहरात प्रभावीपणे राबविण्याची जबाबदारी आशुतोष जाधव यांच्यावर सोपविण्यात आली आहे. पक्षाच्या विचारसरणीचा प्रसार करत संघटनात्मक कामात सातत्य राखणे, सक्रियपणे काम करणे अपेक्षित असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. समाजात शिस्तबद्ध आणि जबाबदार पद्धतीने कार्य करत मराठी बांधव, भगिनी आणि मातांना अभिमान वाटेल असे कार्य करण्याची अपेक्षा पक्षाच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे. या नियुक्तीप्रसंगी मनसेचे जिल्हाध्यक्ष ॲड. जमील देशपांडे, महानगराध्यक्ष विनोद शिंदे, उपमहानगराध्यक्ष श्रीकृष्ण मेंगडे, ललित शर्मा, विभाग अध्यक्ष राहुल चव्हाण, खुशाल ठाकूर आदी पदाधिकारी उपस्थित होते.



# ठाकरे- सोनवणे गटाकडून परस्परविरोधी तक्रार

## १२ जणांवर गुन्हा ; संशयितांना बजावली नोटीस

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव,१६ मार्च**

शनिपेठ पोलीस ठाण्यात दोन गट भिडले होते. याप्रकरणी ठाकरे आणि सोनवणे गटाकडून परस्पर विरोधात तक्रार दिली. त्यानुसार दोन्ही गटाच्या एकुण बारा जणांवर शनिपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी संशयितांना नोटीसा बजावून तपासाला सुरुवात केली आहे. शासकीय कामात अडथळा तसेच पोलिसांना धक्काबुक्की केल्याप्रकरणी दोन्ही गटाच्या नऊ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**टेंडर भरण्याचे कारण**

छाया डिंगबर उर्फ शैलेंद्र ठाकरे (वय ४७,रा. वाल्मिकनगर, पक्की चाळ) यांच्या तक्रारीनुसार वार्ड क्रमांक तीनच्या डीपीडीसी गटारी बांधकामाचे टेंडर भरण्याचे कारणावरुन शनिवारी (१४ मार्च ) दुपारी साडेतीन ते चार वाजेच्या सुमारास त्यांच्या घराजवळ तसेच शनिपेठ चौकीजवळ संशयितांनी गैर कायद्याची मंडळी जमा केली. त्यांचे पती डिंगबर उर्फ शैलेंद्र रामदास ठाकरे तसेच त्यांचा मुलगा हितेश डिंगबर उर्फ शैलेंद्र रामदास ठाकरे यांना संशयितांनी शिवीगाळ केली. शनिपेठ चौक येथे लाठ्याकाठ्यांनी व चापटाबुक्क्यांनी मारहाण केली.

या प्रकरणी कैलास नारायण सोनवणे, विलास सोनवणे, सागर सोनवणे, कल्पेश सोनवणे तसेच दोन अनोळखी (रा. रिधुरवाडा, शनिपेठ) यांच्या विरोधात दंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला. तपास हवालदार शशिकांत पाटील हे करीत आहेत.

**शिवीगाळचा विचारला जाब**

माजी नगरसेवक कैलास नारायण सोनवणे (वय ५७,रा. रिधरवाडा,शनिपेठ) यांच्या तक्रारीनुसार संशयिताने फोनवर शिवीगाळ केली. त्याचा जाब विचाण्यासाठी त्यांच्यासह पुतणे असे शनिवारी (१४ मार्च) दुपारी साडेतीन ते चार वाजेच्या सुमारास संशयितांच्या घरी तसेच शनिपेठ चौकीजवळ गेले असता संशयितांनी शिवीगाळ केली. तेव्हा सोनवणे हे समजावून त्यांचे घराकडे जात असताना पुन्हा संशयितानी गैरकायद्याची मंडळी घेऊन शिवीगाळ केली. सोनवणे यांच्या पुतणे यांनी शिवीगाळ करु नका,असे सांगितल्याने संशयितांनी पुतणे विशाल व सागर यांना लाठ्याकाठ्यांनी मारहाण केली. या तक्रारीनुसार राहुल उर्फ मोगली शांताराम ठाकरे, निलेश ठाकरे, रितेश ठाकरे, हितेश ठाकरे, तसेच अन्य दोन अनोळखी (सर्व रा. वाल्मिकनगर )अशा सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. तपास हवालदार युवराज कोळी हे करीत आहेत.

### पोलिसांना धक्काबुक्की, शासकीय कामात अडथळा

शनिपेठ पोलीस ठाण्यात राडाप्रकरणी पोलिसांनी दाखल केलेल्या तक्रारीत दोन्ही गटाच्या नऊ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. शनिपेठ पोलीस ठाण्यातील गुन्हे शोध पथक कक्षात तसेच पोलीस ठाण्याच्या आवारात संशयितांनी पोलिसांसमक्ष काही एक न ऐकता आपसात मागील भांडणाच्या कारणावरुन एकमेकांना जिवे मारण्याच्या उद्देशाने त्या पध्दतीने कृती केली. झोंबाझोंबी करत चापटाबुक्क्यांनी मारहाण करत शिवीगाळ केली. त्यांना आवरण्यासाठी गेलेल्या पोलिसांचे काही एक न ऐकता आजुबाजुला ढकलले. धक्काबुक्की केली. शासकीय कामात अडथळा निर्माण केला.या तक्रारीनुसार माजी नगरसेवक कैलास सोनवणे, विलास सोनवणे, रोहित सोनवणे, कल्पेश सोनवणे, सागर सोनवणे, राहुल उर्फ मोगली मोहन उर्फ शांताराम ठाकरे, जयेश सोनवणे, आशिष उर्फ पहेलवान शैलेश ठाकरे, यश उर्फ सागर बाविस्कर यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. आणि या गुन्ह्यात सर्व संशयित आरोपींना अटक केली. उपनिरीक्षक संतोष खेडकर हे तपास करीत आहेत.

# छत्रपती शिवाजी उद्यानाचे सौंदर्यीकरण होणार

## महापौर दीपमाला काळे यांचेसह सभापती, अधिकाऱ्यांची पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १६ मार्च**

शहराचे वैभव असलेल्या मेहरूण तलाव आणि छत्रपती शिवाजी उद्यान परिसराच्या विकासासाठी जळगाव महानगरपालिका प्रशासन आता सरसावले आहे. सोमवारी १६ मार्च रोजी महापौर दीपमाला काळे यांनी या परिसराची सविस्तर पाहणी केली. यावेळी तलाव सुशोभीकरण, स्वच्छता आणि नवीन सुविधांबाबत त्यांनी अधिकारी व पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून महत्त्वपूर्ण सूचना दिल्या.

छत्रपती शिवाजी उद्यानाच्या पाहणीदरम्यान महापौरांनी उद्यानातील काडीकचरा, वाळलेल्या फांद्या आणि अस्वच्छता तातडीने दूर करण्याचे निर्देश दिले. नागरिकांना या उद्यानात चांगल्या सुविधा मिळतील या दृष्टीने प्रयत्न करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित विभागाला दिल्या. राज्यातील सर्वोत्कृष्ट टिशू कल्चर लॅब

यानंतर महापौरांनी सामाजिक वनीकरण विभागाच्या कार्यालयाला भेट दिली. या ठिकाणी नव्याने बांधण्यात आलेल्या जॉगिंग ट्रॅकची त्यांनी माहिती घेतली. विशेष म्हणजे, महापालिकेच्या मालकीच्या जागेवर राज्यातील सर्वोत्कृष्ट अशी टिशू कल्चर लॅब उभारली जात आहे. या लॅबमधील वृक्ष इतर संस्थांना वृक्षारोपणासाठी उपलब्ध करून दिले जाणार आहेत. ही लॅब उभारताना महापालिकेशी झालेला करार आणि तांत्रिक बाबींची माहिती यावेळी वनविभागाचे अधिकारी समाधान सोनवणे यांनी महापौरांना दिली.

**मेहरूण तलावावर गणेश घाटाच्या धर्तीवर विकास**

तलाव परिसरात ट्रॅक जवळ सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी केली. तलावाच्या एका बाजूला गणेश घाटाप्रमाणे आकर्षक पायऱ्यांची रचना करण्यात येत आहे. तलाव परिसरात रेलिंग बसवून तो भाग बंदिस्त करण्यात येईल. पर्यटनाला चालना देण्यासाठी लवकरच दोन बोटी सुरू करण्याची प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. तलावातील जलपर्णी महापालिकेने काढली असून, परिसरातील झाडाझुडपांची सफाई केली जाणार आहे. तलाव परिसरात पशुपालकांनी म्हशी आणू नयेत, यासाठी ठिकठिकाणी दिशादर्शक व प्रतिबंधात्मक फलक लावण्याचे आदेश देण्यात आले.



पुलाखाली छोटा ब्रिज तयार करून समांतर मार्ग (ट्रॅक) विकसित केला जाणार आहे. या पाहणी दौऱ्याप्रसंगी स्थायी समिती सभापती डॉ. चंद्रशेखर पाटील, ज्येष्ठ नगरसेवक नितीन लढ्ढा, गटनेते प्रकाश बालानी, नगरसेविका ॲड. शुचिता हाडा, नगरसेवक राजेंद्र घुगे पाटील, ऋतिक ढेकळे, रेखा पाटील, शहर अभियंता योगेश बोरोले, संदीप मोरे, विजय मराठे यांच्यासह महापालिकेचे इतर अधिकारी उपस्थित होते.

# खुन्नस दिल्याने लोखंडी रॉडने मारहाण आठ जणांवर तालुका पोलिसांत गुन्हा

**जळगाव,१६ मार्च**

खुन्नस दिली तसेच शिवीगाळ केल्याचे कारण पुढे करत संशयितंनी गॅरेज चालक व्यावसायिकाला लोखंडी रॉड तसेच लोखंडी विळ्याने वार करत जखमी केले.रविवारी (१५ मार्च) दुपारी तीन ते सव्वा तीन वाजेच्या सुमारास ही घटना आसोदा भादली रोड पिलु मोहल्ला येथे घडली. याप्रकरणी तक्रारीनुसार आठ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

शेख सलीम शेख लतीफ (वय ५४, रा. पिलु मोहल्ला आसोदा) यांच्या तक्रारीनुसार संशयितांनी गैरकायद्याची मंडळी जमविली. खुन्नस देण्याच्या व शिवीगाळ केल्याच्या कारणावरुन संशयितांनी त्यांच्या डोळ्याजवळ हाताच्या बोटांवर रॉड तसपेच लोखंडी विळा मारत दुखापत केली. साक्षीदार यांना डोक्यावर मारुन दुखापत केली. चापटाबुक्क्यांनी मारहाण केली. शिवीगाळ करुन दमदाटी केली. याप्रकरणी जाहीद शेख रउफ, रउफ शेख, अमजद शेख, मुस्तकीय शेख, अरशद शेख, फैजान शेख तसेच दोन महिला (सर्व रा. आसोदा) यांच्या विरोधात तालुका पोलीस ठाण्यात दंगा केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस निरीक्षक शशिकांत पाटील यांनी घटनास्थळी जावुन प्रकार जाणुन घेतला. हवालदार प्रकाश चिंचोरे तपास करीत आहेत.

# दशरथनगरात संगीतमय भागवत महापुराण कथेत भाविक तल्लीन



**जळगाव :** जळगाव शहरातील दशरथ नगर सध्या भक्तिमय स्वरांनी दुमदुमून गेले आहे. निमित्त आहे, पवन कोळी आणि समस्त कोळी परिवारातर्फे आयोजित संगीतमय श्रीमद् भागवत महापुराण कथेचे. प्रख्यात कथाचार्य काव्याणी श्री सोपानदेवजी महाराज यांच्या ओजस्वी आणि रसाळ वाणीतून वाहणाऱ्या ज्ञानगंगेचा लाभ घेण्यासाठी जळगावकर मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत.

कथेच्या ओघात महाराजांनी अत्यंत सोप्या भाषेत जीवनाचे सार उलगडले. ते म्हणाले, ''भागवत मरण कसे असावे हे शिकवते, रामायण जगण्याच्या मर्यादा आखून देते, गीता जीवनाचा खरा अर्थ सांगते, तर महाभारत राजकारण शिकवते.'' १८ हजार श्लोक आणि ३३५ अध्यायांमध्ये विस्तारलेल्या या महापुराणात भगवान विष्णूंच्या २४ अवतारांचे महात्म्य दडलेले असून, ही कथा भक्तांसाठी 'कल्पवृक्षा'समान असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. महाभारतातील प्रसंगांचा संदर्भ देत महाराजांनी 'सत्ता आणि सत्य' यावर भाष्य केले. ''ज्या बाजूला भगवान श्रीकृष्ण आहेत, त्या बाजूला सत्य आहे आणि जिथे सत्य आहे, तिथे विजय निश्चित आहे,'' असे सांगत त्यांनी श्रोत्यांमध्ये आत्मविश्वास फुंकला. यावेळी त्यांनी द्रौपदीचा संघर्ष आणि भीष्म पितामहांच्या भूमिकेवरही प्रकाश टाकला.

श्रीमद् भागवताची उत्पत्ती सांगताना महाराज म्हणाले की, ही कथा भगवान विष्णूंनी ब्रह्मदेवांना सांगितली, तिथून ती नारदमुनी, व्यासमुनी आणि सुखदेवजी महाराजांमार्फत राजा परीक्षितापर्यंत पोहोचली. गंगा, यमुना आणि सरस्वती या त्रिवेणी संगमाचे पावित्र्य या कथेमध्ये सामावलेले आहे. मनापासून संकल्प केल्यास भागवत कथा सर्व इच्छा पूर्ण करते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आजच्या धावपळीच्या युगात युवा पिढी मोठ्या संख्येने भक्तीमार्गाकडे वळत असल्याबद्दल महाराजांनी समाधान व्यक्त केले. यावेळी त्यांनी पंडित प्रदीप मिश्रा, बागेश्वर धाम सरकार आणि संत प्रेमानंद बाबा यांच्या आध्यात्मिक कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

# विविध स्पर्धेत महिलांचा उस्फुर्त प्रतिसाद

## 'सुरभि बहुद्देशिय महिला मंडळाचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव,१६ मार्च**

महिला दिनानिमित्त सुरभि बहुउद्देशिय महिला मंडळातर्फे महिलासाठी विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यात महिलांनी उस्फुर्त सहभाग घेतला. वेगवेगळ्या क्षेत्रात व्यक्तीमत्वाचा ठसा उमटविणाऱ्या आठ महिलांचा यथोचित सन्मान करुन गौरविण्यात आले. सुरवातीला प्रमुख पाहुण्या माजी महापौर सिमा भोळे,अध्यक्षा स्वाती कुळकर्णी, परीक्षक सुनीता नाईक, परीक्षक पद्मजा अत्रे ह्यांच्या हस्ते दिप प्रज्वलन व सरस्वती पूजन करण्यात आले.

प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांचा सत्कार अध्यक्ष स्वाती कुळकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला. सुरभी तर्फे महिलादिनानिमित्त भारतीय विवाह संस्था- परंपरा आणि बदल ह्या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. त्यात प्रथम वैशाली ढेपे, द्वितीय आसावरी जोशी, तृतीय वैदेही नाखरे हे मानकरी ठरले.

परीक्षक म्हणून सुनीता नाईक यांनी कामकाज पाहिले. यानंतर हिंदी- मराठी नायिकेंच्या फँन्सी वेशभूषा स्पर्धा घेण्यात आल्या,त्यात प्रथम मंजुषा अडावदकर(जयश्री गडकर), द्वितीय सोनाली करमरकर ( प्रियंका चोप्रा, काशीबाई), तृतीय जागृती कुळकर्णी (गंगुबाई काठीयावाडी, आलिया भट) यांनी पारितोषिक मिळविले. उत्तेजनार्थ १- आसावरी जोशी (निर्मिती सावंत) उत्तेजनार्थ २-अनुप्रिता बापट (विद्या बालन) यांना मिळाले. पद्मजा अत्रे यांनी परीक्षक म्हणून कामकाज पाहिले.

१९ एप्रिलला भगवान श्री परशुराम जन्मोत्सवासाठी जास्तीत जास्त संख्येने महिलांनी उपस्थितीत राहावे,असे आवाहन अध्यक्षा स्वाती कुळकर्णी यांनी याप्रसंगी केले. कार्यक्रमाला श्री सिद्धिविनायक महिला मंडळ, सुरभीचे सभासद व बहुभाषिक च्या माजी अध्यक्षा वृंदा भालेराव व वर्षा पाठक उपस्थित होत्या.आशा जोशी, निलिमा नाईक, अश्विनी जोशी, , पूनम जोशी, सुनीता सातपुते, स्मिता शुक्ल, मेघा नाईक, स्मिता बंगाली, रेवती शेंदुर्णीकर, सविता नाईक व श्री सिद्धिविनायक मंदिर संचालक मंडळाचे या कार्यक्रमाला सहकार्य लाभले.



### मान्यवर महिलांचा सन्मान

याप्रसंगी समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रातील ८ महिलांना सन्मानित करण्यात आले. त्यात रोहिणी कुळकर्णी ( शैक्षणिक), डॉ श्रुती जोशी ( वैद्यकीय), अंजली हांडे ( कला, गायन क्षेत्र), रश्मी कुरमभट्टी (धार्मिक ), योगिनी राव (आर्थिक), निलिमा जोशी (कायदेविषयक), वृषाली जोशी (सामाजिक), दिपा देशपांडे (साहित्य) तसेच बहुभाषिक महिला संघाच्या अध्यक्ष झाल्या बद्दल पूनम तिवारी यांचाही ह्यावेळी करण्यात आला. सूत्रसंचालन मानसी जोशी यांनी केले.



# जनसामान्यांचा प्रगतीचा ध्यास आंबेडकरी विचारातच- मुकुंद सपकाळे

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १६ मार्च**

भारतीय समाज व्यवस्थेला उन्नत आणि प्रगत अवस्थेला व जागतिक स्तरावर भारतीयांची ओळख निर्माण करून देणारा विचार हा आंबेडकरी विचारातूनच स्पष्ट होत जाऊन लोकशाही मूल्य, सामान्यांच्या जगण्याशी निगडित असणाऱ्या साऱ्या गोष्टी एक भावबंध निर्माण करतात आणि यातूनच राष्ट्रीय एकात्मतेची जी जोपासना होत जाते. अनेक प्रसंगांना सामोरे जाण्याचे धाडस देखील सामान्यातल्या सामान्य माणसात येवू शकते हे धाडस आंबेडकर विचारातूनच स्पष्ट होत जाणारे असते असे मत महाराष्ट्र जनक्रांती मोर्चाचे अध्यक्ष मुकूंद सपकाळे यांनी व्यक्त केले.

धानोरा येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या नियोजन बैठकी प्रसंगी ते बोलत होते. बैठकीच्या अध्यक्षस्थानी युवराज वानखेडे होते.

याप्रसंगी प्रमुख अतिथी साहित्यिक डॉ. मिलिंद बागुल यांनी मनोगत व्यक्त करताना म्हटले, महापुरुषांच्या विचारातून, त्यांच्या इतिहासातून, व्यक्तिमत्त्वातून, नव्या पिढीची विचार वाट दृढ होत जाते विचारवाहकांसाठी ऊर्जा स्त्रोत असतात, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले, राजश्री शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्य कर्तुत्वांनी हा भारत महाराष्ट्र समृद्ध झालेला आहे त्यांच्या पुतळ्यांच्या माध्यमातून अनेकांना प्रेरणा मिळत असते. प्रा. डॉ. सत्यजित साळवे यांनी मनोगत व्यक्त केले.

बापूराव पानपाटील, नानाभाऊ आखाडे, सुनील सोनवणे, रवींद्र सोनवणे, प्रकाश मोरे, चतुर निकम यांच्या हस्ते तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पांजली व पुष्पहार अर्पण करण्यात आले. याप्रसंगी रवींद्र शिरसाट, दिगंबर सर, रतिलाल शिरसाट, सुनंदाताई शिरसाट, चुडामन शिरसाट, कुसुम शिरोडकर, अंजना मॅडम कुसुमबाई सोनवणे, खटाबाई शिरसाट, सुनंदा शिरसाट यांनी अतिथींचे स्वागत करून पुतळ्याच्या नियोजना संदर्भात संवाद साधला. सूत्रसंचालन राजेंद्र साळुंखे यांनी आभार विश्वनाथ पांडव यांनी मानले.



# २०२६ ; सर्वाधिक उष्ण उन्हाळा

**गेल्या दशकापासून दरवर्षी पृथ्वीचे सरासरी तापमान वाढत असून येणारे प्रत्येक वर्ष हे मागच्या वर्षाचे रेकॉर्ड तोडत आहेत. उन्हाळ्यात उष्ण लहरी, पावसाळ्यात थंड लहरी आणि पावसाळ्यात वादळे, वादळी पाऊस हे दरवर्षीचेच चित्र झाले आहे. या चित्रामुळेच २०२६ सालचा उन्हाळा हा सर्वांत उष्ण उन्हाळा होण्याची दाट शक्यता आहे. यावर प्रकाश टाकणारा हा लेख...**

प्रासंगिक
प्रा. सुरेश चोपणे

२००१ सालापासून जगातील काही देशांत आणि भारतात तापमानवाढ, प्रदूषण, जंगलतोड, उद्योग आणि शहरीकरणात प्रचंड वाढ झाली आहे. त्यामुळे हवामानबदल झपाट्याने होत आहे. याचाच परिणाम म्हणून अति पाऊस, अति उन्हाळा आणि हिवाळा वाढत आहे. यातून रोगराई आणि महामारीच्या समस्या वाढणार आहेत. २०२६ सालाच्या जानेवारी महिन्याच्या शेवटी आणि मार्च महिन्याच्या सुरुवातीस उष्णता वाढल्याची नोंद करण्यात आली आहे. याला 'अल निनो' आणि 'ला निनो'ची स्थिती कारणीभूत ठरली आहे.

फेब्रुवारी २०२६ पासून 'ला निनो' कमी झाल्यास जुलै महिन्यात तटस्थ स्थिती राहील. परंतु, पुढे मात्र 'एल निनो' वर्षाच्या मध्यापासून सुरू होण्याची शक्यता दाट आहे.

हवामानबदल आणि त्याचे धोके यांच्या आकडेवारीनुसार २०२६ वर्षात भारताचा क्रमांक जगात या विषयात नववा आहे, तर हवामानबदल इंडेक्स यादीत भारत २३वा आहे. भारतात १९९५ ते २०२५ पर्यंत हवामानबदलामुळे ४५० मोठ्या घटना घडल्या आहेत. भारतात २००१ पासून हवामानबदल दिसणारी स्थिती सुरू झाली, तर २०२० पासून अती हवामानबदलाच्या परिस्थितीस सुरुवात झाली आहे.

२०२२ हे भारताच्या मागील ५० वर्षांतील सर्वांत उष्ण लहरींचे वर्ष होते. या वर्षात मार्चमध्ये तीन लहरी, एप्रिलमध्ये सात लहरी, मे महिन्यात आठ लहरी, तर जूनमध्ये पाच उष्ण लहरी आल्या होत्या. मुंबई, पुणे येथे तापमान वाढण्याची शक्यता नसतानादेखील इथे मागील दशकापासून तापमान वाढले आहे. पुढील दशकात यात वाढ होणार होणार असून सर्वाधिक तापमान विदर्भातून नोंदविण्यात येईल.

जागतिक तापमानवाढ ही २०२५ – २०२९ काळात १.२ ते १.९ अंश सेल्सिअसने वाढणार आहे. प्रदूषणात पृथ्वीचे कर्ब वायू हे अति जास्त म्हणजे ४२७–४२९ इतके वाढतील, जे उद्योग पूर्व काळाच्या ५० टक्क्यांनी वाढले आहेत. महाराष्ट्रातील जुने आणि नवे तापमान पाहता पुणे ४१.८ अंश सेल्सिअस, मुंबईचे तापमान

४१ अंश सेल्सिअस, नागपूर ४६ ते ४८ अंश सेल्सिअस आणि चंद्रपूर ४९, तर यवतमाळसुद्धा ४६.६ अंश सेल्सिअस असेल. महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नागपूर, चंद्रपूर येथे गेल्या दशकापासून अतिपावसाचे प्रमाण वाढले आहे. पुढील दशकात हे पुन्हा वाढणार आहे. त्यात इतरही शहरे समाविष्ट होत आहेत. गेल्या दशकात देशात आणि विशेषता महाराष्ट्रात थंड लहरी अपेक्षित नसतानासुद्धा थंडीच्या लाटेत वाढ होत आहे. २०२५–२६ हेसुद्धा सर्वाधिक थंड हिवाळा वर्ष ठरले. भविष्यात ही थंड लहरीत वाढ होण्याची शक्यता आहे. तापमान हे हवामानबदलाचे मुख्य कारण आहे.



हवामानबदलाला काय काय कारणे आहेत, हे निरीक्षण केल्यास मानवी कृती कारणीभूत असल्याचे माझे मत आहे. आज जगभर शहरीकरणाची आणि औद्योगिकीकरणाची प्रक्रिया झपाट्याने वाढत आहे. यामुळे जमिनीचे तापमान झपाट्याने वाढत आहे. यात भर म्हणजे उद्योग आणि वाहनामुळे कर्बवायूचे प्रदूषणसुद्धा मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. या प्रक्रियेतून पृथ्वीचे स्थानिक आणि वैश्विक तापमान वाढत आहे. पूर्वीचे १५ अंश सेल्शियसचे तापमान आज १६ अंश सेल्शियसच्या पार जात आहे, तर सरासरी तापमानवाढ ही १.५ अंश सेल्शियस झाली आहे. सर्व जागतिक तह आणि 'युनो'ने जाहीर केल्याप्रमाणे सर्व देशांनी ही सरासरी तापमान वाढ १.५ अंश सेल्शियसपर्यंत रोखायची आहे. आज वातावरणात कर्ब वायूचे प्रमाण ४२५ ppmच्या वर गेले आहे, तर शहरात वायू गुणवत्ता निर्देशांक ३००–४०० दरम्यान वाढला आहे. पूर्वी संपूर्ण पृथ्वी हिरवीगार होती. परंतु लोकसंख्या वाढ, औद्योगिकीकरण, प्रदूषण आणि शहरीकरणामुळे जगातील जमिनीचा वापर बदलला आहे. त्यामुळे पृथ्वीचे प्रदूषण वाढू लागले आणि





हवामानबदलाच्या घटना घडू लागल्या आहेत. जगातील सर्व देशांनी कर्बवायू आणि इतर प्रदूषित वायूंचे उत्सर्जन त्वरित थांबविले पाहिजे, वृक्षांचे आच्छादन वाढले पाहिजे, जंगले आणि वन्यजीव वाढले पाहिजे. मानवाच्या विकासासोबत निसर्गाचासुद्धा विकास झाला पाहिजे, तरच सृष्टी आणि सजीव वाचू शकेल. ■■

**(लेखक हवामान अभ्यासक आहेत.)**

### तापमानवाढ अशी असेल

२०३० पर्यंत एक अंश सेल्सिअसने असेच प्रदूषण राहिले, तर २०३०–२०५० या कालावधीत दोन अंश सेल्सिअसने तापमानवाढ होईल. महाराष्ट्रातील उन्हाळ्यात ०.२५ ते ०.४२ अंश सेल्सिअसने वाढ होईल, तर हिवाळ्यात ०.३ ते ०.५५ अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता आहे. या अंदाजानुसार उत्तर महाराष्ट्र व विदर्भात तापमानवाढ जास्त होईल. उत्तर आणि दक्षिण महाराष्ट्रात हिवाळ्याचे तापमान मात्र कमी होईल. महाराष्ट्रातील एकपेक्षा अधिक अंश सेल्सिअसने तापमानवाढीच्या जिल्ह्यांमध्ये भंडारा–२.०, अकोला–१.३, अमरावती–१.६, छत्रपती संभाजीनगर–१.१, बीड–१.२, बुलढाणा–१.४, धुळे–१.१, गोंदिया–१.१, हिंगोली–१.२, जळगाव–१.३, लातूर–१.४,नागपूर–१.१, नंदुरबार–१.६, धाराशिव–१.४, वर्धा–१.१, वाशीम–१.२, यवतमाळ–१.१ यांचा समावेश असेल, तर सर्वांत कमी तापमानवाढीच्या जिल्ह्यात गडचिरोली, कोल्हापूर, मुंबई, पालघर, रायगड, रत्नागिरी, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, सोलापूर, ठाणे जिल्ह्याचा समावेश असेल. महाराष्ट्रातील सर्वाधिक तापमान असलेल्या चंद्रपूर जिल्ह्यात मात्र (०.८) तापमानवाढ आणि उष्ण लहरी कमी होणार असल्याचे म्हटले आहे. प्रदूषण असेच वाढत राहिले, तर २०५० पर्यंत सर्वाधिक तापमानवाढ हा अकोला–२.५, अमरावती–२.९, छत्रपती संभाजीनगर. २.९, भंडारा–२.६, बुलढाणा–२.३, धुळे–२.२ ,गोंदिया–२.१, हिंगोली–२.२, जळगाव–२.५, जालना–२.७, नागपूर–२.२, नंदुरबार–२.५, नाशिक–२.४, वर्धा–२.१, वाशीम–२.३ अंश सेल्सिअसने वाढेल, असा इशारा देण्यात आला आहे.

# ताडोबा भेटीचा क्षण

**ताडोबाभेटीला जाताना नेहमी डोळे उघडून जाण्याकडे कल असावा. हा कल आपल्याला नेहमीच्या अनुभवसंपन्नतेकडे घेऊन जातो. अशाच एका ताडोबाभेटीचा अनुभवसंपन्न करणारा मात्र तितकाच भेदक अनुभव विशद करणारा लेख...**

अनुभव
विवेक आंबेरकर

जंगल आणि वन्यजीव प्रेमींसाठी महाराष्ट्रातील ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्प म्हणजे एक स्वर्गच आहे. लहानपणापासूनच ताडोबाच्या दाट झाडीत जाऊन वाघाचे मनसोक्त फोटोशूट करण्याचे माझे स्वप्न होते.

ताडोबाचे हे सौंदर्य अनुभवण्यासाठी आम्ही वेगवेगळ्या प्रवेशद्वारांची म्हणजेच गेट्सची निवड केली होती. एकूण चार वेगवेगळ्या सफारी गेट्समधून आम्ही जंगलात प्रवेश केला. प्रत्येक गेटचा अनुभव वेगळा होता. कुठे बांबूची दाट झाडी, तर कुठे विस्तीर्ण गवताळ प्रदेश. जिप्सीतून जाताना मातीचा तो गंध आणि वाघाच्या आवाजाची प्रतीक्षा करणे, यात एक वेगळीच गूढता होती.

नशीब बलवत्तर होते, म्हणून आम्हाला ताडोबाचा राजा वाघ अगदी जवळून पाहता आला. त्याचा डौलदार चालणे आणि ती जरब कॅमेऱ्यात टिपणे, ही माझ्यासाठी स्वप्नपूर्तीच होती. वाघासोबतच ताडोबाच्या जंगलात आम्हाला इतरही अनेक प्राणी पाहायला मिळाले :

- ■ बिबट्या : झाडाच्या आडून जाणारी त्याची एक झलक थरारक होती.
- ■ अस्वल : स्वतःच्याच धुंदीत चालणारे अस्वल पाहून मजा आली.
- ■ रानकुत्रे (Dholes) : कळपाने शिकार शोधणारे रानकुत्रे पाहायला मिळाले.
- ■ गवा (Indian Bison) : त्यांचे अजस्र शरीर पाहून जंगलाच्या ताकदीची जाणीव झाली.
- ■ त्यासोबतच चितळ, सांबर आणि भेकर यांसारख्या तृणभक्षी प्राण्यांचा वावर सगळीकडे दिसत होता.

सकाळी आणि संध्याकाळच्या दोन सफारींच्या मधे जो वेळ मिळायचा, तेव्हा आम्ही हॉटेलवर थोडा आराम करायचो. पण छायाचित्रणाची आवड स्वस्थ बसू देईना, म्हणून मी हॉटेलच्या आसपासच्या परिसरातच पक्षी निरीक्षण करायचे ठरवले. जंगलाच्या कुशीत असलेल्या आमच्या हॉटेलच्या परिसरातच अनेक रंगीबेरंगी पक्ष्यांची लगबग पाहायला मिळाली.

सफारीचा दिवस मावळतीला आला होता. दिवसभर शोध घेऊनही जंगलाचा राजा काही दर्शन देत नव्हता; त्यामुळे थोडी निराशा मनात घर करू लागली होती. पण 'ताडोबा कधी कोणाला रिकाम्या हाताने पाठवत नाही,' म्हणतात ना, त्याची प्रचिती आम्हाला आली. अचानक आमच्या गाईडला दुसऱ्या बाजूने निरोप आला, वाघ दिसला आहे! ती माहिती मिळताच चालकाने जिप्सीचा गिअर टाकला आणि आमची गाडी वाऱ्याच्या वेगाने त्या दिशेने धावू लागली. धुळीचे लोट उडवत जेव्हा आम्ही तिथे पोहोचलो, तेव्हा समोरचे दृश्य पाहून काळजाचा ठोका चुकला. समोर एक भलामोठा, पिवळा धमक आणि पिळदार शरीराचा वाघ राजासारखा उभा होता. त्याचे ते भव्य रूप आणि रुबाबदार चाल पाहून काही क्षण काय करावे, हेच सूचेना.

त्याला पाहताच जिप्सीमध्ये बसलेल्या आम्हा सर्व फोटोग्राफर्समध्ये एक वेगळीच ऊर्जा संचारली. मघाशी थकलेले हात आता कॅमेऱ्याच्या लेन्स सावरण्यात व्यस्त झाले. चारी बाजूंनी कॅमेऱ्याच्या 'क्लिक–क्लिक' असा आवाजांचा पाऊस सुरू झाला. तो वाघ मात्र अगदी निर्धास्तपणे, आमच्याकडे दुर्लक्ष करत आपल्याच धुंदीत चालत होता. तो क्षण कॅमेऱ्यात कैद करताना जे समाधान मिळाले, ते शब्दांत सांगणे अशक्य आहे. माझ्या फोटोग्राफीच्या आवडीसाठी हा आयुष्यातील सर्वांत मोठा क्षण ठरला.

काही वेळाने तो देखणा वाघ हळूहळू जंगलाच्या बाहेर आला आणि अगदी बिनधास्तपणे डांबरी रस्त्यावर येऊन थांबला. एखाद्या चित्रपटातील नायकाची 'एन्ट्री' असावी, तसाच तो क्षण होता! आजूबाजूला पर्यटकांच्या जिप्सींची गर्दी झालेली, प्रत्येकजण आपला श्वास रोखून त्याला पाहात होता. पण त्या राजाला कशाचीही पर्वा नव्हती. काय तो त्याचा वचक आणि काय तो आत्मविश्वास! रस्त्यावर उभ्या असलेल्या एकालाही न बघता, जणू काही हे सर्व माझेच साम्राज्य आहे, अशा आविर्भावात तो तिथे उभा राहिला. त्याचे ते पिवळे–धमक शरीर आणि त्यावरचे काळे पट्टे सूर्याच्या मावळत्या किरणांत अधिकच खुलून दिसत होते. काही वेळ तिथेच रेंगाळून, सर्वांना आपल्या दर्शनाने तृप्त केल्यावर, तो तितक्याच डौलात समोरच्या दाट जंगलात निघून गेला. तो रस्ता ओलांडतानाचा त्याचा राजेशाही 'वॉक' माझ्या कॅमेऱ्यात आणि कायमचा माझ्या मनात कैद झाला आहे.




वाघाचे ते सौंदर्य टिपत असतानाच, तिथल्या स्थानिकांशी बोलताना मला एक वेगळीच आणि भीषण बाजू समजली. पर्यटकांच्या नजरेतून जो वाघ दिसला की आनंदाची लाट येते, तोच वाघ तिथल्या गावकऱ्यांसाठी दररोजच्या दहशतीचे कारण असतो.

तिथल्या गावकऱ्यांनी सांगितले की, हे वाघ अगदी बिनधास्तपणे गावात शिरतात आणि पाळीव जनावरांना आपले लक्ष्य करतात. पण दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, आजवर अनेक मानवी जीवही या वनराजाच्या भक्ष्यस्थानी पडले आहेत. तिथली माणसे दररोज आपला जीव मुठीत घेऊन जगतात. घराबाहेर पडताना त्यांना मृत्यूची भीती सतत सोबतीला असते. या संवादातून मला एका थक्क करणाऱ्या परंपरेबद्दल कळले. जर एखाद्या वाघाने गावातील एखाद्या व्यक्तीचा बळी घेतला, तर त्या मृत व्यक्तीच्या नातेवाईकांना गावाबाहेर त्या वाघाचे एक छोटे मंदिर किंवा 'वाघोबाचे स्मारक' उभारावे लागते. पिढ्यान्‌पिढ्या ही परंपरा तिथे चालत आली आहे. ही श्रद्धा म्हणावी की भीती, पण निसर्गाच्या या रौद्र रूपाशी जुळवून घेण्याची ती एक अजब रीत आहे.







ताडोबाची ही सफर मला केवळ वाघ दाखवून गेली नाही, तर निसर्गाचा समतोल आणि मानवी जीवनाची अनिश्चितता यांची जाणीव करून देऊन गेली. एका बाजूला वाघाचे ते विलोभनीय सौंदर्य आणि दुसरीकडे गावकऱ्यांच्या संघर्षाची ही कथा. ताडोबा माझ्या मनात कायमचा कोरला गेला आहे.

ताडोबाच्या या सफारीने मला केवळ निसर्गाचे सौंदर्यच दाखवले नाही, तर एक महत्त्वाचा धडाही दिला. जेव्हा मी वाघाला अगदी सहजपणे रस्ता ओलांडताना पाहिले, तेव्हा प्रकर्षाने जाणवले की, चूक त्या प्राण्यांची नाही, तर आपली आहे. खरं तर, आपणच त्यांच्या नैसर्गिक अधिवासात, त्यांच्या घरात शिरकाव केला आहे. जंगलातून जाणाऱ्या रस्त्यांमुळे त्यांचे जग विस्कळीत झाले आहे. अनेकदा रस्ता ओलांडताना वेगाने येणाऱ्या वाहनांमुळे वन्यप्राणी अपघाताचे बळी ठरतात, हे पाहून मन विषण्ण होते. यासाठी खालील उपाययोजना नक्कीच करता येऊ शकतील:

- सुरक्षित कुंपण (Fencing) : जंगलाच्या ज्या भागातून मुख्य रस्ते जातात, तिथे रस्त्याच्या कडेला मजबूत कुंपण घालावे, जेणेकरून प्राणी अचानक रस्त्यावर येणार नाहीत.
- प्राण्यांसाठी स्वतंत्र मार्ग (Wildlife Corridors/Underpass) : प्राण्यांना एका जंगलातून दुसऱ्या भागात जाण्यासाठी रस्त्यावरून जावे लागू नये, यासाठी स्वतंत्र 'अंडरपास' किंवा 'ओव्हरपास' (Eco-bridges) बांधले जावेत. यामुळे अपघातांचे प्रमाण शून्यावर येईल.
- गतिरोधक आणि सीसीटीव्ही : जंगलातील रस्त्यांवर गाड्यांचा वेग मर्यादित ठेवण्यासाठी कडक नियम आणि देखरेख असावी.
- प्राण्यांना आपला त्रास होऊ नये आणि माणसांवरील हल्लेही कमी व्हावेत, यासाठी हे उपाय प्रभावी ठरू शकतात. जेव्हा जंगल सुरक्षित असेल, तेव्हाच आपण आणि आपला निसर्ग सुरक्षित राहील.
- ताडोबाची ही सफर माझ्यासाठी एक डोळे उघडणारा अनुभव ठरली. निसर्गाचा आनंद घेतानाच त्याच्या संरक्षणाची जबाबदारीही आपलीच आहे, ही जाणीव घेऊन मी परतलो. सहअस्तित्व हेच निसर्गाचे सूत्र असून यातूनच वाघही जगले आणि माणूसही सुरक्षित राहील.

वाघाचा तो 'रॉयल वॉक' आणि गावकऱ्यांच्या संघर्षाची ती गाथा मनात साठवून, एका चांगल्या उद्याच्या आशेने मी ताडोबाचा निरोप घेतला. ■■

**(लेखक वन्यजीव छायाचित्रकार आहेत.)**









### सफारीदरम्यान आणि हॉटेलच्या परिसरात मला दिसलेले प्रमुख पक्षी

- इंडियन रोलर : याचे निळे पंख उडताना अतिशय सुंदर दिसतात.
- ओरिएंटल हनी बझार्ड (मधुबाज) : जो उंच झाडावर शांत बसलेला दिसला.
- मलबार पाईड हॉर्नबिल (मलबारी कवड्या धनेश) : त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण चोचीमुळे तो पटकन लक्ष वेधून घेतो.
- पॅराडाईज फ्लायकॅचर (स्वर्गीय नर्तक) : याची पांढरी लांब शेपटी हवेत तरंगताना पाहणे, हा एक सुखद अनुभव होता.
- हुदहुद (Hoopoe): आपल्या तुऱ्याने हा पक्षी सर्वांचे लक्ष वेधून घेतो.
- खंड्या (Kingfisher), सुतार पक्षी (Woodpecker) आणि मोर यांचीही साथ लाभली.





## बोरकर गुरुजींची भविष्यवाणी

**दिनांक** : १७/०३/२०२६ **वार** : मंगळवार **शके** : १९४७
**अयन** : उत्तर **ऋतू** : वसंत **मास** : फाल्गुन **पक्ष** : कृष्ण **महिना** : मार्च
**संवत** : २०८२ **अयनांश** : २४-१३-२६ **तिथी** : त्रयोदशी **नक्षत्र** : शततारका
**योग** : सिध्द **करण** : तैतिल **सूर्योदय** : ६.४७ **सूर्यास्त** : १८-४७
**चंद्रराशी प्रवेश** : कुंभ **शुभाशुभ** : १० पावेतो शुभ

**दैनिक राशीभविष्य**

**मेष** : प्रवासात अडचणी येतील.
**वृषभ** : आजारी व्यक्तींचे आरोग्यात सुधारणा होईल.
**मिथून** : अविवाहितांना स्थळे येतील, प्रवास करावा.
**कर्क** : आरोग्यात सुधारणा होत राहील.
**सिंह** : प्रवासात वाहनांच्या समस्या उद्‌भवतील.
**कन्या** : पत्नीचे आरोग्याकडे लक्ष द्यावे लागेल.
**तुला** : नवीन वाहन खरेदी करणार.
**वृश्चिक** : प्रवासात नवीन ओळखी होतील.
**धनू** : मातृसोबत प्रवास कराल.
**मकर** : आर्थिक अडचणी उद्‌भवतील.
**कुंभ** : वाहनावर खर्च करावा लागेल.
**मीन** : शेतकरी वर्गास अडचणी निर्माण होतील.

**पंडित सुरेशराव बोरकर गुरुजी, मु.पो. रावेर, जि. जळगाव, मोबा. ९८५००१५५५८**

# मध्यवर्ती भागातील जुन्या पालिका जागेत कचऱ्याचे साम्राज्य!

## भुसावळ येथे रेल्वे स्टेशनजवळील प्रशासकीय नऊ मजलीचे स्वप्न अद्याप कागदावरच

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, १६ मार्च**

शहराच्या मध्यवर्ती भागात, रेल्वे स्टेशनलगत असलेली पालिकेची कोट्यवधी रुपये मूल्याची जागा सध्या अस्वच्छतेच्या विळख्यात सापडली आहे. एकेकाळी प्रशासकीय कामकाजाचे केंद्र असलेली ही जागा आज अक्षरशः कचऱ्याचा डेपो बनली असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



पालिका प्रशासनाकडून मॉडर्न रोड व परिसरातून गोळा होणारा कचरा या ठिकाणी टाकला जात असल्याचे चित्र आहे. अनेक दुकानदार व फेरीविक्रेत्यांकडून कचरा टाकण्यात येत असल्याने आवारातील बहुतांश भाग अस्वच्छ असून दुर्गंधी, डासांची वाढ आणि अस्वच्छ वातावरणामुळे परिसरातील नागरिक व प्रवासी त्रस्त झाले आहेत.

विशेषता नगरपरिषदेच्या जुन्या इमारतीच्या जागेवरच भव्य ९ मजली प्रशासकीय इमारत उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मात्र, प्रत्यक्षात कोणतीही कामे झालेली नसून हा प्रकल्प केवळ कागदावरच असल्याचे दिसून येत आहे.

### असे होते महत्त्वाकांक्षी नियोजन

माजी नगराध्यक्ष उमेश नेमाडे यांच्या कार्यकाळात या जागेवर आधुनिक सुविधांयुक्त इमारत उभारण्याचा आराखडा तयार करण्यात आला होता. तळमजल्यावर दर्शनी भागात व्यापारी गाळे, आतील भागात वाहनतळ व्यवस्था, चार लिफ्ट व दोन जिने, प्रत्येक मजल्यावर पालिकेचे स्वतंत्र विभाग, प्रशस्त दालन व सुसज्ज बैठक हॉल असा सर्वसमावेशक आराखडा तयार करण्यात आला होता. शहराच्या विकासाच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा मानला जात आहे.

### प्रशासनाची उदासीनता

शहराच्या मध्यभागी असलेल्या मौल्यवान मालमत्तेची दुरावस्थेचे पालिका प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जागेला तातडीने कुंपण घालून कचरा टाकण्यास बंदी घालावी, नियमित स्वच्छता मोहीम राबवावी आणि प्रलंबित इमारत प्रकल्पाबाबत स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

विकासाच्या गप्पांमध्ये अडकलेला हा प्रकल्प प्रत्यक्षात कधी साकार होणार की कोट्यवधींची ही जागा अस्वच्छतेच्या गर्तेतच राहणार असे अनेक प्रश्न शहरवासीयांकडून उपस्थित केले जात आहेत.

## थोडक्यात महत्त्वाचे.....

### गॅस टंचाईमुळे चुलीवर स्वयंपाक करण्याची वेळ



**बोदवड** : गेल्या आठ दहा दिवसापासून इराण अमेरिका या युद्ध सुरू आहे. याची झळ देशभरात पोचत असून डिझेल, पेट्रोल तसेच गॅस आदी इंधनाच्या दरात भाववाढ झाली आहे. यामुळे गॅस टंचाई जाणवत असून ग्रामीण भागात पुन्हा चुलीवर स्वयंपाक करण्याची वेळ आली असल्याचे चित्र दिसून येत आहे. इराण-अमेरिका देशातील युद्धामुळे गॅस, पेट्रोल डिझेल चे भाव दिवसेंदिवस वाढत असून भविष्यात घरघुती गॅस मिळेल की नाही याची चिंता वाढत आहे. आजच्या स्थितीत प्रत्येक घरात आज गॅस सिलेंडर असून भाव वाढ होवून गॅसचा तुटवडा झाल्यास चुलीवर स्वयंपाकाची वेळ येण्याची शक्यता वाढत असल्याचे दिसून येत आहे.




### फैजपूरला वाणिज्य प्रश्नमंजुषा स्पर्धेचे बक्षीस वितरण

**फैजपूर (ता. यावल)** : येथील धनाजी नाना महाविद्यालयात वाणिज्य विभागातर्फे आयोजित वाणिज्य प्रश्नमंजुषा स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा उत्साहहात झाला. स्पर्धेसाठी ६४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. प्राचार्य डॉ. आर. बी. वाघुळदे अध्यक्षस्थानी होते. वाणिज्य विभागप्रमुख प्रा. डॉ. रवी एन. केसूर, डॉ. आरती भिडे, डॉ. विवेक श्रावगे, प्रा. आकाश तायडे, प्रा. यश भारंबे आदींची उपस्थिती होती. स्पर्धेत अश्विनी वानखेडे, शेख सोहिल शेख रईस प्रथम, मृणाल महाजन द्वितीय, शेख परवेज मुश्ताक, शेख काफिल शेख मोमीन तृतीय आला. विद्यार्थ्यांचा बक्षिसे देऊन सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. वाघुळदे यांनी वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना भविष्यात मोठ्या संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी नेहमी बदलांशी जुळवून घ्यावे. जेणेकरून त्यांना स्पर्धा परीक्षेत यश आणि वित्तीय ज्ञान प्राप्त करता येईल, असे सांगत भविष्यात अशा स्वरूपाची प्रश्नमंजुषा स्पर्धा विद्यापीठ स्तरावर घेण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी, अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना चालना मिळते, असे मत व्यक्त केले. डॉ. आरती भिडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. रवी केसुर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. विवेक श्रावगे यांनी आभार मानले.



### फैजपूरला सिद्ध पादुका प्रस्थानार्थ नवचैतन्य

**फैजपूर (ता. यावल)** : फैजपूर शहरात फिरता नारळी सप्ताहानिमित्त आदिशक्ती मुक्ताईमाता सिद्ध पादुका प्रस्थान प्रसंगी ठिकठिकाणी भाविकांच्या स्वागतासाठी गुढी, रांगोळी उभारण्यात येवून मुक्ताई मय झाले होते. रांगोळी कलाकार राजू साळी, नगरसेविका दिपाली भारंबे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष नितीन राणे, युवा मोर्चा शहराध्यक्ष श्याम भंगाळे आदी उपस्थित होते.

### इन्स्पायरिंग एज्युकेटर अवॉर्डसाठी मंगेश निळेंची निवड

**मुक्ताईनगर** : येथील श्री समर्थ सायन्स क्लासेसचे समन्वयक व शिक्षक मंगेश जगन्नाथ निळे यांची डॉ. होमी भाभा फाउंडेशनतर्फे दिल्या जाणाऱ्या



इन्स्पायरिंग एज्युकेटर अवॉर्डसाठी निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार मुंबई येथे १२ मे रोजी होणाऱ्या इन्स्पायरिंग यंग सायंटिस्ट अवॉर्ड सेरेमनी-२०२५-२६ (एवायएसपी) या कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार आहे. शैक्षणिक क्षेत्रात वर्षभर संस्थेने दिलेल्या सातत्यपूर्ण सहकार्याबद्दल आणि विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रेरित केल्याबद्दल फाउंडेशनकडून त्यांचा गौरव करण्यात आला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी एमएसएटी (मॅथेमॅटिक्स अँड सायन्स ॲबिलिटी टेस्ट), जीआरईएटी (जर्नल रिसोईंग इंग्लिश ॲप्टिट्यूड टेस्ट तसेच रोबोक्वेस्ट यांसारख्या स्पर्धांमध्ये उत्साहाने सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, विश्लेषणात्मक विचारसरणी आणि नवोन्मेषाची जाणीव निर्माण करण्यासाठी मंगेश निळे यांनी केलेले योगदान उल्लेखनीय असल्याचे फाउंडेशनने नमूद केले आहे.

### वैष्णवी ढगेचे दुहेरी यश; इस्त्रो सहलीसाठी निवड

**सोयगाव** : येथील कुरुक्षेत्र करिअर अकॅडमीच्या विद्यार्थिनीने दुहेरी यश



संपादन करत संस्थेचा गौरव वाढवला आहे. वैष्णवी कडुबा ढगे हिने इस्रो सहल परीक्षेत पात्रता गुण मिळवून इस्रो सहलीसाठी निवड निश्चित केली आहे. याचबरोबर एनएमएस परीक्षेतही तिने तालुक्यात प्रथम क्रमांकाचे गुण प्राप्त करून यश आपल्या नावावर नोंदवले. या यशाबद्दल सचिन ढगे यांनी विद्यार्थिनीचा गौरव केला. त्यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी मनापासून प्रयत्न केले तर ते काहीही साध्य करू शकतात. प्रयत्नांती परमेश्वर आहे. वैष्णवी ढगे हिचा या यशाबद्दल कुरुक्षेत्र करिअर अकॅडमीचे शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांनी गौरव केला.




## गोरगरिबांच्या मुलांचे भविष्य शिक्षकांच्या हाती

### नैतिकतेने जबाबदारी पार पाडावी : आमदार प्रा. सोनवणे

**यावल** : गोरगरिबांचे मुले जिल्हा परिषद शाळेत येत आहेत. ही फार आनंदाची बाब असून या गोरगरिबाच्या मुलांच्या भविष्याची जबाबदारी शिक्षकांवर आहे. ती जबाबदारी शिक्षकांनी नैतिकतेने पार पाडावी व विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा पाया भक्कम करण्याचे आवाहन आ.प्रा.चंद्रकांत सोनवणे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले.

साकळी ता.यावल येथील ग्रामपंचायतच्या वतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत लोकनियुक्त सरपंच दिपक पाटील यांच्या पुढाकारातून सर्वसामान्य विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण मिळण्याच्या दृष्टिकोनातून कन्या, मुलांची तसेच उर्दू यासह अंगणवाडी वर्गांना स्मार्ट टि.व्ही तसेच जि.प.प्राथमिक मुलांच्या शाळेत विद्यार्थ्यांच्या वापरासाठी सुसज्ज 'संगणक कक्ष' उपलब्ध करून दिले. या शैक्षणिक सुविधांसह संगणक कक्षाचे उद्घाटन आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच तिन्ही शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक तसेच अंगणवाड्यांच्या सेविका व मदतनीस यांना स्मार्ट टीव्ही देण्यात आले.

यावेळी ते पुढे म्हणाले कि, शिक्षक विद्यार्थ्यांना अंधारातून प्रकाशाकडे नेतात. आई-वडील काबाडकष्ट करून शिकविण्याची जाणीव ठेवून प्रत्येक विद्यार्थ्याने शिक्षण घेत आधुनिक शिक्षण प्रणालीच्या प्रवाहात राहून जगाला मार्गदर्शक राहण्याची आवश्यता असल्याचेही आमदार प्रा. सोनवणे यांनी सांगीतले.

यावेळी प्रमुख अतिथी आमदार प्रा.चंद्रकांत सोनवणे, यावल कृऊबाचे संचालक सूर्यभान पाटील, साकळीचे सरपंच दिपक पाटील, ग्रा.पं.सदस्य खतीब तडवी, शेख अकबर, माजी उपसरपंच तथा विद्यमान ग्रा.पं. सदस्य फक्रुद्दीनखान कुरेशी ग्रा.पं.सदस्य परमानंद बडगुजर, नरेंद्र मराठे, मुकेश बोरसे, विनोद खेवलकर, माजी ग्रा.पं.सदस्य साहेबराव बडगुजर, राजू सोनवणे, दिनकर माळी, शरद बिऱ्हाडे, सामाजिक कार्यकर्ते तुकाराम महाजन, उमेश बडगुजर, शेख सलिमभाई, मुकेश खेवलकर, पंकज जैन, उदय महाजन, योगेश कुंभार, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सौरभ जैन, शोभा जैन आदी पदाधिकारी उपस्थित होते. या प्रसंगी सरपंच दिपक पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन समाधान कोळी यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक मोहन पिंगळे,मुलींच्या संदीप केदारे, प्रभारी केंद्रप्रमुख किशोर चौधरी यांनी मार्गदर्शन केले. शिक्षक व शिक्षिका यांनी परिश्रम घेतले.

## खडसे महाविद्यालयातील भाग्यश्रीची कुस्तीसाठी विद्यापीठ संघात निवड

**मुक्ताईनगर** : येथील श्रीमती जी .जी. खडसे महाविद्यालयातील भाग्यश्री कृष्णा सोनी हिची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ पातळीवरील कुस्ती महिला स्पर्धेसाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ संघात कुस्तीसाठी फ्री स्टाईल- वजन गटकि. ग्रॅम मध्ये निवड झाली. स्पर्धा १७ ते २० मार्च दरम्यान कुरुक्षेत्र विद्यापीठ, हरियाणा येथे होत आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी विद्यापीठाचा संघ रवाना झाला. भाग्यश्री सोनीच्या यशाबद्दल प्राचार्य प्रो.डॉ.एच .ए.महाजन यांनी सत्कार केला.



याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. संजीव साळवे, उपप्राचार्य डॉ.वंदना चौधरी, क्रीडा संचालक डॉ. प्रतिभा ढाके, एन.एस.एस कार्यक्रम अधिकारी डॉ. दीपक बावस्कर, तसेच अश्विन सुरवाडे आदी उपस्थित होते. संस्थाध्यक्ष ॲड. रोहिणी खडसे-खेवलकर, उपाध्यक्ष नारायण चौधरी, सचिव डॉ. सी. एस. चौधरी, व्यवस्थापन मंडळ, प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले. क्रीडा संचालकांसह, हनुमान व्यायाम शाळा वरणगाव येथील नामदेव वस्ताद, संजय बावस्कर,प्रणय बावस्कर, अजय तायडे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

## शेतातच अस्थी विसर्जन करीत केले वृक्षारोपण

### शेळके परिवाराचा आदर्श उपक्रम

**बोदवड** : राजुर येथील सुभाष सोपान शेळके, किशोर सोपान शेळके, तसेच आशाबाई भागवत टिकारे यांच्या आई कमलाबाई शेळके यांचे वृद्ध काळाने निधन झाले. यानंतर परिवाराने कमलबाई शेळके यांच्या अस्थींचे विसर्जन परंपरेने नदी वा तिर्थक्षेत्रावर जाऊन न करता, त्यांच्या शेतातच वृक्षारोपण करीत त्या ठिकाणी पूर्ण शेतात विखरून केली.

कमलबाई शेळके यांचे अंतिम संस्कार त्यांच्या शेतातच पर्यावरण पूरक गौऱ्यांव्दारे करीत नदी तलाव प्रदूषीत न करता त्या अस्थी व रक्षा विसर्जन पूर्ण शेतामध्ये शिंपडून



प्रदूषण मुक्तीचा हा संदेश शेळके परिवाराने दिला आहे



## वडिलांच्या वाढदिवसानिमित्त फैजपूरला हिंदू समरसता उपक्रम

**फैजपूर** : येथील शुभदिव्य मंगल कार्यालयाचे संचालक निलेश हेमराज चौधरी यांनी त्यांच्या वडिलांच्या ७५ वर्षे अमृत महोत्सवानिमित्त हिंदू समरसता उपक्रमाद्वारे आदर्श ठेवला आहे. रामराज्य संघाच्या माध्यमातून शहरातील बाराबलुतेदार शेवटच्या परिवारास प्रतिनिधीक स्वरूपात फरसाण मिठाईचे वाटप निलेश चौधरी, संजय सराफ, राजाभाऊ चौधरी, कांतीलाल चौधरी, राकेश चौधरी, योगेश भावसार, अनुराधा परदेशी, वसंत परदेशी यांच्या हस्ते करण्यात आले

तसेच शुभदिव्य मंगल कार्यलयात येथे हेमराज चौधरी, निर्मला चौधरी, निलेश चौधरी, सुवर्णा चौधरी, सोनल तळेले या परिवारासह रामराज्य संचालकांच्या उपस्थितीत हेमराज चौधरी यांचा सत्कार करीत भगवत गीता देवून अभिष्टचिंतन शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी माजी नगराध्यक्ष पांडुरंग सराफ, प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ व्ही आर पाटील, पत्रकार नंदू अग्रवाल, शिवम चौधरी होते. सूत्रसंचालन प्रा राजेंद्रसिंह राजपूत यांनी केले. सर्वच हिंदू धर्मियांनी आपला वाढदिवसाचा अनाठायी खर्च न करता सदकामी लावणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन रामराज्यचे अध्यक्ष संजय सराफ यांनी केले. या प्रसंगी नगरसेवक सिद्धेश्वर वाघूळदे, नगरसेविका सुनीता नेहेते, अनंता नेहेते, संदीप भारंबे, सुभाष चौधरी, प्रा सतीश चौधरी, प्रा भोजराज पाटील, दीपक होले, रामराज्य संघचे संजय सराफ, अतुल महाजन, राजाभाऊ चौधरी, निलेश चौधरी, निलेश कोल्हे, मृणालिनी राणे, भारती पाटील, हेमांगी चौधरी, स्नेहा चौधरी, काजल महाजन, निर्मला चौधरी, सुवर्णा चौधरी, सोनल तळेले, राकेश चौधरी, योगेश भाब, दिनकर तळेले, प्रकाश नेमाडे यांनी परिश्रम घेतले.

## मोठे वाघोदा येथे १९ मार्च रोजी भव्य हिंदू संमेलन

**मोठे वाघोदा (ता. रावेर)** : राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शताब्दी वर्षाच्या निमित्ताने संपूर्ण भारतात मंडल व वस्ती निहाय हिंदू संमेलनांचे आयोजन करण्यात येत आहेत. त्याचाच भाग म्हणून सकल हिंदू समाजातर्फे चिनावल मंडलाचे गुरुवार, दि. १९ मार्च रोजी सकाळी ८ ते ११ यावेत भव्य हिंदू संमेलनाचे आयोजन वाघोदा चिनावल रोड वरील कृष्णा मंगल कार्यालय येथे करण्यात आले असल्याची माहिती आयोजकांनी




दिली.

या कार्यक्रमासाठी विविध सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार असून मेळाव्यात प्रमुख मार्गदर्शक विश्व हिंदू परिषदचे अखिल भारतीय संघटन महामंत्री मिलिंद परांडे व महामंडलेश्वर श्री पवनकुमारदासजी महाराज फैजपूर, प.पू.म दिवाकर बाबा शास्त्री उपस्थित राहणार आहेत. गुढीपाडवा या हिंदु नववर्षरंभाच्या निमित्ताने सकाळी ७ वाजता हनुमान मंदिर येथे गुढी उभारून संमेलन स्थळापर्यंत शोभायात्रा काढण्यात येणार असून समाजात एकात्मता, संस्कृतीचे जतन आणि सामाजिक बांधिलकी जनजागृती करण्याचा उद्देश असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे. या संमेलनाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना एकत्र आणून सामाजिक सलोखा वाढविणे तसेच हिंदू संस्कृती आणि परंपरांबाबत जागरूकता निर्माण करणे हा कार्यक्रमाचा मुख्य हेतू असल्याचेही सांगण्यात आले. त्यामुळे वाघोदा परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## खडसे महाविद्यालयात महिलांच्या सृजनशीलतेला संधी

**मुक्ताईनगर** : येथील श्रीमती जी. जी. खडसे महाविद्यालय, मुक्ताईनगरच्या क्रीडा विभागातर्फे महिलांसाठी ताण-तणावमुक्त जीवनशैली घडविण्याच्या उद्देशाने योग, प्राणायाम व मनोरंजनात्मक उपक्रमांतर्गत तू.ल. कोळंबे प्राथमिक शाळा, मुक्ताईनगर येथे पंधरा दिवसीय शिबिर उत्साहात पार पडले.

या शिबिरांतर्गत महिलांमधील कल्पकता आणि सृजनशीलता विकसित व्हावी या हेतूने उपलब्ध



साहित्याच्या साहाय्याने पेपर ड्रेस तयार करण्याची स्पर्धा घेण्यात आली. यात उपस्थित महिलांची पाच गटांमध्ये विभागणी करण्यात येवून जूने वर्तमानपत्र, डिंक, पेपर पिन, सुतळी, स्टेपलर, दोरा, फेविकॉल आणि टेप अशा मोजक्या साहित्यातून आकर्षक ड्रेस तयार करण्याचे आवाहन देण्यात आले. स्पर्धेत 'राजनंदिनी' गटाने प्रथम क्रमांक बक्षीस प्रदान करण्यात आले.

योगिता झांबरे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. महाविद्यालयाच्या क्रीडा विभागातर्फे क्रीडा संचालक प्रा. डॉ. प्रतिभा ढाके, प्राचार्य डॉ. प्रो.एच. ए.महाजन, उपप्राचार्य डॉ. संजीव साळवे, उपप्राचार्य डॉ.वंदना चौधरी यांनी मार्गदर्शन केले.


## भुसावळ विभाग गाडी वक्तशीरपणात प्रथम क्रमांक

### मार्च महिन्यात आतापर्यंत ४ दिवस वेळपालनाची नोंद

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, १६ मार्च**

मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागाने १३ मार्च रोजी भारतीय रेल्वेतील ६९ विभागांमध्ये गाडी वक्तशीरपणा बाबतीत प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे.

दिनांक १३ मार्च रोजी नियोजित प्रादेशिक अंतर ५४०६७.२५ कि.मी. असून नियोजित धावण्याचा वेळ ५४०७४ मिनिटे होता. इंटीग्रेटेड कोचिंग मॅनेजमेंट सिस्टम () मध्ये नोंद झालेल्या १७३ गाड्यांपैकी सर्व गाड्या वेळेवर धावल्या, त्यामुळे १००% वक्तशीरपणात परिपूर्ण विक्रम नोंदविण्यात आला.



हा आकडा दुसऱ्या क्रमांकावरील जोधपूर विभागाच्या तुलनेत दुप्पटपेक्षा अधिक असून हुबळी, राजकोट आणि भावनगर विभागांच्या एकत्रित गाड्यांच्या (१५४ गाड्या) संख्येपेक्षाही जास्त आहे. तसेच हा संपूर्ण भारतीय रेल्वेमध्ये एखाद्या विभागाने चालविलेल्या मेल/एक्सप्रेस गाड्यांच्या संख्येतील ११वा सर्वाधिक आकडा आहे.

भुसावळ विभागाच्या इतिहासात प्रथमच विभागीय स्तरावर १००% वक्तशीरपणात विक्रम नोंदविण्यात आला असून यापूर्वीचा ९८.३२% वेळपालनाचा विक्रम दिनांक ११ मार्च रोजी नोंदविण्यात आला होता. हा विभागासाठी ऐतिहासिक टप्पा ठरला आहे.

विभागीय तसेच झोनल स्तरावर उत्कृष्ट वक्तशीरपणा राखत भुसावळ विभागाने मध्य रेल्वेला भारतीय रेल्वेच्या १७ झोनल रेल्वेमध्ये ५व्या क्रमांकावर पोहोचविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.मार्च महिन्यात झोनल स्तरावर ३, ५, ११ आणि १३ मार्च या दिवशी तंतोतंत वेळपालन नोंदविण्यात आले आहे.

दररोज सरासरी १७० पेक्षा अधिक मेल, एक्सप्रेस गाड्यांची वाहतूक असल्यामुळे गाडी संचालनाचे व्यवस्थापन अत्यंत आव्हानात्मक ठरते. जास्त गाड्या व लांब पल्ल्याच्या धावण्यामुळे कंट्रोलर्सना गाड्यांवर सुरुवातीपासून शेवटपर्यंत लक्ष ठेवण्याची जबाबदारी अधिक वाढते.

हे यश ऑपरेटिंग विभागातील सर्व कर्मचाऱ्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे साध्य झाले असून मेल/एक्सप्रेस गाड्यांच्या वक्तशीरपणाला प्राधान्य देण्यासाठी "मानसिक सज्जता" निर्माण करण्यात आली आहे. तसेच वक्तशीरपणात "शून्य सहनशीलता धोरण' अवलंबले गेले आहे.

मध्य रेल्वेने सरासरी ९२ टक्के वेळा निर्धारीत वेळपालनाची नोंद केली आहे. उच्च प्रवासी वाहतूक व्यवस्थापन, विश्वासार्ह सेवा आणि वेळपालन सुधारण्यासाठी मध्य रेल्वे सातत्याने नियोजनबद्ध प्रयत्न करत आहे. कार्यक्षम संचालन आणि उत्कृष्ट सेवा देण्याच्या ध्येयाने मध्य रेल्वे प्रवाशांना अधिक तत्पर आणि दर्जेदार सेवा देण्यासाठी कटिबद्ध आहे.

## हिंदू नववर्ष स्वागत मिरवणुकीसंदर्भात श्री बालाजी वहन व्यवस्थापक मंडळाची बैठक

**तभा वृत्तसेवा**
**धरणगाव, १६ मार्च**

नववर्ष प्रतिपदा म्हणजेच गुढी पाडवा - हिंदू नववर्ष प्रारंभ! नवचैतन्य,नवसंकल्प , समृद्धीची गुढी उभारली जाते, धरणगाव शहरात श्री बालाजी वहन व्यवस्थापक मंडळाच्या वतीने दरवर्षी भव्य मिरवणुकीचे आयोजन केले जाते. मिरवणुकीच्या पुर्व नियोजनासाठी मंडळाचे अध्यक्ष दिलीप पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंदिरात बैठक पार पडली.

यावेळी उपाध्यक्ष गुलाबराव वाघ, कार्याध्यक्ष जिवन बयस, सचिव प्रशांत वाणी, सहसचिव अशोक येवले, कोषाध्यक्ष किरण वाणी, मंडळाचे विश्वस्त उपस्थित होते. मिरवणुकीच्या दृष्टीने आवश्यक त्या कामाच्या जबाबदारीचे वाटप करण्यात आले.

पाडव्याची मिरवणूक १९ मार्च गुरूवारी सकाळी ७:३० वाजता मंदिर प्रांगणात गाव विकास समरसता व समृद्धीची गुढी नगराध्यक्षा लिलाताई चौधरी, उपनगराध्यक्षा सुरेखा महाजन, २३ व्या वर्षी कलेक्टर परीक्षा उत्तीर्ण झालेले आकाश ओम त्रिवेदी, ह.भ.प. भगवान बाबा, पी.आय. सुनिल पवार यांच्या हस्ते उभारली जाईल. मिरवणुक गावातील प्रमुख मार्गावरून निघेल, मिरवणूकित सर्व समाज बांधव, महिला, संघटना, धार्मिक पंथ, शाळा, महाविद्यालयाचे विद्यार्थी, सर्व राजकीय पक्ष पदाधिकारी, कार्यकर्ते, गणेशोत्सव मंडळ, नवरात्रोत्सव मंडळ, युवक संघटना, पेन्शनर संघटना आदी सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, मिरवणूक मार्गावर ध्वज, पताका लावून, सडे रांगोळ्या काढून व मिरवणुकीवर पुष्पवृष्टी करून स्वागत करावे, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष दिलीप रामु पाटील व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.